# ओळखा पाहू



भारतातील नामवंत कायदे-पंडित.

'वुई द पीपल' आणि 'वुई द नेशन' ही यांनी लिहीलेली दोन पुस्तके लोकप्रिय ठरली.

यांची ओळख पटवा आणि आम्हास कळवा.

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

**सप्टेंबर** अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर
नामवंत पत्रकार **श्री.खुशवंत सिंग**

---

**स्पर्धेचे विजेते - व्यंकटेश माणेकरी, सोलापूर**

---

**अचूक उत्तर पाठवणारे वाचक**

मंजूषा जोगळेकर, व्यंकटेश काळे, पुणे. प्रफुल्ल तायडे, उषा कंठे, गिरीजा कंठे, वैशाली कुऱ्हेकर, अमरावती. डॉ. पी. जी. गुंजाळ, नगर. गुलाम मुस्तफा, माधव पवार, सोलापूर. द. तु. नंदापूरे, यवतमाळ. कल्पना शेंद्रे, चंद्रपूर. विनायक हावळ, श्रीनिवास कुरणे, कोल्हापूर. अरविंद बोकील, सांगली. साक्षी वाणी, रत्नागिरी. विजय नाकाडे, नागपूर. एस.एम.मराठे, सातारा.

**प्रायोजक**

**श्री राजू जगदीशचंद्र मेहता**, मे.हिराचंद नानचंद अँड कंपनी, मालेगाव, जि.नाशिक.



◆ ऑक्टोबर २००७
◆ वर्ष सातवे
◆ अंक दहावा

# मेहता मराठी ग्रंथजगत

*— अनुक्रमणिका —*


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | ७ |
| **पुस्तक परिचय** | |
| **आयएसआयच्या कारवाया :** अनु. अरुण मांडे | ३२ |
| **सर्व वयोगटांसाठी योगसाधना आणि ध्यानधारणा :** अनु. प्रशांत तळणीकर | ३९ |
| **भारतीय साहित्यिक :** डॉ. सुनीलकुमार लवटे | ४७ |
| **विमुक्त :** दादासाहेब मोरे | ६१ |
| **मांजराची सावली :** जयश्री कुलकर्णी | ६८ |
| **विषवल्ली :** जयश्री कुलकर्णी | ७७ |
| **एड्स :** डॉ. दिलीप बावचकर | ८३ |
| **पुरस्कार** | ९० |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ९४ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९९ |
| **श्रद्धांजली** | १०१ |
| **बालनगरी** | १०४ |


संपादक : सुनील मेहता

कार्यकारी संपादक : शंकर सारडा

संपादन साहाय्य : अनिरुद्ध पाटील, शिल्पा कुलकर्णी

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०. फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - info@mehtapublishinghouse.com**
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षाची ३५०रु. पाच वर्षाची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

### बुकर पुरस्कार आणि जागतिकीकरण

इंद्र सिन्हा यांच्या 'ॲनीमल्स पीपल' या कादंबरीचा 'बुकर' या पुरस्काराच्या पूर्वयादीत समावेश झाला आहे. गेल्या वर्षी किरण देसाई या लेखिकेच्या 'दि इनहेरिटेन्स ऑफ लॉस' या कादंबरीला हा पुरस्कार मिळाला होता. त्याआधी अरुंधती रॉयच्या 'दि गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' या कादंबरीने 'बुकर' प्राप्त करून वाचकवर्गाचे लक्ष वेधून घेतले होते. त्याआधी सलमान रश्दी यांच्या 'मिडनाइट्स चिल्ड्रेन'ने हा मान संपादन केलेला होता. भारतीय लेखकांना आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा देणारा हा महत्त्वपूर्ण पुरस्कार ठरला आहे आणि भारतीय लेखक इंग्रजीत लिहू लागले तर त्यांचे लेखन हे समकालीन जागतिक वाङ्मयक्षेत्रात आपले स्वत:चे स्थान मिळवण्याच्या पात्रतेचे आहे याची ग्वाही त्यामुळे मिळत आहे. उपमन्यू चटर्जी, विक्रम सेठ, भारती मुखर्जी, अमिताव घोष वगैरे लेखकांची पुस्तकेही या पुरस्काराच्या संदर्भात विचारात घेतली गेलेली आहेत. अरुंधती रॉय, किरण देसाई वगैरेंना त्यांच्या पहिल्याच कादंबरीने या अग्रगण्य पुरस्काराचा मानकरी ठरवले. नवीन वाट चोखाळणे, नवीन जीवनप्रणालीचे चित्रण करणे, इंग्रजी भाषेचे स्वत:चे वेगळे रूप आत्मविश्वासाने प्रकट करणे हे नव्या लेखकांनाही स्वत:ची वेगळी मुद्रा उमटवण्यास उपयुक्त ठरते.

'ॲनीमल्स पीपल्स' हे इंद्र सिन्हा या लेखकाचे पुस्तक अंतिम फेरीत निवडले जाते की नाही हे लवकरच कळेल; परंतु बुकरच्या शॉर्टलिस्टमध्ये ते आले यालाही महत्त्व आहे. त्यामुळे इंद्र सिन्हा या नावाकडे जाणकारांचे लक्ष निश्चित जाऊ शकेल आणि भोपाळच्या गॅस दुर्घटनेने उडवलेल्या हाहाकाराच्या तीव्रतेची जाणीव जगभरच्या संवेदनशील व्यक्तींना नव्याने होऊ शकेल. भोपाळच्या युनियन कार्बाइडच्या कारखान्यात गॅस गळतीमुळे जी अपरिमित हानी झाली, तिचे परिणाम आजही भोपाळच्या हजारो कुटुंबाना भोगावे लागत आहेत...इंद्र सिन्हा यांची 'डेथ ऑफ मिस्टर लव्ह' ही कादंबरी आधी प्रसिद्ध झालेली असली तरी भोपाळ गॅस दुर्घटनेसारख्या सवेदनशील विषयामुळे 'ॲनीमल्स पीपल' या कादंबरीने वाचकांमध्ये जिज्ञासा निर्माण केली आहे. त्याचमुळे 'बुकर'च्या शार्टलिस्टमध्येही ती समाविष्ट केली गेली आहे...

इंद्र सिन्हा यांचे वास्तव्य सध्या इंग्लंडमध्ये असले तर त्यांचे कुटुंब मूळचे उत्तर प्रदेशातील बहराईच जिल्ह्यातील; आणि इंद्र सिन्हाचा जन्म झाला मुंबईत...त्यांचे वडील हे नौदलात अधिकारी होते; ते अजूनही मुंबईला कुलाबा भागात राहतात. आई ब्रिटिश असून इंद्र अकरा वर्षाचा असताना आईवडील विभक्त झाले. सतराव्या वर्षी इंद्र सिन्हा आईकडे राहण्यासाठी इंग्लंडला गेले. मेयो कॉलेज आणि केंब्रिज येथे त्यांचे शिक्षण झाले. वयाच्या दहाव्या वर्षापासून लेखनाची आवड निर्माण झाला आणि अमेरिकेतील मूळ रहिवाशांना कशा प्रकारे निष्प्रभ केले गेले याच्या कथा वाचून त्याला रेडइंडियन्सबद्दल सहानुभूती वाटू लागली. अमेरिकेत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, स्पेन वैगेरे देशातून आलेल्या गौरवर्णीयांनी तेथील मूळ रहिवाशांना नागवले, त्यांच्या जमिनी,



त्यांची शेती घेतली आणि त्यांचे खच्चीकरण केले. त्याबद्दलच्या इतिहासातील तपशीलांनी इंद्र सिन्हांचे बालमन अस्वस्थ, सैरभैर झाले. भारतातही ब्रिटीश राजवटीने येथील जनतेवर आपली जीवनप्रणाली आणि आदर्श लादण्याचा प्रयत्न केला त्याबद्दलही त्यांनी वाचलेले होतेच...त्यामुळे जे तळागाळातले लोक आहेत, दीनदरिद्री आहेत त्यांच्याविषयी अनुकंपा आणि करुणा निर्माण झाली. इंद्र सिन्हाने या तळागाळातील वंचित लोकांच्या जीवनावर कथा लिहील्या. त्या वंचित वर्गात प्रत्यक्ष न मिसळताही मुंबईच्या झोपडपट्ट्यातील हालाखीचे जीवन बघून त्याने कल्पनेनेच त्यांच्या जीवनकहाण्या रंगवल्या. झोपडपट्टीतील बकालीपणा, अस्वच्छता, उकिरडे, दारिद्र्य, बेकारी, नैराश्य यांचे दर्शन घडवतानाच, तेथील रहिवाशांच्या आयुष्यातील संघर्ष, सुखदु:खे यांचाही मागोवा घेत राहून त्याबद्दल कथा लिहिणे हा आरंभीचा त्यांचा परिपाठ राहिला.

'डेथ ऑफ मिस्टर लव्ह' या कादंबरीने इंद्र सिन्हा यांना आपला सूर गवसला. साठीच्या दशकातील नानावटी खून खटल्याची पार्श्वभूमी या कथानकाला आहे. 'ब्लिट्झ' साप्ताहिकाने या प्रकरणाला खूप भडक रुप दिले. प्रेम आहुजा हा खरे तर या प्रेमप्रकरणातला बळी, पण त्याला खलनायक बनवले. ब्लिट्झच्या फायलीतून खणून काढलेल्या या प्रेमाच्या त्रिकोणाला इंद्र सिन्हा यांनी कल्पनारम्य स्वरुप दिले. चाळीस-पंचेचाळीस वर्षापूर्वीच्या त्या प्रकरणात पत्नीच्या प्रियकराचा खून होतो. परंतु या प्रकरणाची ढोबळ पार्श्वभूमी लक्षात घेवून त्यात खूप काही वेगळे तपशील भरण्यात आले आहेत. त्यामुळे आहे या स्वरुपात या कादंबरीचे नाते नानावटी प्रकरणाशी न लावताही, तिच्या कथावस्तूतील मानवी भावभावनांचे कल्लोळ वाचकाला अस्वस्थ करु शकतील असा लेखकाला विश्वास वाटतो. 'लेखक हा केर काढणाऱ्या माणसासारखा असतो. तो आयुष्यातील सगळा केरकचरा गोळा करतो, बरे वाईट जे दिसेल ते लोटून काढतो, अशाप्रकारे साठणाऱ्या वास्तव तपशीलातून तो वाचनीय कल्पित कथा उभी करतो, ही कल्पित कथा संवेदनाशील रसिकांना अंतमुर्ख करते, बऱ्यावाईटाचा विचार करायला लावते, प्रस्थापित नीतिमूल्यांची युक्तायुक्तता तपासून घेण्यास प्रेरित करते असे सिन्हा यांचे प्रतिपादन आहे.

तेवीस वर्षापूर्वी घडलेल्या भोपाळच्या गॅस दुर्घटनेने हजारावर बळी घेतले, दहा हजारावर व्यक्तींना जन्माचे अपंग करुन ठेवले. त्यातील चाळीस हजारावर व्यक्तींना नुकसान भरपाईसाठी अवाढव्य रक्कम युनियन कार्बाईडने दंड म्हणून भरली; ती अजूनही सरकारी तिजोरीत किंवा बँकेत आहे. तिच्यातील फार थोडी रक्कम दुर्घटना ग्रस्त परिवारांपर्यंत पोचलेली आहे. इंद्र सिन्हा यांनी भोपाळच्या या घटनेचा वापर कादंबरीसाठी केलेला आहे. परंतु युनियन कार्बाईडचा कारखाना आणि तेथील गलथान-पणामुळे व बेपर्वाईमुळे हजारो व्यक्तींचे प्राण धोक्यात आले. यासारख्या गोष्टींच्या तपशीलात शोध पत्रकारितेच्या अंगाने न जाता, अशा व्यापक दुर्घटनेने समाजाचे अवघे अस्तित्वच कसे दोलायमान आणि अस्थिर होते यावर त्यांनी भर दिला आहे, त्यासाठी खौफपुरात (भयानगरीत) ही घटना घडून गेल्याचे दाखवले आहे, तिच्यात सापडलेली मुले आता मोठी झाली आहेत; त्यांच्या मनात त्यावेळी बसलेली भीती अजूनही त्यांना भेडसावत असते. जनावरासारखी त्यांची अवस्था आहे. माणसातून जनावराची निर्मिती होण्याची ही प्रक्रिया आहे; तिला कोणताही मानवी कायदा लागू होत नाही. माणसाचे

प्राण्यात झालेले हे रूपांतर त्याला प्राण्याच्या पातळीवर जगणे भाग पाडते. माणसाशीच संघर्ष करण्याला त्याला प्रवृत्त करते. मुख्य व्यक्तिरेखा सुनील नावाच्या १९ वर्षे वयाच्या तरुणावर आधारलेली आहे. गॅसगळतीमुळे त्याला पोक आले आणि तो आता जनावराप्रमाणे चार 'पायावर' चालतो. मनात संताप खदखदत असतो, पण त्याची विनोदबुद्धी शाबूत असते. ही व्यक्तिरेखा इंद्र सिन्हा यांना भयंकर अस्वस्थ करून गेली.

भोपाळ गॅसगळतीवर मराठीत सुबोध जावडेकर यांनी १९८८ मध्ये या घटनेनंतर दोन वर्षात लिहिलेली 'आक्रंदन' ही कादंबरी प्रसिद्ध झाली होती. त्या कादंबरीत त्यांनी युनियन कार्बाईडच्या कारखान्यातील गॅस गळतीची पूर्वकल्पना तेथील काही कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी देऊनही वरिष्ठ पातळीवरील व्यवस्थापकांनी तिच्याकडे दुर्लक्ष केले असे स्पष्ट केलेले होते आणि या दुर्घटनेनंतर जो हाहाकार उडाला त्याचेही तपशील दिलेले होते. इंद्र सिन्हा यांनी सुनील या व्यक्तिरेखेद्वारे या दुर्घटनेने माणसाला पशुत्वाच्या पातळीवर कशाप्रकारे देऊन सोडले याचे भीषण स्वरूप स्पष्ट केले आहे.

'बुकर' च्या निमित्ताने अशा काही अस्वस्थ करणाऱ्या कलाकृतींकडे आपले लक्ष जाते. पुरस्कार मिळा न मिळो, अशा प्रयत्नांची व्यापक जाणीव जगभरच्या वाचकांपर्यंत पोचते ही गोष्ट महत्त्वाची आहे.

जागतिकीकरणामुळे साहित्यक्षेत्रातही आता परस्पर देवाणघेवाण वेगाने होऊ लागली आहे.पूर्वी फारच मोजक्या भारतीय लेखकांची पुस्तके इंग्लिशमध्ये अनुवादित होत किंवा इंग्लंड-अमेरिकेतील प्रकाशनसंस्थातर्फे प्रसिद्ध होत. आता ही प्रक्रिया गतिमान झाली आहे. भारत ही देखील एक मोठी बाजारपेठ आहे आणि भारतात इंग्लिश बोलणाऱ्या व्यक्ति इंग्लंडच्या लोकसंख्येपेक्षाही जास्त आहेत; अमेरिकेतील एकूण लोकसंख्येच्या बरोबरीने आहेत. त्यामुळे भारतातील ही अवाढव्य बाजारपेठ काबीज करायला हवी हे पाश्चात्य प्रसारमाध्यमांच्या ध्यानी येऊन चुकलेले आहे. बुकर पुरस्कारात भारतीय लेखकांची वर्णी लागण्यामागे कदाचित निवड समितीचा हा मार्केटिंगचा दृष्टीकोनही असू शकेल.''परदेशातील किंवा परभाषेतील एखादी वाङ्मयकृती (बहुधा कादंबरी) अफाट आर्थिक लाभ मिळवून देत असेल तर प्रकाशक तिच्यावर उड्या घेणारच. अरुंधती राय यांची 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' पदरात पाडून घेण्यासाठी ब्रिटीश-अमेरिकेत प्रकाशकांची स्पर्धा सुरू झाली. (कादंबरीचा चक्क लिलाव झाला)...अशा प्रकारे बाजारपेठेचा रेटा (मार्केट फोर्सेस) साहित्य विश्वावर प्रभाव पाडील...तो जागतिकीकरणाचाच परिपाक आहे व ही प्रक्रिया वाढत जाणार आहे..''असे प्रा.विलास सारंग यांनी एका लेखात म्हटले आहे. ते बव्हंशी खरेच आहे. वाङ्मयाच्या या जागतिकीकरणामुळे मानसिकताही खुली होत जाईल. आणि वाङ्मयीन क्षेत्राचा त्यामुळे फायदाच होईल.

इंद्र सिन्हा यांच्याप्रमाणेच भारतीय पार्श्वभूमीवर इंग्रजीत लेखन करणाऱ्या लेखकांची संख्या वाढायला हवी. प्रादेशिक भाषांतील लेखनाचे इंग्रजीत अनुवाद होण्याच्या प्रक्रियेलाही चालना मिळायला हवी. तशी काही उदाहरणे समोर येत आहेत, ही स्वागतार्ह बाब आहे.



# साहित्यवार्ता

## * समीक्षा हा ज्ञानाचा व्यवहार

'भाषा साहित्यावर जगत नाही, ती सर्वसामान्यांच्या ओठावर जगते. माणसाच्या सुखदु:खाच्या प्रकटीकरणाचे ती साधन असते. तेच साहित्याच्या रूपाने ललित पद्धतीने प्रकटते. अशा साहित्याचा व्यापक अर्थ समजावून वाचकाची समज समृद्ध करण्याचे काम समीक्षकाचे असते,' असे मत ज्येष्ठ समीक्षक, माजी संमेलनाध्यक्ष आणि 'मराठी विश्वकोश मंडळा'चे माजी अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.

'समीक्षा हा ज्ञानाचा व्यवहारच आहे. समीक्षेच्या वाचनाने वाङ्मयीन अभिरुची संपन्न होते. अशाच समाजात श्रेष्ठ साहित्यकृती जन्म घेतात. आज काळ वेगाने बदलतोय. माहिती-तंत्रज्ञान, जागतिकीकरण, नक्षलवाद, आरक्षण... अशा अनेक समस्या आहेत. सांस्कृतिक मागासलेपणाचा अनुशेष मोठा आहे. नव्या भांडवलशाही युगात प्रवेश करताना विकास होत असला तरी त्याच्या प्रेरणा नफ्याशी निगडित असतात. विज्ञान-तंत्रज्ञान आणि ज्ञानही त्यासाठी राबवले जाते. कला साहित्याचेही व्यापारीकरण होते. या बदलांमागील घुसमट नेमकपेणाने टिपण्याची गरज आहे.'

'समाजातील वाढत्या समस्या आणि गोंधळाची परिस्थिती ही साहित्यनिर्मितीला पोषक आहे; पण या समस्यांचा वेध घेणाऱ्या साहित्यिकाला या विषयातील आशय शोधता आला पाहिजे. सामाजिक सुखदु:खांचेही एक अवकाश असते. ते टिपण्यासाठी समाजसेवा आणि साहित्यसेवा यांतील भिंती तोडल्या पाहिजेत, कारण समीक्षा आणि साहित्य हे परस्परांपेक्षा वेगळे नाहीत. आज विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात भाषेकडे दुर्लक्ष झाले आहे. मात्र त्यासाठी 'व्यवस्थे'ला दोष देण्याचे कारण नाही. अंतिमत: ती आपलीच जबाबदारी आहे. खरे तर शालेय पाठ्यपुस्तक जरी उत्तम पद्धतीने शिकवले गेले तरी विद्यार्थ्यांना उत्तम विश्लेषण, रसग्रहण आणि चिकित्सक विचार करणे शक्य होईल; पण दुर्दैवाने ते घडत नाही,' अशी खंतही प्रा. जाधव यांनी व्यक्त केली.

## * श्रीपुंच्या आठवणीने रसिक गहिवरले

सर्जनशील संपादकाबरोबरच माणूस म्हणून श्री.पु. कसे मोठे होते, याच्या मनभरल्या आठवणी त्यांच्या सहवासात आलेल्या; किंबहुना त्यांच्या संस्काराखाली

घडलेल्या अनेक मान्यवरांकडून ऐकण्याची संधी आशय सांस्कृतिकतर्फे आयोजित 'आठवणी श्री.पुं.च्या' कार्यक्रमात मिळाली.

'पाथफाइंडर'मध्ये झालेल्या या कार्यक्रमात प्रा. रा. ग. जाधव, चित्रपट दिग्दर्शक सुमित्रा भावे, प्रभाकर पेंढारकर, मीना प्रभू सहभागी झाले होते. रेखा इनामदार-साने यांनी सूत्रसंचालन केले.

विसाव्या शतकात साहित्यात जे उत्थानपर्व उफाळून आले त्यातून आलेल्या श्री. पु. भागवतांनी लेखक, वाचक यांच्यापेक्षा साहित्यकृती महत्त्वाची असते असा संदेश 'सत्यकथे'तून दिल्याचे प्रा. जाधव यांनी सांगितले. मला लिखाण करण्याची संधी मिळाल्यामुळे सत्यकथेचा वारसा हाडामांसात भिनून गेला असून मी बोलतो ते कदाचित सत्यकथेचे संस्कार असतील, असेही ते म्हणाले.

श्री.पुं.बरोबर अगदी वैयक्तिक संबंध आल्याने साहित्यिक, संपादकांपेक्षा ते माणूस म्हणूनही मोठे असल्याचे मत सुमित्रा भावे यांनी व्यक्त केले. संयम आणि कठोरपणाबरोबरच काळाबरोबर चालण्याचे भानही त्यांना विलक्षण होते, असे निरीक्षणही त्यांनी मांडले. प्रभाकर पेंढारकर यांनीही श्रीपुंच्या मनाच्या मोठेपणाच्या अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. मीना प्रभू यांनी लेखिका म्हणून झालेल्या जडणघडणीत त्यांच्यातील साक्षेपी संपादकाचा मोठा वाटा असल्याचे सांगितले.

### * लंडन महाराष्ट्र मंडळ - वय वर्षे पंचाहत्तर.

लंडन महाराष्ट्र मंडळाच्या पंचाहत्तरीनिमित्त 'इलिंग'च्या व्हिक्टोरिया हॉलमध्ये अमृतमहोत्सवी सोहळ्यानिमित्त सादर झालेला पुणे-मुंबई कलावंतांचा 'रंगारंग गजरा' विलक्षण रंगला.

साहित्यसम्राट न. चिं. केळकरांनी घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उपस्थितीत स्थापन केलेल्या, लंडन महाराष्ट्र मंडळाच्या पंचाहत्तरीनिमित्त १, २ सप्टेंबर रोजी अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. विशाल सावंत, श्री. मोहन वर्टी, श्री. नवाथे, सौ. विजू काळे, वसंत जोशी, मंगेश गोसावी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी महोत्सवाचे नेटके आयोजन केले होते.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकरांच्या भाषणाने महोत्सवाचा शुभारंभ झाला. वर्षा भावे यांच्या मार्गदर्शनाखाली लंडनच्या बाल अभिनेत्यांच्या साथीनें 'प्रभात काळातली गाणी-दृश्य दाखवत-ऐकवत, प्रभातदर्शन सादर झाले. राहुल देशपांडे आणि शौनक अभिषेकींच्या गायन मैफलीनं पहिल्या दिवसाची सांगता झाली.

त्यागराज खाडीलकरची गाण्यांची 'मिमिक्री', दीपक देशपांडेच्या 'राजकीय नकला', स्मिता तळवलकरांना भेटलेल्या इरसाल प्रेक्षकांच्या अनुभवांचं कथन, कविवर्य अशोक नायगावकर यांनी केलेले खुसखुशीत भाष्य आणि कविता आणि सुधीर गाडगीळांनी भेटलेल्या मुलुखावेगळ्या माणसांबद्दलचे 'किस्से कथन' यांनी बहार आणली.



महोत्सवाचा समारोप संदीप खरे- सलील कुलकर्णींच्या 'आयुष्यावर बोलू काही' कार्यक्रमाने झाला. महोत्सवात आचार्य अत्रे साहित्य प्रदर्शनही मांडले होते.

हॉलंड, स्कॉटलंड, पॅरीस मधील रसिकांनी महोत्सवाला हजेरी लावली.

### * इंद्र सिन्हा- बुकर मानांकन

एका भोपाळ गॅस पीडिताच्या जीवनावर आधारित 'ॲनिमल्स पीपल' नावाच्या कादंबरीचे मॅन बुकर या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी नामांकन करण्यात आले आहे. इंद्र सिन्हा यांनी हे पुस्तक लिहिले आहे.

भोपाळ गॅस पीडितांच्या शोकात्म कथानकावर सिन्हा यांनी ही कादंबरी लिहिली आहे. त्यामुळे या पुस्तकाचे पुरस्कारासाठी नामांकन होणे तसे अपेक्षितही होते. १६ ऑक्टोबरला पुरस्काराची घोषणा होणार आहे. गेल्या वर्षी भारतीय वंशाच्या लेखिका किरण देसाई यांच्या 'द इनहेरिटन्स ऑफ लॉस' या पुस्तकाला बुकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. यावर्षी भारतीय वंशाच्या निकिता ललवानी यांच्या 'गिफ्टेड' या पुस्तकाचीही नामांकनासाठी चर्चा होती. मात्र, त्यांना हे मानांकन मिळू शकले नाही. लॉइ जोन्स यांचे पुस्तक 'मिस्टर पिप'ला हा पुरस्कार मिळेल, असे म्हटले जात आहे.

### * साधना निवडक संचाचे प्रकाशन

आपल्या समाजात अनेक प्रकारचे भेदभाव आणि वंचितपणा आहे. त्यामुळे अधिकारांचेही असमान वाटप आहे. सर्वांना समान अधिकार खऱ्या अर्थाने द्यायचे असतील, तर विविध घटकांच्या सबलीकरणासाठी सरकारने दुहेरी धोरण स्वीकारणे आवश्यक आहे, असे मत विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी व्यक्त केले.

साप्ताहिक 'साधना'च्या हीरकमहोत्सवी वर्षारंभाच्या कार्यक्रमात 'सामाजिक विकासाचे सर्वसमावेशक सूत्र काय?' या विषयावर डॉ. थोरात बोलत होते. यावेळी 'साधना'तील निवडक २०६ लेखांच्या आठ खंडांचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. 'साधना'चे संपादक डॉ. नरेंद्र दाभोळकर, 'वनराई'चे संस्थापक मोहन धारिया, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. बी. पाटील, प्रा. रा. ग. जाधव, अप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील, किशोर पवार, हेमंत नाईकनवरे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर होते.

महाराष्ट्रातील विविध चळवळींचा उल्लेख करून डॉ. थोरात म्हणाले, लोकशाही समाजवादी खरे नेतृत्व महाराष्ट्रानेच देशाला दिले. समावेशक विकासाची किंवा सर्वांना समान अधिकार देण्याची सुरुवात महाराष्ट्रात झाली आहे. जगातील विकसित देशांत सर्वसमावेशक विकासाची संकल्पना राबवण्यास सुरुवात झाली आहे. त्यासाठी त्या देशांनी दुहेरी धोरण राबविले आहे. आपल्या देशातील

भेदाभेद आणि वंचितपणाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

जाधव म्हणाले, गेल्या साठ वर्षांत 'साधना'ने एक लाख पाने प्रसिद्ध केली. त्यातून हे २०६ लेख निवडले आहेत.

### * ऑर्कुट शिकतयं मराठी!

ऑर्कुट साइटचा वापर करण्यात भारतीयांचा अधिक भरणा आहे. ऑर्कुट जरी पाश्चिमात्य देशात घडलेली साइट असली तरी त्याच्या वापरात भारतीयांचा दुसरा क्रमांक असल्याचे सिद्ध झाले आहे आणि त्यातही मराठी भाषक सर्वात जास्त आढळल्याने ऑर्कुटने सर्व सेवा मराठीतही देण्याचे ठरवले आहे.

याशिवाय बंगाली, तेलगू, तामिळ आणि हिंदी या इतर चार प्रादेशिक भाषांमध्येही ऑर्कुट येणार आहे. ऑर्कुटबद्दल सुरू असलेल्या वादांना आळा बसावा म्हणून जास्तीत जास्त भारतीय टच देण्याचा हा ऑर्कुटचा प्रयत्न असल्याचे समजते.

ऑर्कुटने देशभर केलेल्या संशोधनानंतर त्यांना भारतातील ८० टक्के ऑर्कुट जाळे या पाच भाषांमध्ये असल्याचे आढळले. त्यामुळे त्या भाषांमध्ये ऑर्कुटचे भाषांतर होणार आहे. कालांतराने इतरही भाषांमध्ये भाषांतर करण्याचा ऑर्कुट समितीचा विचार असल्याचे समजते.

सध्या ऑर्कुट ब्लॉगवर या संदर्भातील माहिती उपलब्ध आहे. जेव्हा मराठीत ऑर्कुट येईल, तेव्हा स्क्रॅप, टेस्टिमोरिअल आदी आपल्या भाषेत लिहिता येऊ शकतील. सोशल नेटवर्किंग साइटमधली स्पर्धा ओळखून या भाषांतरावर गुगलद्वारे भारतातच काम सुरू असल्याचे ऑर्कुटच्या माहीतगारांनी सांगितले.

http://en.blog.orkut.com/2007/08/orkut-hindi-bengali-marathi-tamil.html

अधिकृत ऑर्कुट ब्लॉग साइट असून या साइटवर ऑर्कुटच्या भाषांतराविषयी मते नोंदवता येऊ शकतील अशी माहिती ऑर्कुटने दिली आहे.

### * 'चक्र-सुदर्शन'चे प्रकाशन

षट्‌चक्रांची सोप्या व सुबोध शब्दांत ओळख करून देणारे डॉ. श्री. बालाजी तांबे यांचे 'चक्र सुदर्शन' हे पुस्तक १८ ऑगस्ट रोजी बालगंधर्व रंगमंदिरात ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते प्रकाशित झाले. या प्रकाशन सोहळ्याला प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. 'सकाळ'च्या 'फॅमिली डॉक्टर' या पुरवणीतून डॉ. तांबे यांनी षट्‌चक्रांचा दैनंदिन जीवनाशी असलेला संबंध स्पष्ट करणारी लेखमाला लिहिली होती. या लेखमालेचे पुस्तकात रूपांतर करण्यात आले आहे.

या पुस्तकात षट्‌चक्रांच्या संतुलनापासून शारीरिक स्वास्थ्य आणि मानसिक विकास कसा साधता येईल, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे तसेच



आरोग्य, रोगपरिहार व व्यक्तिमत्त्व विकास, योगाभ्यासाचे फायदे यांची माहिती देण्यात आली आहे.

### * 'समज' हेच आजच्या युगाचे सर्वात मोठे कर्म : डॉ. अभ्यंकर

कर्माला नि:स्वार्थ सेवा बनविण्यासाठी मुद्दाम काही करावे लागत नाही. समाजप्राप्तीचे (आत्मबोधाचे) कर्म सर्वश्रेष्ठ कर्म आहे, त्यामुळे यापुढे समजेसह नवे कर्म करा. त्यानंतर होणारे प्रत्येक कर्म तेजकर्म असेल. माणूस एक क्षणही कर्माशिवाय राहू शकत नाही. म्हणून कर्मामध्ये प्रज्ञा, प्रेमभाव असावा. भावातून भक्ती फुलते व ती ईश्वराला मिळते, असे प्रतिपादन डॉ. शंकर अभ्यंकर यांनी केले.

तेजज्ञान फाउंडेशनचे संस्थापक तेजगुरू सरश्री रचित 'कर्मात्मा आणि कर्मसिद्धान्त' या मराठी पुस्तकाचे प्रकाशन डॉ. शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी डॉ. बालाजी तांबे होते. या पुस्तकाचा अनुवाद शंकर सारडा यांनी केला आहे. त्यांनीही याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले.

### * साहित्याविषयी संतुलित दृष्टी असणारा समीक्षक.

गटांच्या मागे न जाता साहित्याविषयी संतुलित दृष्टी बाळगणारे व. दि. कुलकर्णी हे समीक्षक होते, असे मत ज्येष्ठ साहित्यक डॉ. आनंद यादव यांनी व्यक्त केले.

व. दि. कुलकर्णी स्मृती समितीच्या वतीने 'सरस्वतीच्या सान्निध्यात' या पुस्तकाचे प्रकाशन यादव यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. यादव म्हणाले, की अन्य कोणत्याही समीक्षकापेक्षा व. दि. कुलकर्णी हे वेगळे होते. कलावादाकडे पाहण्याचा तत्कालीन पुणेरी दृष्टिकोन दूषित होता, तर मुंबई-ठाण्याकडे नवकविता बहरत होती. कलावादाचा सुवर्णमध्य साधणारी समीक्षा त्यांनी केली. साहित्याच्या सर्व प्रकारांवर भाष्य केले. अभिव्यक्तीची भाषा काव्यात्म ठेवली. विज्ञानातील वस्तुनिष्ठता, काव्यात्मकता, अध्यात्म यांची जाण असणारा हा मोठा समीक्षक होता.

याप्रसंगी व.दिं.च्या लेखनाविषयी मृणालिनी शहा यांचे व्याख्यान झाले. काव्यसमीक्षेसाठी दिला जाणारा प्रोत्साहनपर पुरस्कार एकनाथ पगारे यांना देऊन सन्मानित करण्यात आले.

### * समाजमनातील विकृतीविरुद्ध वृत्तपत्रांनी लढावे : डॉ. कसबे

'समाजमनातील विकृतीविरुद्ध लढण्याची प्रेरणा भारतीय वृत्तपत्रांनी दिली आहे. स्पर्धेच्या पुढेही कायम ठेवावी,' असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक रावसाहेब कसबे यांनी केले.

राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद आणि बंधुता प्रतिष्ठान यांच्या वतीने दापोडीतील

महाविहारात आयोजित करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारवेध संमेलनाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. माधवी खरात होत्या. संमेलनात अरुण खोरे, संभाजी पाटील आणि धनंजय जाधव यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजनिष्ठ पत्रकारिता पुरस्कार कसबे यांच्या हस्ते देण्यात आला. संतसिंग मोखा यांना उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आदर्श शिक्षिका, धम्मसेवक आणि समाजसेवक पुरस्काराचे वितरण यावेळी झाले.

कसब म्हणाले, 'वृत्तपत्रांकडे समाज विश्वासाने पाहतो. त्यामुळे जनतेची कळकळ टिकून आहे. चळवळ नष्ट होते तेव्हा प्रसारमाध्यमे मुजोर बनतात. वास्तव चित्र समाजासमोर आणण्याची परंपरा वृत्तपत्रांची आहे. ही परंपरा चालू ठेवावी.'

डॉ. खरात म्हणाल्या, 'या संमेलनातून सर्जनशीलतेचे दर्शन झाले. नवनिर्मितीची वाट निर्माण करण्यासाठी संघटित स्वरूपात काम करावे लागणार आहे.'

### * पुस्तक दहीहंडी

सामाजिक समरसता व एकात्मतेचा संदेश देणाऱ्या दहीहंडी उत्सवाला काळाच्या ओघात बगल मिळत असल्याचे चित्र दिसते; मात्र 'वंदे मातरम विद्यार्थी संघटना' व 'मौर्या फाउंडेशन' यांनी यंदा प्रथमच 'पुस्तक दहीहंडी' उत्सवाचा अभिनव उपक्रम हाती घेतला.

पुणे शहर व परिसरात दहीहंडी उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. त्यासाठी लाखो रुपये खर्च करण्यात येतात. दहीहंडीसारख्या लोकउत्सवाचा विधायक संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या संघटनेने आणि या उपक्रमांतर्गत पुस्तकांची दहीहंडी ध्वनिवर्धक म्हणून पुस्तकांची भिंत उभारली होती.

स. प. महाविद्यालयात या कार्यक्रमासाठी शहरातील अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांना निमंत्रित करण्यात आले. त्यासाठी आवश्यक असलेली जुनी किंवा नवी पुस्तके विविध संघटना, सार्वजनिक गणेश मंडळे व वैयक्तिक स्वरूपातून जमवण्यात आली.

### * लायब्ररी टुरिझम

पुणे मराठी ग्रंथालयाने 'ग्रंथालय सहल' (लायब्ररी टुरिझम) या मुलांसाठी आखलेल्या अनोख्या योजनेची अधिकृत सुरुवात २६ ऑगस्ट रोजी झाली. २५ लाख रुपये खर्चून संस्थेच्या आवारातील 'पु. ल. देशपांडे मुक्तांगण बालवाचनालया'चे नूतनीकरण करण्यात आले आहे.

सुमारे सात हजार पुस्तकांसह सीडी पाहण्यासाठी कॉम्प्युटर्स आणि सभागृहाची सोय या विभागात आहे. 'ग्रंथालय सहली'त एकावेळी ९० विद्यार्थी बसू शकतील. पुण्यातील सुमारे ३०० शाळा त्यात सहभागी होतील. पुण्याबाहेरच्या शाळांनाही त्याचा लाभ घेता येईल.



### * 'गीतारहस्य' आंग्लभाषेत!

भगवान श्रीकृष्णाने सांगितलेल्या भगवद्गीतेतील कर्मयोगावर भर देऊन 'गीतारहस्य' या ग्रंथाची निर्मिती लोकमान्य टिळकांनी १९१० मध्ये केली होती. अभ्यासक डॉ. वा. द. दिवेकरांनी 'गीतारहस्या'चा इंग्रजी अनुवाद पूर्ण केला असून टिळक स्मारक ट्रस्टतर्फे तो प्रकाशित होणार आहे.

मंडालेच्या तुरुंगात असताना टिळकांनी 'गीतारहस्य' लिहिले. कर्मयोगी टिळकांनी तुरुंगातला वेळदेखील चिंतन-मनन आणि त्यावरील लेखनात घालवला.

मूळ ग्रंथ तेराशे पानी असून त्याचा पहिला इंग्रजी अनुवाद सुखटणकर यांनी केला होता. तो काहीसा अवघड असल्यामुळे नवा इंग्रजी अनुवाद हवा असे जयवंतराव टिळकांनी ठरवले. इंग्रजी अनुवाद हजार पानी असून गीतेवरील लोकमान्यांचे भाष्य म्हणून जगभरातील अभ्यासकांच्या दृष्टीनेही त्याचे स्वतंत्र महत्त्व आहे.

लोकमान्यांच्या दृष्टीने कर्मयोगाचा अर्थ अधिक व्यापक आहे. सूर्य फिरतो कारण ते त्याचे काम आहे आणि ते त्याचे कर्म कधीच चुकले नाही. या कर्मयोगातच सर्व प्रकारचे योग येतात. शंकराचार्यांच्या मते ज्ञानयोग, सांख्ययोग, भक्तियोग असे वेगळे योग मानले आहेत. या पार्श्वभूमीवर लोकमान्यांच्या मते समोर येणारे प्रत्येक कर्म करणारा खरा कर्मयोगी ठरतो. स्वत: टिळकांनी त्यांच्या जीवनात हेच तत्त्व अंगिकारले. कोणताही योग हा कर्मयोग असून तोच अधिक तर्कनिष्ठ आहे असे लोकमान्यांचे मत होते.

### * शब्दछटाकोश

'वेबस्टर्स डिक्शनरी ऑफ सिनॉनिम्स' प्रमाणे आता मराठी भाषकांच्या मदतीलाही 'अर्थछटा कोश' सज्ज झाला आहे. यामुळे मराठीतल्या सुमारे आठ हजार शब्दांच्या विविध छटा असणारे अर्थ आणि त्याचा प्रत्यक्ष वाक्यात होणारा वापर यावर प्रकाश पडणार आहे.

अर्थतज्ज्ञ डॉ. मो. वि. भाटवडेकरांनी लिहिलेला हा कोश स्नेहवर्धन प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांच्या हस्ते आणि भालचंद्र कुलकर्णी यांच्या उपस्थितीत त्याचे प्रकाशन झाले.

लंडन विद्यापीठाची अर्थशास्त्रातली पीएच.डी. मिळवणाऱ्या भाटवडेकरांनी यापूर्वी 'मराठीतला पर्यायी शब्दांचा कोश' प्रसिद्ध केला असून त्यांनीच तयार केलेला 'व्यावहारिक कोश' ही प्रकाशनाच्या वाटेवर आहे, असे त्यांच्या कन्या रंजिता कुलकर्णी यांनी सांगितले. मराठी भाषेवरील प्रेमापोटीच भाटवडेकरांनी मृत्यूपूर्वी दहा ते बारा वर्षे अर्थछटा कोशावर काम केले असल्याचे त्या म्हणाल्या.

मराठीत रूढ झालेल्या 'वशिला' या शब्दाचे अनेक अर्थ असून ओळख, लग्गा, शिफारस आणि संधान असे चार अर्थही सोबत दिले असल्याचे प्रकाशक

स्नेहल तावरे यांनी उदाहरणादाखल सांगितले. त्यापैकी लग्गा हा शब्द संस्कृतमधल्या 'लग' पासून आला, तर संधान या शब्दालाही उपाय, युक्ती, साधनांची योग्य तरतूद असे पर्यायी अर्थ दिले आहेत. यामुळे मराठी भाषेत संस्कृत अरबी आणि फार्सीसह अनेक शब्दांचा मूळ उगमही अभ्यासकांना समजू शकेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### * 'शैक्षणिक गुणवत्ता हेच सिम्बायोसिसचे बलस्थान'

'सिम्बायोसिस ही खासगी संस्था असली, तरी शैक्षणिक गुणवत्ता हेच तिचे बलस्थान असल्याने देशातील शिक्षणविश्वाला दर्जेदार पदवीधरांची देणगी संस्थेतर्फे दिली जात आहे. त्यामुळेच ज्ञानयुगाला साजेशी नवीन पिढी तयार करण्यात मदत होत आहे,' असे गौरवोद्गार राज्यपाल एस. एम. कृष्णा यांनी काढले.

सिम्बायोसिसचे संस्थापक-संचालक डॉ. शां.ब.मुजुमदार यांच्या 'सिम्बायोसिस-बायोग्राफी ऑफ ॲन आयडिया' या आत्मकथनपर पुस्तकाचे प्रकाशन झाले. मॅकमिलन प्रकाशनचे डॉ. राजीव बेरी, माजी सचिव बी. जी. देशमुख, मोहन धारिया, आर. के. लक्ष्मण, ॲड. राम जेठमलानी, सुरेश कलमाडी, कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव आदी यावेळी उपस्थित होते. डॉ. प्रकाश देशपांडे यांनी पुस्तकाचा परिचय करून दिला.

'परदेशी विद्यार्थ्यांसाठी आपुलकीचे वातावरण निर्माण करणाऱ्या सिम्बायोसिसचे शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीय नकाशावर मोलाचे योगदान आहे. केवळ स्वप्न पाहून न थांबता, गुणवत्तेची कास धरून ती पूर्ण करण्यासाठी कशा पद्धतीने मार्गक्रमण करता येईल, याचा बोध या पुस्तकामधून होत आहे. खासगी क्षेत्रातील शैक्षणिक विकासाकरिता मुजुमदार यांचे जीवनचरित्र प्रेरणादायी आहे, असे राज्यपालांनी म्हटले.

### * सकस बालसाहित्यासाठी एकत्रित प्रयत्न गरजेचे

'सकस बालसाहित्याची निर्मिती आणि प्रसारासाठी वाचनसंस्कार, रंजक लेखन, वाजवी मूल्य आणि उत्तम लेखक यांच्या एकत्रित प्रयत्नांची गरज आहे,' असे सामूहीक मत बालसाहित्य संमेलनाच्या पूर्वाध्यक्षांनी व्यक्त केले.

पुणे मराठी ग्रंथालयाच्या 'पु. ल. देशपांडे मुक्तांगण बालवाचनालया'च्या नूतनीकरणाचा प्रारंभ शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी लीलावती भागवत, अनंत पै, दत्ता टोळ, पु. ग. वैद्य, डॉ. न. म. जोशी, गिरिजा कीर, डॉ. लीला दीक्षित, विजया जहागीरदार हे बालसाहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष व्यासपीठावर एकत्र आले होते.

मुलांचा व्यस्त दिनक्रम, अवांतर वाचनाचा अभाव, बालसाहित्याविषयी पालकांचे अज्ञान, टीव्हीचा प्रभाव, मातृभाषेविषयी अनास्था, वाचनाची नावड याबाबत पूर्वाध्यक्षांनी चिंता व्यक्त केली.

भागवत म्हणाल्या, 'मुलांना अवांतर वाचनाला वेळ मिळत नाही. वाचनाची



आवड रुजविण्यासाठी गृहरचना संस्था, सोसायट्या यांनी 'घर तिथे ग्रंथालय' सारखे उपक्रम राबवायला हवेत.'

'मातृभाषेवर प्रभुत्व असणे वाचनसंस्कृती जपण्यासाठी गरजेचे आहे. वाचन हा माणुसकी निर्माण करणारा साहित्यप्रकार असल्याने माणसा-माणसातील दरी सांधण्यासाठी त्याचा योग्य संस्कार बामनावर होणे गरजेचे आहे' असे वैद्य म्हणाले.

'बालसाहित्यात मूल्यभान जपणे गरजेचे आहे. यासाठी लेखक चारित्र्यसंपन्न असावा' असे श्रीमती दीक्षित म्हणाल्या. 'वाचनालयांनी मुलांना कार्यप्रवण करणारी पुस्तके ठेवायला हवीत' असे मत गिरिजा कीर यांनी व्यक्त केले. नव्या पिढीवरील चित्रपटांचे अतिक्रमण थांबविण्यासाठी सकस पुस्तकांची गरज आहे. वाचनसंस्कार जपण्यासाठी फिरती बालवाचनालये, ई-बुक, संकेतस्थळ, पारावरल्या गप्पा असे उपक्रम राबविणे आवश्यक असल्याचे संमेलनाच्या निर्वाचित अध्यक्षा विजया वाड यांनी सांगितले. येत्या वर्षभरात महापालिकांच्या शाळांमध्ये दीडशे बालवाचनालये सुरू करण्याची घोषणा दत्ता टोळ यांनी केली.

बालसाहित्यात रंजकता हा केंद्रबिंदू ठेवून लिखाण आणि पुस्तकांच्या किमतीचा विचार वाचकाच्या दृष्टिकोनातून व्हावा, अशी अपेक्षा पुरंदरे यांनी व्यक्त केली.

### * दिलीपराज प्रकाशनाचे १५०० वे पुस्तक

'प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक दलित पुस्तकाची सर्व प्रकारचे वाचक आतुरतेने वाट पाहतात, हे बदलत्या समाजाचे लक्षण आहे. हे एक प्रकारे दलित साहित्याचे यश आहे,' असे प्रतिपादन केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.

'दिलीपराज प्रकाशन'च्या दीड हजाराव्या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. शरणकुमार लिंबाळे यांची 'बहुजन' ही 'दिलीपराज'ची दीड हजारावी कादंबरी आहे. या निमित्ताने लिंबाळे यांची इतर १३ पुस्तके खासदार रामदास आठवले यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली. दिलीपराज प्रकाशनचे राजीव बर्वे, 'मिळून साऱ्याजणी'च्या संपादिका विद्या बाळ, 'एसएनडीटी'च्या निवृत्त प्राचार्या डॉ. अश्विनी धोंगडे व डॉ. सतीश देसाई या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते.

ना. शिंदे म्हणाले,'जन्माने दलित असले तरी कर्तृत्वाने विद्वान होता आले पाहिजे. वास्तवातून पळवाट काढून दलितांच्या समस्या सुटणार नाहीत, तर वास्तवाचा स्वीकार करून त्यावर मात केली पाहिजे. १९६०-७० च्या दशकात दलित पँथरने केलेल्या चळवळीतून समाजाला दिशा मिळाली. ही चळवळ दलित साहित्यिकांची मुख्य प्रेरणा आहे.'

'आयुष्यात एकही पुस्तक न लिहीता एकदम १३ पुस्तके प्रकाशित करताना मी काहीसा दबून गेलो आहे, असे आठवले यांनी सांगताच सभागृह गदगदून हसले. 'माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी प्रस्थापितांनी नाकारली. दलित लेखकांनी केलेल्या संघर्षामुळे आता समाज बदलत आहे. यापुढील साहित्य

माणसाच्या मनाचे परिवर्तन करणारे असावे,' अशी अपेक्षा आठवले यांनी व्यक्त केली.

## * केशवसुतांच्या नावे अध्यासन निर्माण करावे

'ज्या पुण्यात केशवसुतांनी शिक्षण घेतले तिथल्या पुणे विद्यापीठात केशवसुतांच्या नावाने अध्यासन निर्माण करावे. त्यांची कविता इंग्रजी, हिंदीमध्ये आणून आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवावी,' अशी मागणी साहित्य-संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक यांनी केली. 'कविवर्य केशवसुत पुरस्कार' कवी मंगेश पाडगावकर यांना देण्यात आला.

केशवसुत यांचे नातू राजाभाऊ दामले व कुटुंबीयांतर्फे देण्यात येणाऱ्या पुरस्काराचे स्वरूप दहा हजार रुपये, शाल, मानपत्र असे आहे.

कर्णिक म्हणाले, 'केशवसुतांच्या १३६ कवितांचा संग्रह लवकरच साहित्य-संस्कृती मंडळातर्फे पुनर्मुद्रित करण्यात येत आहे. त्याचबरोबर ७० कवींच्या कवितांचे पुस्तकही प्रकाशित होत आहे. केशवसुतांचे चित्र असलेले पोस्टाचे तिकिट केंद्र सरकारने लवकरच प्रकाशित करावे.'

केशवसुत हे युगप्रवर्तक कवी होते, असे सांगून पाडगावकर म्हणाले, 'मराठी कवितेला त्यांनी भाषा प्राप्त करून दिली. कवी हा माणूस व त्याचे जीवन समजून घेतो व हे तत्त्वचिंतन कवितेतून व्यक्त करीत असतो. केशवसुतांनी भाषेच्या नव्या सर्जनशक्ती शोधून आपले चिंतन व्यक्त केले. त्यांच्या या भाषेवर आजच्याही कवींची गुजराण होत आहे. प्रत्येक कवीच्या कवितेत केशवसुत दिसतो. त्यांची कविता म्हणजे केवळ कारागिरी, उपदेशपर पद्य नव्हते, तर त्यामध्ये सर्जक निर्मिती होती. केशवसुत नसते, तर मराठी कविता वाढली नसती. मराठी भाषेवर त्यांचे कधीही न फिटणारे ऋण आहे.'

केशवसुतांच्या 'सतारीचे बोल' व 'झपुर्झा' या कवितांवर मधुरा खिरे व सहकारी यांनी नृत्याविष्कार सादर केला. गजानन परांजपे, माधुरी पुरंदरे, चंद्रकांत काळे, चैतन्य कुंटे यांनी 'काठोकाठ भरू द्या पेला' हा केशवसुतांचा कवितांवर आधारित कार्यक्रम सादर केला.

## * सत्तर वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळवणारा 'संत तुकाराम' चित्रपट.

दळणवळणाची फारशी साधने उपलब्ध नसतानाही देशाच्या सीमा ओलांडून आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मान पटकाविण्याचे श्रेय 'संत तुकाराम' या मराठी चित्रपटाने सर्वप्रथम मिळविले. त्या घटनेला ४ सप्टेंबरला सत्तर वर्षे पूर्ण झाली.

'व्हेनिस'च्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून 'संत तुकाराम'ची निवड झाली होती. नव्या युगात सीडी-डीव्हीडी आणि इंटरनेटच्या माध्यमातून मराठी चित्रपट जगभर पोचला असला, तरी सुरुवातीच्या काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी पताका फडकविण्याचे कार्य 'संत तुकाराम'मुळे झाले होते. 'प्रभात फिल्म कंपनी' निर्मित आणि विष्णुपंत दामले आणि एस. फत्तेलाल दिग्दर्शित 'संत तुकाराम' पुण्यात प्रभात चित्रपटगृहात ७ नोव्हेंबर १९३६ रोजी प्रदर्शित झाला होता. त्यानंतर मुंबईत डिसेंबरमध्ये चित्रपट रजतपटावर झळकला. 'संत तुकारामां'च्या भूमिकेतील विष्णुपंत पागनीस यांनी आणि चित्रपटाच्या सहजसाध्या हाताळणीमुळे अल्पावधीतच लोकप्रियतेचे सर्व उच्चांक मोडीत निघाले. 'प्रभात'मध्ये सलग ४१ आठवडे, तर त्यानंतर काही आठवडे 'आर्यन' चित्रपटगृहात आणि मुंबईत 'सेंट्रल' येथे सलग ५५ आठवडे चित्रपटाने प्रचंड गर्दी खेचली.

अरुणा दामले म्हणाल्या, 'चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर त्याच्या ध्वनिमुद्रिका बाजारात उपलब्ध व्हायच्या. संत तुकारामच्या ध्वनिमुद्रिकांचीही मोठ्या प्रमाणावर विक्री झाली होती. एक वर्ष झाल्यानंतर मुंबईत 'सेंट्रल' चित्रपटगृहाचे सर फिरोझ सेठना आणि अनंत हरी गद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत चित्रपटातील सर्व कलावंतांचा; तसेच 'प्रभात फिल्म कंपनी'च्या सर्व भागीदारांचा सत्कार करण्यात आला होता.'

चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर पुढच्याच वर्षी 'व्हेनिस' महोत्सवात चित्रपट दाखल झाला अन् जगात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मानही त्याने मिळविला.

## * आठा उत्तराची कहाणी

इंदिरा गांधी यांच्या राजकारणातील पुनरागमनापासून ते उत्तर प्रदेशात एकहाती सत्ता खेचणाऱ्या मायावती यांच्या यशापर्यंतचा घडामोडींचा आलेख, विविध लढे, आंदोलने व सामाजिक स्थित्यंतर अशा सन १९८० ते २००७ या काळातील राजकीय, सामाजिक घडामोडींची बखर ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक ग. प्र. प्रधान यांनी लिहिली आहे.

सन १९४० ते १९८० च्या कालखंडातील विविध घटनांवर प्रधान सरांनी 'साता उत्तराची कहाणी' लिहिली होती. आता १९८० ते २००७ या काळातील घडामोडींचा वेध 'आठा उत्तराची कहाणी : एक राजकीय बखर'मध्ये घेतला आहे.

पश्चिम बंगालचा कम्युनिस्ट, केरळचा समाजवादी, मध्यप्रदेशचा भाजपवाला, उत्तर प्रदेशातील सर्वोदयी आणि महाराष्ट्रातील काँग्रेसवाला अशी पाच पात्रे या बखरीत आहेत. त्यातील काँग्रेसवाला हा माजी मंत्री अण्णासाहेब शिंदे यांच्या पठडीतला– इंटेलिजंट पण ग्लोबलायझेशनचा खंदा पुरस्कर्ता! शिवाय रिपब्लिकन चळवळ, नक्षलवादी आणि मुस्लिम महिलांच्या प्रश्नांवर काम करणारा गट याचे प्रतिनिधीही त्यात असतील. जनसंघ, रा. स्व. संघाच्या मुशीतून घडलेल्या भाजपचा राजकीय बाज बदलून टाकणाऱ्या प्रमोद महाजन यांच्या कार्यपद्धतीवर मध्यप्रदेशातला भाजपवाला बखरीत बरेच काही सांगतो.

सशस्त्र उठावाद्वारे क्रांती करण्यास निघालेले नक्षलवादी हे मायावतींच्या एकहाती यशानंतर गडचिरोलीच्या जंगलात जल्लोष करतात. धनदांडग्यांच्या सत्ताविश्वात गरिबांचा हा पहिला विजय असल्याचे बखरीतल्या नक्षलवाद्याला वाटते.

## * सुशीलकुमार शिंदे यांचे चरित्र

चिनार पब्लिशर्स व सुशील स्नेह परिवाराच्या वतीने केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त 'सुशीलकुमार एक प्रवास' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. गोपीनाथ मुंडे, डॉ. पतंगराव कदम, उल्हास पवार, रामदास फुटाणे, कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, समारंभाचे अध्यक्ष मधुकरराव चौधरी, प्रकाशक संजय नहार, बिपिन गुपचुप, शिरीष बोधनी, निवेदक सुधीर गाडगीळ आदींच्या हा समारंभ रंगला.

गोपीनाथ मुंडे म्हणाले, ''सुशीलकुमारांची पक्की धारणा आहे. ते म्हणतात, तुम्ही विरोधक असला, तरी शत्रू नाही. म्हणूनच आमच्यात मतभेद आहेत, पण मनभिन्नता नाहीत. गेल्या विधानसभा निवडणुकीत आम्ही सत्तेवर येणार असे चित्र होते. आयत्या वेळेस सुशीलकुमार हसले आणि घोळ झाला. त्यांनी आमचा अजेंडा पळविलाच, शिवाय हातातोंडाशी आलेली सत्ताही गेली'.

'मी त्या क्षणाचा साक्षीदार आहे' अशा आपल्या खास 'ऐतिहासिक' शैलीत उल्हासदादांनी या पुस्तकाची समीक्षा केली. ''पहिल्यांदाच मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सुशीलकुमारांनी मला दादर परिसरातील एका पंजाब्याच्या हॉटेलवर नेले. 'पोलीस उपनिरीक्षक असताना इथे भरपूर चहा प्यायलो आहे. आता मंत्री झाल्यानंतर प्रथम त्याचे आभार मानलेच पाहिजेत,' असे सुशीलकुमार म्हणाले होते. तळागाळातून आल्यामुळे त्या समाजाच्या प्रगतीसाठी कायम कटिबद्ध राहिलेला हा सुसंस्कृत नेता आहे,'' अशा शब्दांत उल्हासदादांनी गौरव केला.

'स्टार टीव्हीसोबत असते बीबीसी, तसा 'हायकमांड'कडे असतो बीसीला-ओबीसी...' या वात्रटिकेसह सुशीलकुमारांचे व्यक्तिमत्त्व शब्दबद्ध करताना फुटाणे म्हणाले की, 'शरद पवार आणि बाळासाहेब ठाकरे हेच स्वयंप्रकाशित नेते आहेत. इतर मात्र दिल्लीचा प्रकाश पडला, की उजळतात. परंतु सुशीलकुमार त्याला अपवाद आहेत. सुशीलकुमारांच्या हास्याबाबत सगळेच बोलतात. परंतु, जाड पापण्यांमागे दडलेल्या भावना, अश्रू मोजक्याच लोकांना ठाऊक आहेत. आपले आयुष्य, चिंता-व्यथेचा त्यांनी कधीही बाजार मांडला नाही.'

पतंगराव कदम म्हणाले, 'तुम्हाला सांगतो, हे सुशीलकुमार, मुख्यमंत्रिपदाच्या मार्गावर तीनदा माझ्या वाटेत आले! मागे दिल्लीहून मला निरोप आला. सुशीलकुमार मध्ये आले नि म्हणाले, आपल्या दोघांना बोलाविले आहे. त्यापूर्वी माझे आणि विलासरावांचे नाव होते. मराठवाड्याला संधी मिळाली, तर ते आणि पश्चिम महाराष्ट्राला मिळाली तर मी, असे ठरले होते. प्रत्यक्षात ऐनवेळी सुशीलकुमार



मुख्यमंत्री झाले! आता पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. सुशीलकुमार आणि आमची मैत्री राजकारणाच्या पलीकडील असल्याने त्यांनी स्वत:हून फोन करून सांगितले आहे, 'मी खाली येणार नाही!' निवडणुकीत पडूनही शिवराज पाटील आता केंद्रीय गृहमंत्री झालेत, प्रतिभाताई थेट राष्ट्रपती झाल्या, सुशीलकुमारांनीही गल्ली ते दिल्लीपर्यंत अनेक पदे भूषविली. राजारामबापू आणि वसंतदादांच्या लढाईत १९६७ पासून मात्र माझाच बळी जात आहे. राजकारणामध्ये चांगले नशीबच हवे, असे आता माझे ठाम मत झाले आहे,' अशा शब्दांत त्यांनी समारोप केला.

## * अभिनेत्यांचे जाहिराती करणे खटकते— करंजिया

सिनेमासृष्टीसाठी महत्त्वाची कामगिरी करणारे आणि खरे हीरो असलेले व्ही. शांताराम, मेहबूब खान, नर्गिस, सुनील दत्त, सुरय्या यांची चरित्रे लिहिली गेली नाहीत हे दुर्दैव आहे, असे मत फिल्मफेअरचे माजी संपादक बी. के. करंजिया यांनी व्यक्त केले, तसेच अभिनय सोडून प्रसिद्ध अभिनेते जाहिराती करत असल्याबाबतही त्यांनी टीका केली.

प्रसिद्ध चित्रपट समीक्षिका अनुपमा चोप्रा यांनी लिहिलेल्या 'किंग ऑफ बॉलिवूड- शाहरूख खान' या पुस्तकाच्या मराठी आवृत्तीचे ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते १ सप्टेंबर रोजी प्रकाशन करण्यात आले. अरुणा अंतरकर यांनी मराठी अनुवाद केला आहे. यावेळी निर्माते दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा, अनुपमा चोप्रा, अमेय प्रकाशनाचे उल्हास लाटकर उपस्थित होते.

अभिनेत्यांना सिनेसृष्टीत भरपूर पैसा मिळतो. ज्या अभिनेत्यांना सर्वाधिक पैसे मिळतात तेदेखील जाहिराती करत सुटत आहेत. साबण, शेव्हिंग क्रीम यांच्या जाहिराती असणाऱ्या कलाकारांवर करंजिया यांनी टीका केली.

सिनेमासृष्टीसाठी भरीव कामगिरी करणाऱ्या खऱ्या हीरोंची चरित्रे लिहिली गेली नाहीत, अशी खंत बी. के. करंजिया यांनी व्यक्त केल्याने कार्यक्रम संपताना मुन्नाभाई एमबीबीएसचे निर्माते विधू विनोद चोप्रा यांनी त्याची दखल घेतली. व्ही. शांताराम यांचे चरित्र लिहिण्यासाठी पाच लाख रुपयांचे बक्षीस त्यांनी कार्यक्रमातच जाहीर केले.

## * 'कृष्णवेध'चे प्रकाशन

राधा, पेंद्या आणि कुब्जेने गोकुळातल्या कृष्णाचा घेतलेला ध्यास गो. नी. दांडेकरांनी 'कृष्णवेध'मधून घेतला आहे. जीवरूपातून शिवरूपाचे दर्शन घडवणारे हे लेखन वेगळ्याच आध्यात्मिक उंचीवर जाते. ही तीन केवळ लौकिक पात्रे नसून दांडेकरांच्या प्रतिभेतून संतपरंपरा सांगणारी ती एक गद्य गौळण बनते, असे मत डॉ. रामचंद्र देखणे यांनी व्यक्त केले.

डॉ. विजय देव, जावई रुचिर आणि नातू विराजस कुलकर्णी यांनी

'कृष्णवेध'चे अंशत: अभिवाचन केले.

'कृष्णवेध'मध्ये राधा, पेंद्या आणि कुब्जा ही तीन पात्रे ज्ञानेश्वरीतले सिद्धान्त आणि दृष्टांत यांच्या मिलाफातून कृष्णाची विविध रूपके वाचकासमोर मांडताना दिसतात. विशेषत: राधा आणि कृष्णाचे नाते दांडेकरांनी चिंतन, आध्यात्म आणि भावनिक मीलन याच्या पातळीवर नेऊन ठेवले आहे. राधा ही त्यातील मधुराभक्तीचे आध्यात्मिक रूप घेतलेली कृष्णयोगिनी म्हणूनच उभी राहते, असेही देखणे यांनी सांगितले.

अप्पांचा पेंद्या हा बावळट नसून चतुर, विद्वान आणि कृष्णाच्या डोक्यावर विद्वत्तेचे प्रतीक असणारे मोरपीस लावणारा त्याचा जिवलग सखा आहे. तोही कृष्णभक्तीतल्या अव्यक्तात विलीन होतो. कृष्णाच्या विरहातूनच तो आणि कुब्जा आधी भावनिक आणि मग ज्ञानाच्या पातळीवर वेध घेताना दिसतात. अतिशय तरल नाते आणि दांडेकरांच्या भाषाशैलीमुळे पारंपरिक भूमिकेला पूरक पण वेगळेच अद्‌भुत सार वाचकाच्या हाती लागते, असेही देखणे म्हणाले.

## * राज ठाकरे यांचे व्यंगचित्र साप्ताहिक

वेगळ्या वाटेचे व्यंगचित्रकार म्हणून ओळख असणारे राज ठाकरे लवकरच स्वत:चे व्यंगचित्र साप्ताहिक काढणार आहेत.

'सध्या हातात कोणतेही दैनिक नाही. अनेकजण आपल्याकडे दैनिक काढण्यासंदर्भात विचारणा करीत आहेत. कोणासोबत दैनिक काढून दुसऱ्याला नाराज करण्याची आपली इच्छा नाही. त्यामुळे माझ्या मनात व्यंगचित्र साप्ताहिक काढण्याचा विचार घोळत असल्याचे ठाकरे यांनी स्पष्ट केले.

## * 'मधुरांगण'ची पुस्तक भिशी

पुस्तके माणसाच्या जीवनात विचार देतात. अस्वस्थता निर्माण करतात, त्यातूनच आयुष्याच्या प्रत्येक वळणावर जगण्याचे नवे बळ मिळते आणि पुस्तकांच्या संगतीनेच स्वप्ने साकार होतात. म्हणूनच महिलांसाठी सकाळ 'मधुरांगण'ने सुरू केलेला पुस्तक भिशी उपक्रम नव्या युगाची, नव्या स्वप्नांची नांदी ठरेल, असा आशावाद प्राचार्य डॉ. सुशीलकुमार लवटे यांनी व्यक्त केला.

'मधुरांगण' पेंटिंग कार्यशाळेचा समारोप आणि पुस्तक भिशी उपक्रमाच्या उद्‌घाटन कार्यक्रमात ते म्हणाले, 'एक काळ असा होता, की त्यावेळी महिलांना घराचा उंबरठा ओलांडता येत नव्हता. आता महिला शिकल्या-सवरल्या. घराघरांत सर्व सुख-सुविधा उपलब्ध झाल्या, मात्र सुखी संसारासाठी संस्कृतीला महत्त्व असते. त्यासाठी पुस्तक भिशीतून वृद्धिंगत होणारी वाचन चळवळ मार्गदर्शक ठरणार आहे. साहित्य, कला याबरोबरच महिलांना व्यवसाय मार्गदर्शनाचे धडे 'मधुरांगण'सारख्या उपक्रमातून द्यावेत, असेही त्यांनी सांगितले.

कार्यशाळेंतर्गत सर्वोत्कृष्ट कलाकृती स्पर्धेत अनुक्रमे विजया भोसले, पल्लवी



पाटील, मानसी कुलकर्णी यांनी क्रमांक मिळविले. त्यांना 'पीडीलाईट'चे रफीक शेख, सोहेल खान, लकी बझारचे मुरलीधर बढे यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

## * भाभा अणुशक्ती संशोधन केंद्र - दीक्षांत समारंभ.

आण्विक क्षेत्रामध्ये सध्या जगभरात नवे पर्व (न्यूक्लिअर रेनेसाँ) सुरू झाली असून अमर्याद संधी तुमची वाट पाहत आहेत. पायाभूत संशोधनात तर सारे जग भारतात गुंतवणूक करण्यास इच्छुक आहे. अनेक ग्लोबल संस्थांना येथील तरुणांच्या बुद्धीचा वापर करायचा आहे. त्यामुळेच आपणही जगात गुंतवणूक करण्यास शिकले पाहिजे. अणुतंत्रज्ञानाच्या बहरत्या काळात तुमचे कौशल्य, ज्ञान आणि सर्जनशीलतेचा भावही वधारलेला असेल, असे चित्र पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी तरुण वैज्ञानिकांसमोर रेखाटले.

भाभा अणुशक्ती संशोधन केंद्रात प्रशिक्षण विद्यालयाच्या पन्नासाव्या दीक्षांत समारंभात बीएआरसी ट्रेनिंग स्कूलच्या आजवरच्या ४५ टॉपर्सचा पंतप्रधानांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यात सातव्या बॅचचे (१९६३) टॉपर व अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांचाही समावेश होता. राज्यपाल एस. एम. कृष्णा, मुख्यमंत्री विलासराव देशमुख, बीएआरसीचे संचालक डॉ. एस. बॅनर्जी तसेच शास्त्रज्ञ उपस्थित होते.

जीनिव्हातील 'युरोपियन सेन्टर फॉर न्यूक्लिअर रिसर्च'मध्ये भारताला मिळालेला निरीक्षकाचा दर्जा, आंतरराष्ट्रीय थर्मोन्यूक्लिअर रिसर्च रिॲक्टरच्या प्रकल्पातील मोजक्या देशांमध्ये भारताची होणारी गणना, यांचा उल्लेख करून पंतप्रधान म्हणाले : आपल्या शास्त्रज्ञांसाठी नवे क्षितिज खुले होत असताना, अणुतंत्रज्ञानाचे अन्य उपयोग नजरेआड करता येणार नाहीत. शेती, अन्नप्रक्रिया, आरोग्यसेवा तसेच उद्योगांमध्ये या तंत्रज्ञानाला महत्त्व असून बीएआरसीने विविध विद्यापीठांच्या मदतीने त्यात उल्लेखनीय कार्य केले आहे. तरुणांनी धैर्य, नावीन्याची कास धरावी आणि खुल्या मनाने नव्या कल्पना स्वीकाराव्या. जगाला सध्या आपली बुद्धी आणि कौशल्याबद्दल अपार आदर आहे, असे आवाहन पंतप्रधानांनी केले.

आण्विक स्वायत्ततेसाठी भारताने त्रिस्तरीय कार्यक्रम आखला असून त्यात थोरिअमचा वापर करण्यावर भर आहे. तसेच प्रेशराइज्ड हेवी वॉटर रिॲक्टरद्वारे फास्टर ब्रीडर रिॲक्टर्स उभारणीला गती देण्यात येईल, असे ते म्हणाले.

अणुउर्जा आयोगाला दरवर्षी ४०० ते ५०० कोटी रुपये लाभांश मिळतो. ही बीएआरसीतून शिकलेल्या वैज्ञानिक-इंजिनिअरांच्या कामाची उत्तम पावती आहे.

## * 'तुकाराम गाथा'ची कालनिर्णय आवृत्ती

जयंतराव साळगावकर यांच्या सुमंगल प्रेसने संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांची समग्र गाथा प्रकाशित केली आहे. जयपूरचे पंचखंड मठाधीश आचार्य धर्मेंद्रजी

महाराज यांच्या हस्ते रवींद्र नाट्य मंदिरात या गाथेचे प्रकाशन झाले. यावेळी जयंतराव साळगावकर, ज्येष्ठ कॉम्प्युटरतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, डॉ. स्नेहलता देशमुख, सु. ग. शेवडे तसेच इतर मान्यवर हजर होते.

*** बालसाहित्याच्या निर्मितीत सध्या मन रमले आहे : गाडगीळ**

सध्या लहान मुलांसाठी परीकथा आणि साहसकथा लिहितो आहे. शरीराने साथ दिली, तर पौराणिक काळातील सामाजिक कादंबऱ्या लिहायच्या आहेत, असे ज्येष्ठ लेखक आणि अर्थतज्ज्ञ गंगाधर गाडगीळ यांनी सांगितले. २३ ऑगस्टला त्यांनी शहाऐंशीव्या वर्षात पदार्पण केले.

'सध्या माझे मन रमते आहे, ते बालसाहित्याच्या निर्मितीत. माझ्याच काही बालकथांचे मी इंग्रजीत भाषांतर केले आहे. डॉ. भाऊ दाजी लाड, दादाभाई नौरोजी यांच्यावरील कादंबऱ्या मला अक्षरबद्ध करायच्या आहेत. उद्योगाचे जनक जमशेदजी टाटा आणि कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे यांच्यावरील कादंबरीतून मुंबई उद्योगनगरी झाली म्हणजे नेमके काय झाले, याचा आलेख मांडायचा आहे. पंडिता रमाबाई, रखमाबाई आणि सयाजीराव गायकवाड यांची मुलगी या समकालीन भारतीय स्त्रिया त्यांच्यावरील कादंबरीतून त्या काळच्या स्त्रियांचा सामाजिक क्षेत्रातील सहभाग वाचकांपुढे आणायचा आहे.'

*** पुणे विद्यापीठ ४४३ कॉलेजेस इंटर कनेक्टिव्हीटीने जोडणार.**

कॉलेजमधील प्राध्यापकांना अद्ययावत ज्ञान मिळावे, म्हणून पुणे विद्यापीठाने इंटर कनेक्टिव्हीटीच्या सहाय्याने ४४३ कॉलेजेस जोडण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आखला आहे. त्याद्वारे विद्यापीठात होणाऱ्या भाषणातील तज्ज्ञांचे विचार प्राध्यापकांना कॉलेजात ऐकता येणार असून त्यावर प्राध्यापकांना थेट प्रश्न विचारण्याची सुविधा मिळणार आहे.

डॉ. नरेंद्र जाधव यांच्या कुलगुरुपदाच्या कारकीर्दीस २४ ऑगस्ट रोजी एक वर्ष पूर्ण झाले. टिचर्स ट्रेनिंग कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम होणार आहे. त्यामध्ये ऑडिओ, व्हिज्युअल आणि डाटा यांची 'ट्रिपल कनेक्टिव्हीटी' राहणार आहे. या उपक्रमाचा पहिला टप्पा १५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण होईल. त्यासाठी दोन कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

या उपक्रमामध्ये इन्फर्मेशन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजीचा वापर करून हाय कनेक्टिव्हीटी डाटा सेंटर उभारण्यात येईल.

'जागतिक पातळीवर पुणे विद्यापीठाचे मार्केटिंग करण्यात सफल झालो असून आतापर्यंत दक्षिण आफ्रिका, जर्मनी, चीन, दक्षिण कोरिया आदी देशांतील विद्यापीठांबरोबर विद्यार्थी-प्राध्यापक देवाणघेवाण, संशोधन आदी संदर्भात करार करण्यात आले आहेत' असे श्री. जाधव यावेळी म्हणाले.



*** फास्टर फेणेच्या करामती आता इंग्रजीत**

किशोरवयीन मुलांचा हिरो बन्या उर्फ फास्टर फेणे हा ज्येष्ठ दिवंगत लेखक भा. रा. भागवत यांचा मानसपुत्र. त्याच्या पराक्रमाची गाथा वीस पुस्तकांमधून लोकप्रिय झाली होती. त्याची ६ पुस्तके इंग्रजीत येत आहेत.

प्रयोगादाखल अमेरिकेत न्यूयॉर्क आणि कॅलिफोर्निया, तसेच सिंगापूर येथे हे संच पाठवले असून त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

ही पुस्तके www.mms.digital.com या वेबसाइटवर 'ऑनलाइन' विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

*** सध्याचा काळ मराठीच्या संचिताचे पुनर्मूल्यांकन करण्याचा— प्रा. जाधव**

'आजघडीला मराठीत समीक्षकाच्या दृष्टीने आव्हानात्मक साहित्यकृती दिसत नसली, तरी यात काळजी करण्यासारखे काहीच नाही. सध्या साहित्यविचारांच्या स्वास्थ्याचा कालखंड सुरू आहे. ही तात्पुरती स्थिती आहे, हे जाणून अभ्यासकांनी मराठीच्या संचिताचे पुनर्मूल्यांकन करावे,' अशी अपेक्षा ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केली.

अभिरुची आणि पर्यायाने उच्च दर्जाचे साहित्य असू शकत नाही. चांगले, मध्यम, वाईट असे सर्व प्रतीचे साहित्य हे समीक्षकाचा अभ्यासविषय असतो. अलीकडे मराठीत येऊ लागलेले विज्ञानकथांसारखे ललितेतर विषयसुद्धा समीक्षकाच्या विचारकक्षेत आले पाहिजेत. सक्रिय समीक्षक कधीही डोळे मिटून बसू शकत नाही. त्याला प्रत्येक नवा विषय खुणावत राहतो. समीक्षेच्या प्रांतात वाचकाचा विश्वास संपादन करण्यासाठी वेळ आणि वाङ्मयीन नियतकालिकांची वानवा या गोष्टींमुळे मराठीत ताज्या दमाचे समीक्षक कमी दिसतात. अर्थात, डॉ. राजन गवस, कृष्णा किरवले, एकनाथ पगारे यांच्यासारखी तरुण मंडळी समीक्षाप्रांतात तडफेने काम करताहेत, यात शंका नाही.'

'समीक्षेच्या प्रसारासाठी निव्वळ वाङ्मयीन विचारांच्या प्रचाराला वाहिलेली नियतकालिके आवश्यक असतात,' असे सांगून प्रा. जाधव म्हणाले, 'सत्यकथा, 'अभिरुची', 'हंसमोहिनी-नवल' आदी वाङ्मयीन नियतकालिकांमुळेच १९५० नंतर मराठीत नवसाहित्य निर्माण झाले. मात्र, सध्या 'अनुष्टुभ', 'साहित्यसूची', 'वसंत'सारखे अपवाद वगळता अशी नियतकालिके नाहीत, ही साहित्याच्या विकासासाठी मोठी प्रतिकूल गोष्ट आहे. कठोर ध्येयवाद बाळगून अशी नियतकालिके चालवण्याची गरज आहे; तरच समीक्षेचे संवर्धन होऊ शकेल. मूळ पुस्तक वाचलेले असेल, तरच समीक्षा वाचेन; हा आग्रहसुद्धा वाचकाने सोडून दिला पाहिजे.' असेही ते म्हणाले.

## * पत्रकारिता आणि आईपणातून 'स्टिलबॉर्न'ची निर्मिती

पत्रकारितेची पार्श्वभूमी आणि माझ्यातील 'आईपण' यातून 'स्टिलबॉर्न' या कादंबरीची निर्मिती झाली असल्याचे लेखिका रोहिणी नंदन नीलेकणी यांनी सांगितले.

नीलेकणी लिखित 'स्टिलबॉर्न' या कादंबरीच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून 'सकाळ'चे संचालक-संपादक आनंद आगाशे, तसेच अनुवादक श्रावण मोडक, 'अमेय प्रकाशन'चे उल्हास लाटकर उपस्थित होते.

लेखिका नीलेकणी यांच्याशी प्रारंभी उज्ज्वला बर्वे यांनी संवाद साधला. नीलेकणी म्हणाल्या, 'ही कादंबरी पूर्णपणे काल्पनिक आहे. कुटुंब नियोजनासाठी गर्भनिरोधक लसीचे इंजेक्शन निर्माण करणारी कंपनी आणि आदिवासींचे जग यांच्यातील परस्परसंबंधांचा शोध घेणारी महिला पत्रकार यांच्यातील संघर्ष ही कादंबरी अधोरेखित करते.'

'माझा आर्थिक हिस्सा सामाजिक कार्यात गुंतवला आहे. 'प्रथम फाउंडेशन', कर्नाटकमधील 'अक्षरा फाउंडेशन' यांच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात सुरू केलेल्या कामाला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. 'प्रथम बुक्स'च्या मदतीने पाठ्यपुस्तकांपेक्षा मुलांना वाचायला सोपी, चित्रमय पुस्तके तयार केली आहेत. तसेच बालवाड्या सुरू केल्या आहेत,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. माशेलकर म्हणाले, 'पारंपरिक ज्ञानाचे महत्त्व जाणून घेण्याची गरज या पुस्तकातून नीलकेणी यांनी अधोरेखित केली आहे. वैद्यकीय संशोधन अतिशय खर्चिक आणि वेळखाऊ आहे. आम्ही दिलेल्या अहवालावर तीन वर्षांनंतर आता संसदेत चर्चा सुरू झाली आहे. पारंपरिक ज्ञानभांडार, आधुनिक विज्ञान आणि आधुनिक वैद्यक यांची सांगड घालूनच नव्या रोगांवरील प्रभावी औषधांची निर्मिती करणे सयुक्तिक ठरेल.'

'विभूतीपूजनामुळे आपल्याकडे शोध पत्रकारिता रुजू शकली नाही,' असे मत व्यक्त करून श्री. आगाशे म्हणाले, 'पब्लिक- प्रायव्हेट पार्टनरशिप रूढ होऊ लागली, तरी याबाबतीत माहितीच्या अधिकारासारखे हत्यार कसे वापरायचे याचे उत्तर मिळालेले नाही. शोध पत्रकारितेची गरज त्यामुळे आहे. सध्या 'ब्रेकिंग न्यूज'चे पेव फुटले आहे. पण त्या गुन्हेगारांना शिक्षा होते का, हा प्रश्न आहे. असा प्रश्न पडावा इतकी 'पब्लिक मेमरी' अल्पकालीन बनली आहे.'

## * हिंदी शिकण्याचे बुश यांचे आवाहन

हिंदी भाषेचे महत्त्व लक्षात घेऊन अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी अमेरिकावासीयांना हिंदी भाषा शिकण्याचे आवाहन केले आहे. अमेरिका, जपान, फ्रान्स येथील विद्यार्थीही हिंदी शिकण्यास उत्सुक असतात.



## * विश्व हिंदी शब्दकोश प्रसिद्धीच्या मार्गावर

हिंदीचे शाब्दिक सामर्थ्य किती आहे, हे कळावे, या दृष्टीने आंतरभारतीतर्फे (इंडियन अकादमी ऑफ लेटर्स) विश्व हिंदी बहुभाषा शब्दकोश तयार केला जात आहे त्याच्या निर्मितीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

जागतिक भाषा म्हणून हिंदीचा गौरव व्हावा, ही संकल्पना डोळ्यापुढे ठेवून आंतरभारतीने या शब्दकोशाच्या निर्मितीचे काम सुरू केले आहे. विश्व हिंदी विद्यापीठाचे अध्यक्ष आणि विधानसभेचे माजी अध्यक्ष मधुकरराव चौधरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या दोनशे पानांच्या सचित्र शब्दकोशात नेहमी वापरले जाणारे हिंदी भाषेतील मूळ एक हजार व इतर भाषातील मिळून सुमारे सात हजार मूळ शब्द आहेत, असे शब्दकोशाचे संकलक केशवराव चौधरी यांनी सांगितले.

## * भूतकाळात घडलेले विसरून एकमेकांना समजून घ्या

'आजच्या तरुणांच्या विचारसरणीत बदल होत आहे. त्यांच्यामध्ये जातींबाबत सामंजस्याची वागणूक दिसते. या पार्श्वभूमीवर भूतकाळात जे घडले ते विसरून एकमेकांना समजून घेतले पाहिजे,' असे मत ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांनी व्यक्त केले.

साहित्यिक-कलावंत प्रतिष्ठानच्या वतीने भि.शि.शिंदे लिखित आणि 'स्नेहवर्धन'तर्फे प्रकाशित 'काळोखाच्या गर्भातील दिवस' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. व्यासपीठावर 'दै. सकाळ'चे सुरेशचंद्र पाध्ये, प्राचार्य भगवान ठाकूर, स्नेहल प्रकाशनच्या डॉ. स्नेहल तावरे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप बराटे उपस्थित होते'.

श्री. शिंदे यांनी पुस्तकामध्ये चळवळीत मी किती भोगले हे सांगण्यापेक्षा समन्वयवादाची भूमिका मांडली आहे, असे सांगून फुले म्हणाले, 'सामाजिक, राजकारण आणि साहित्यातील चळवळीमध्ये दोन प्रकारची माणसे असतात. एक याकडे 'करिअर' म्हणून बघणारी; तर दुसरी मी कुठे आहे याकडे लक्ष देण्याऐवजी चळवळीत सातत्य आणि समन्वय ठेवण्यासाठी काम करणारी. शिंदे यांनी स्वत:कडे न बघता, चळवळी टिकविण्यासाठी प्रयत्न केले, असे सुप्त झरे समाजात आजही आहेत, म्हणूनच चळवळी सुरू आहेत.'

शिंदे यांचा दलित रंगभूमीवरील योगदानाचा प्रवास सांगताना पाध्ये म्हणाले, 'शिंदे यांनी 'काळोखाच्या गर्भातील दिवस' या नाटकाच्या माध्यमातून प्रस्थापितांच्या मानदंडाला आव्हान केले. पारंपारिकतेला छेद देत या नाटकातून त्यांनी रंगभूमीला नवीन दिशा दिली.'

## * 'वैदिक न्यायतत्त्वशास्त्र' पुस्तकाचे प्रकाशन

ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ भास्करराव आव्हाड यांनी लिहिलेल्या 'वैदिक ज्युरीसप्रुडन्स'

या इंग्रजी पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील यांच्या हस्ते झाले. ॲड. प्रमोद आडकर आणि सौ. अंजली चौंच यांनी या पुस्तकाचा 'वैदिक न्यायतत्त्वशास्त्र' या नावाने अनुवाद केला आहे. यावेळी कोळसे पाटील म्हणाले, 'देशाची राज्यघटना सर्व धर्मग्रंथांपेक्षा श्रेष्ठ आहे. मात्र त्यातील एकाही वाक्याची अंमलबजावणी होत नाही.' जयदेव गायकवाड, डॉ. विश्वास मेहेंदळे व्यासपीठावर उपस्थित होते. 'सिग्नेट पब्लिकेशन्स'ने हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

### * इंग्रजी भाषेत आता मराठी शब्दांनाही स्थान

साहेबाची इंग्रजी भाषाही आता म्हणावी तेवढी कर्मठ राहिली नसून भारतातील ब्रिटिश सत्तेचा कालखंड प्रदीर्घ असल्यामुळे अनेक भारतीय, तसेच मराठी असे मिळून सहा हजार शब्द इंग्रजीत रूढ होत आहेत. तसेच भाषातज्ज्ञांच्या मते बोली मराठीतही सुमारे १० हजार इंग्रजी शब्द सर्रास वापरले जातात असे एका सर्वेक्षणातून निष्पन्न झाले आहे.

आता हिंदी आणि मराठी शब्द इंग्रजीत रूढ होत आहेत, असे इंग्लंडमध्ये जाऊन केंब्रिज विद्यापीठातील इंग्रजी अध्यापनाचा अभ्यासक्रम नुकताच पूर्ण करून आलेल्या अपर्णा बापट यांनी हिंदी आणि मराठी भाषेतले साधू, सामोसा, राजा, मंत्र तसेच बंगला हे शब्द आता पूर्ण इंग्रजी म्हणूनच मान्य झाले आहेत. अशा शब्दांची संख्या आता दिवसेंदिवस वाढतानाच दिसते आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

पूर्वीप्रमाणेच 'ब्रिटिश इंग्रजी' असा आग्रह आता खुद्द केंब्रिजमधील भाषातज्ज्ञही धरत नाही. त्यांनीही आता 'भारतीय इंग्रजी' हे स्वतंत्र इंग्रजी असल्याचे मान्य केले आहे. त्याला कारण भारतीय लेखकांनी इंग्रजीमध्ये गेल्या शंभर वर्षात विपुल लेखन केले आहे.

### * 'बांधव'चा शुभारंभ

इतर भाषांचा दुस्वास न करता मराठी भाषेचा वापर केल्यानेच मराठी जगेल, असे मत डॉ. वि. भा. देशपांडे यांनी व्यक्त केले.

'मराठी भाषा परिषदे'तर्फे सुरू करण्यात आलेल्या 'बांधव' या नियतकालिकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले.

ते पुढे म्हणाले, ''मराठी भाषेच्या भवितव्याविषयी विविध व्यासपीठावरून प्रतिकूल बोलले जाते. इंग्रजीच्या आक्रमणाने मराठी मृतप्राय होत असल्याचे म्हटले जाते. पण मला तसे वाटत नाही. आपण मराठीचा स्वच्छ आणि स्पष्ट वापर करण्याची वेळ आली आहे. मराठीत स्वाक्षरी आणि घरावर मराठी पाटी ही त्याची सुरवात आहे. भाषेचा संबंध संस्कृतीशी आणि अभिरुचीशी असतो.''

''इंग्रजी शब्दाविना मराठी संभाषण, वाचन, लेखन प्रचारासाठी 'बांधव' नियतकालिक काढण्यात येणार आहे,'' असे परिषदेचे संस्थापक संचालक नीलकंठ फडके यांनी सांगितले.

### * ''पटावरची प्यादी'तून मूल्यात्मक संदेश'

''राजकीय क्षेत्र, प्रसारमाध्यमे आणि समाजाचे कार्य कसे असावे, याविषयी मांडणी करण्याचा प्रयत्न 'पटावरची प्यादी'ने केला आहे. या तिन्ही घटकांपयंत मूल्यात्मक संदेश पोचवण्याचे कार्य ही राजकीय कादंबरी करेल,'' अशी अपेक्षा ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी व्यक्त केली.

नीलिमा रविकिरण साने यांनी लिहिलेल्या आणि 'पायल पब्लिकेशन्स'ने प्रसिद्ध केलेल्या 'पटावरची प्यादी' कादंबरीचे प्रकाशन 'लोकसत्ता'चे सहायक संपादक अरविंद व्यं. गोखले यांच्या हस्ते झाले, त्यावेळी डॉ. नवलगुंदकर अध्यक्षस्थानावरून बोलत होते. व्यासपीठावर ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा हेही होते.

डॉ. नवलगुंदकर म्हणाले, 'साने यांच्या कादंबरीने समाजाला जो मूल्यात्मक संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे, तो कालबाह्य झालेला नाही. माध्यमांनीही सत्प्रवृत्तींचा पाठपुरावा करावा, असे सुचवण्याचे काम ही कादंबरी करते.

'राजकीय पटलावर घडलेल्या घटनांची उत्तमप्रकारे केलेली मांडणी,' असे 'पटावरची प्यादी'चे वर्णन करून श्री. गोखले म्हणाले, ''पत्रकारितेमुळे साधे-सोपे आणि हृदयस्पर्शी लेखन करण्याची जी हातोटी सानेंना अवगत झाली, तिचा यथोचित उपयोग त्यांनी कादंबरीलेखनासाठी करून घेतला आहे. कादंबरीचे कथानक वाचकाला खिळवून ठेवते, हे नीलिमाताईंचे यश आहे. शैली उत्तम राखूनही भाषेच्या गुंत्यात अडकून न पडण्याचे कसब त्यांना साधले आहे. त्यांच्या धाडसी लेखनात राजकीय कार्यकर्त्यांची पोटतिडीक दिसते. त्यांची भाषा ही कथा-कादंबरीला साजेशीच आहे.''

सारडा म्हणाले, ''प्रस्तुत पुस्तक ही राजकीय थरारकथा आहे. वाचकाला खिळवून ठेवण्याची सानेंच्या लेखनातील ताकद विलक्षण आहे. अल्पावधीत घडणारे नाट्यपूर्ण कथानक असे स्वरूप असलेल्या या थरारकथा अलीकडे मराठीत राजन खान, ह. मो. मराठे, पंकज कुरूलकर यांच्या लेखनातून येऊ लागल्या आहेत.''

### * संगमनेर इतिहास संशोधन मंडळ

संगमनेर इतिहास संशोधन मंडळाच्या वतीने सुप्रसिद्ध कवी व शाहीर अनंत फंदी यांच्या नावाने जानेवारी २००८ मध्ये **'कवी अनंत फंदी साहित्य पुरस्कार'** प्रदान करण्यात येणार आहेत.कादंबरी,कथासंग्रह, कवितासंग्रह,चरित्र-आत्मचरित्र, बालसाहित्य,समिक्षा, माहितीपर साहित्य व इतर सर्व प्रकारच्या साहित्यकृतीस प्रत्येकी १ हजार १११ रुपये रोख,स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.या पुरस्कारासाठी जानेवारी २००५ ते ऑक्टोबर २००७ दरम्यान प्रकाशित पुस्तकांच्या

दोन प्रती संबंधित लेखकांनी/प्रकाशकांनी, स्वत:च्या अल्पपरिचयासह ३० ऑक्टोबर २००७ पर्यंत पाठवाव्यात.


**संपर्क :** संतोष खेडलेकर (कार्याध्यक्ष-संगमनेर इतिहास संशोधन मंडळ), साईसमर्थ, घासबाजार, संगमनेर, जि.अहमदनगर, मो.०९८२२०९७८०९

## * शब्दस्नेह वाचनालयास एक वर्ष पूर्ण.


कर्वेनगर, पुणे येथील 'शब्दस्नेह वाचनालयाला' २ ऑक्टोबर २००७ रोजी एक वर्ष पूर्ण झाले. संचालिका सौ. स्नेहलता मोहन छत्रे यांनी गेल्या दसऱ्याच्या मुहूर्तावर या वाचनालयाची स्थापना केली. आज संपूर्णत: संगणकीकृत असलेल्या अत्यंत आधुनिक अशा या वाचनालयास कर्वेनगर परिसरातील मराठी आणि इंग्लिश रसिक चोखंदळ वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. अवघ्या एका वर्षातच 'शब्दस्नेह' च्या सभासद संख्येनी ६०० आकडा पार केला. मराठी विभाग सौ. छत्रे सांभाळतात इंग्लिश विभाग त्यांचा मुलगा मिहिर सांभाळतो तर वाचनाबद्दल प्रेम असणाऱ्या त्यांच्या सहाय्यिका आपलेपणानी हवे ते पुस्तक देण्यास तत्पर असतात.

नुसतीच पुस्तकांची देवाणघेवाण न करता मैत्रीचे नाते जोडतांना विविध साहित्यिक उपक्रमांचे विनामूल्य आयोजन हे 'शब्दस्नेह' चे खास वैशिष्ट्य आहे. 'साहित्यिक गप्पा'. 'लेखक आपुल्या भेटीला' इ. कार्यक्रमांच्या मध्ये आत्ता पर्यंत सुप्रसिध्द लेखिका सौ. ज्योती दाते, सौ. मंगला गोडबोले, श्री. अनिल अवचट इ. मान्यवरांच्या व्याख्यानांना रसिकांनी भरभरून दाद दिलेली आहे.

❒



अखिल भारतीय प्रकाशक संघटनेच्या वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार स्विकारताना डॉ. किरण बेदी यांच्या हस्ते स्विकारताना मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. अनिल मेहता.




## आयएसआयच्या भारतविरोधी कारवायांची सर्वंकष माहिती

# आयएसआयच्या कारवाया

**पदम शर्मा**

**अनु. अरुण मांडे**

भारतात होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानच्या आयएसआय या गुप्तहेर संघटनेचा मोठा हात असतो.

प्रत्येक देशाचे गुप्तहेर खाते असते आणि स्थानिक, प्रादेशिक तसेच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर ते काम करते. भारतातही इंटेलिजन्स ब्युरो यांच्यातर्फे देशांतर्गत तर रिसर्च अॅन्ड अॅनालिसिस विंग (रॉ) आंतरराष्ट्रीय पातळीवर हेरगिरीचे काम चालते. विविध बाबींसंबंधी माहिती गोळा करणे, तिची छाननी करणे, विश्लेषण करणे आणि त्या माहितीच्या आधारे आवश्यक तेव्हा योग्य ती कृती करणे हे काम गुप्तचर खाते करीत असते. प्रशिक्षित अधिकाऱ्यांमार्फत घातपाती कारवाया करणे, कटकारस्थानांचा छडा लावणे आणि त्यांचा बंदोबस्त करणे, यादृष्टीनेही गुप्तहेर यंत्रणा कार्यरत असतात.

पाकिस्तानची गुप्तहेर संघटना इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स (आयएसआय) ही १९७१ च्या भारत-पाक युद्धानंतर भारत-पाक बॉर्डर विंग म्हणून आपले जाळे पसरत राहिली आहे. सुमारे २५ हजार प्रशिक्षित गुप्तहेर तिच्यात काम करीत आहेत. आयएसआय पाकिस्तानी लष्कराच्या आणि संरक्षणखात्याच्या नियंत्रणाखाली असून, अडीच अब्ज रुपयांची वार्षिक तरतूद तिच्यासाठी करण्यात आली आहे. भारतातही संघटनेने आपली पाळेमुळे खोलवर रुजवलेली आहेत. आयएसआयची माणसे वकिलातींमध्ये आहेत. विविध आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये परराष्ट्र खात्यामार्फत पसरलेली आहेत. नवी दिल्ली, ढाका, काठमांडू येथे पाक वकिलाती नाहीत; तरीही पाक हायकमिशनमध्ये काम करणारी निम्मीअधिक माणसे आयएसआयची असावीत असा अंदाज आहे. इंटरसर्व्हिसेस फेडरल इंटेलिजन्सतर्फे पाकिस्तान या माणसांना भारतात पाठवण्यापूर्वी त्यांना प्रशिक्षित करणे; त्यांच्यामार्फत घातपाती



**इंटरसर्व्हिसेस फेडरल इंटेलिजन्सतर्फे पाकिस्तान या माणसांना भारतात पाठवण्यापूर्वी त्यांना प्रशिक्षित करणे; त्यांच्यामार्फत घातपाती कारवाया घडवून आणते, माफियांच्या हत्या घडवून आणते, बनावट नोटा चलनात घुसवते आणि खोट्यानाट्या बातम्या किंवा अफवांचा प्रसार करते.**

कारवाया घडवून आणते, माफियांच्या हत्या घडवून आणते, बनावट नोटा चलनात घुसवते आणि खोट्यानाट्या बातम्या किंवा अफवांचा प्रसार करते. अमेरिकेच्या सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी (सीआयए) च्या मदतीने पाकिस्तानी आयएसआयने आपल्या कार्यपद्धतीत अद्ययावतपणा आणला आहे. ह्युमिंट (ह्युमन एलिमेंट- माणसांचे मतपरिवर्तन, धर्मप्रसार, घातपात, जातीय दंगे, बॉम्बस्फोट, माफिया आणि गुन्हेगारांशी संधान हा सर्व मानवी संबंध-संपर्कातून कार्यभाग), टेकचिंट (टेक्निकल अद्ययावतपणा- रात्रीच्या अंधारात दिसण्यासाठी उपकरणे, फोन टॅप करून संभाषण चोरून ऐकणे, मानवविरहित विमाने इ.), सिजिंट (सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर- शत्रूचे संदेश पकडणे, संदेश डी-कोड करणे), एलिंट (इलेक्ट्रॉनिक इंटेलिजन्स, उपग्रहांद्वारे माहिती गोळा करणे), परमाणूविज्ञान, क्षेपणास्त्रे, रासायनिक आणि जैविक अस्त्रे, राजकीय प्रणालींचे विश्लेषण, दहशतवादी कारवायांचे नियोजन, संवेदनक्षम स्थळांचे छायाचित्रण वगैरे कामे आयएसआयद्वारे करण्यात येतात. हवालाच्या व्यवहाराद्वारे भारतीय अर्थव्यवस्था डळमळीत करण्यासाठीही आयएसआय विविध मार्ग चोखाळत असते. बनावट नोटा व्यवहारात आणणे, मादक द्रव्यांची चोरटी निर्यात करून मिळणारा पैसा दहशतवाद्यांना पुरवणे वगैरे कामेही पाकिस्तानी गुप्तहेर यंत्रणांतर्फे चालू असतात.

आयएसआयच्या या कारवायांची व्याप्ती गेल्या काही वर्षांत भारतीय भूमीवर अनेक घातपात घडवून आणण्यास कारणीभूत असून, त्यांना आवर घालणे भारताला फारच अवघड जात आहे.

जनरल मुशर्रफ हे या आयएसआयच्याच मदतीने पाकिस्तानचे प्रेसिडेंट बनले आणि त्यांनी या यंत्रणेचा वापर करून कारगिल मोहीम राबवली. तालिबानच्या दहशतवाद्यांना पाकिस्तानात आश्रय, प्रशिक्षण, शस्त्रमदत देऊन काश्मीरमध्ये तर दहशतवादी हल्ल्यांचे सत्र चालूच ठेवले आहे. भारतीय संसदेवर हल्ला, लाल किल्ल्यातील स्फोट, मुंबई-हैदराबाद वगैरे ठिकाणी बॉम्बस्फोट या सर्व प्रकरणात पाकिस्तानचा हात आहे किंवा पाकिस्तानची प्रेरणा आहे हे दाखवणारे अनेक पुरावे पुढे आले आहेत.

**इस्लामची जिहादची संकल्पना मुस्लीम मानसिकतेच्या जडणघडणीत केंद्रवर्ती आहे. तिचाही उपयोग आयएसआयसारख्या संघटना करून घेतात. पाकिस्तानमध्ये अठरा दहशतवादी संघटना आहेत. त्यांनी मुताहिदा जिहादी कौन्सिल ही संस्था स्थापन केली आहे.**

आयएसआय ही गुप्त संघटना आहे आणि तिचे कार्यही बरेच गुप्तपणे चालते. भारतात जे दहशतवादी हल्ले वा बॉम्बस्फोट चालू आहेत त्यामुळे सामान्य माणसांचा बळी जात असून, एकूणच असुरक्षिततेची भावना वाढत आहे.

या संघटनेबद्दल विविध प्रकारची माहिती देणारे पदम शर्मा या भारतीय पोलिस सेवेतील निवृत्त उपमहानिरीक्षकांचे 'आयएसआय ऑफ पाकिस्तान ॲन्ड इट्स ॲक्टिव्हिटीज' हे पुस्तक फार उपयुक्त आहे. त्याचे मराठी भाषांतर अहमदनगरचे अरुण मांडे यांनी केले असून ते 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने प्रसिद्ध केले आहे.

आयएसआयची स्थापना, तिची उद्दिष्टे, तिच्यात सामील होणाऱ्यांची निवड व प्रशिक्षणाची पद्धत, भारतातील तिची पाळेमुळे, भारतीय माफियांशी तिचे असणारे संबंध, भारतीय अर्थव्यवस्था मोडून काढण्यासाठी चाललेले प्रयत्न, भारतातील इस्लामी विद्यार्थी चळवळ, काश्मीरमधील दहशतवाद, अफगाणिस्तानातील तालिबानशी तिचे असणारे संबंध, लष्करे ए तोयबा या संघटनेला तिची होणारी मदत, ओसामा बिन लादेनशी तिचे असणारे संबंध– अशा अनेक विषयांच्या अनुरोधाने पदम शर्मा यांनी आयएसआयच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेचा वा नापाक इराद्यांचा भयावह पट उलगडून दाखवला आहे. इस्लामची जिहादची संकल्पना मुस्लीम मानसिकतेच्या जडणघडणीत केंद्रवर्ती आहे. तिचाही उपयोग आयएसआयसारख्या संघटना करून घेतात. पाकिस्तानमध्ये अठरा दहशतवादी संघटना आहेत. त्यांनी मुताहिदा जिहादी कौन्सिल ही संस्था स्थापन केली आहे. आयएसआयशिवाय या संस्थेचे पानही हलत नाही. या अठरा संघटनांमधील एखादी संघटना किंवा एखादा गट फारच प्रभावी– प्रबळ होत असल्याची शंका आली तरी आयएसआय तिच्यात फूट पाडून, पैसा, शस्त्रे आणि वाहने पुरवून नव्या नेत्याकडे तिची सूत्रे जावीत अशी व्यवस्था करते. आयएसआयने या संघटनांचा पाठिंबा काढून घेतला तर काश्मीरमधील अतिरेकी कारवाया ताबडतोब थंडावतील असे हरकत-उल-मुजाहिदीनचा नेता मौलाना फजलर रेहमान याने 'आउटलुक'ला दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते (२५-९-२०००).



**आयएसआयने अनेक जिहादी संघटनांचा हस्तक म्हणून वापर केलेला आहे. या दहशतवादी जिहादींच्या १८ संघटना इ.स. २००० मध्ये होत्या. त्यांनी मुताहिदा जिहादी कौन्सिलची स्थापना करून, अफगास्तिान आणि भारतात मादकद्रव्यांचा आणि शस्त्रांचा चोरटा व्यापार चालवला आहे.**

आयएसआयचे हस्तक भारतात येऊ शकतात आणि येथे निर्वेधपणे राहू शकतात याची अनेक कारणे आहेत. पाकिस्तान व भारत या दोन्ही देशांतील माणसांच्या शारीरिक ठेवणीत, रंगरूपात साम्य आहे. भाषेत सारखेपणा आहे. सीमारेषा ओलांडणे त्यामानाने सोपे आहे. दळणवळण यंत्रणा, रेल्वे, विमानवाहतूक, बस या सर्वांचा वापर सुलभ आहे. पाकिस्तानातील मुस्लीम भारतातील दर्ग्यांना व प्रार्थनास्थळांना भेटी देण्याच्या निमित्ताने व्हिसा मिळवू शकतात. राजकीय-सामाजिक भ्रष्टाचार आणि लाचखोरी यामुळे अवैध प्रवेश करणे अवघड उरलेले नाही. बेकारी व गरिबी यामुळेही तरुणवर्गाला अतिरेकी आपल्या गटात आकृष्ट करू शकतात. भारतीय न्यायव्यवस्था वा शासनसत्ता सहिष्णु व सहनशील आहे. भारतातील विभाजनवादी गट/संघटना याही आयएसआयशी संधान साधून येथे घातपाती कृत्ये घडवण्यात आघाडीवर असतात.

बब्बर खालसा, खलिस्तान कमांडो फोर्स-पंजवार गट, झफरवाल गट, खलिस्तान लिबरेशन फोर्स, भिंदरवाले टायगर फोर्स यांचे आणि आयएसआयचे संबंध होते असे पुरावे मिळालेले आहेत. नेपाळमार्गे अनेक घातपाती संघटनांचे सदस्य भारतात प्रवेश मिळवतात. नेपाळमधूनही भारतविरोधी कृत्यांना पाठबळ मिळते. पदम शर्मा यांनी याबाबत 'टाइम्स', 'इंडियन एक्स्प्रेस', 'आउटलुक' वगैरे वृत्तपत्र-नियतकालिकातील बातम्या उद्धृत करून यावर बराच प्रकाश टाकला आहे.

आयएसआयने अनेक जिहादी संघटनांचा हस्तक म्हणून वापर केलेला आहे. या दहशतवादी जिहादींच्या १८ संघटना इ.स. २००० मध्ये होत्या. त्यांनी मुताहिदा जिहादी कौन्सिलची स्थापना करून, अफगास्तिान आणि भारतात मादकद्रव्यांचा आणि शस्त्रांचा चोरटा व्यापार चालवला आहे. 'जिहाद' म्हणजे पवित्र युद्ध. बदला घेण्याची भावना मनात न आणता आत्मशुद्धी करणे, मनातील नकारात्मक विचारांशी संघर्ष असा मूळ अर्थ आहे; परंतु 'सर्व जगात इस्लाम धर्म पसरवा. त्यासाठी जे मुस्लीम धर्म स्वीकारत नाहीत त्यांना ठार करा' असा आता जिहादचा अर्थ रूढ झाला आहे. इस्लामी राष्ट्राविरुद्ध कोणीही युद्ध केले तर 'जिहाद' पुकारून त्या इस्लामेतर राष्ट्राचा नायनाट करणे असे आवाहन केले

**काश्मीरमधील पाक दहशतवादी कारवाया यादेखील त्यांच्या दृष्टीने जिहादच. पदम शर्मा यांनी पाकिस्तानात जिहाद हा पैशाचे उत्पादन करणारा एक कारखाना झाला आहे, तो एक उद्योग झाला आहे असा विचार मांडला आहे**

जाते. अफगाणिस्तानातील तालिबानचे रशियाविरुद्ध युद्ध हे इस्लामच्या लेखी जिहादच होय. काश्मीरमधील पाक दहशतवादी कारवाया यादेखील त्यांच्या दृष्टीने जिहादच. पदम शर्मा यांनी पाकिस्तानात जिहाद हा पैशाचे उत्पादन करणारा एक कारखाना झाला आहे, तो एक उद्योग झाला आहे असा विचार मांडला आहे (७७) आयएसआय आणि काही अरब देश पाकिस्तानला जिहादी अतिरेकी बनवण्यास जबाबदार आहेत. मादकद्रव्यांचा चोरटा व्यापार हा या अतिरेक्यांना पैसा पुरवतो. काश्मीर हा आमच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे' हे पाकचे वक्तव्य कसे फसवे आहे याचे विवेचन शाहीद एम अमीन यांनी फ्रॉम काश्मीर– इल्युजन अॅन्ड रिॲलिटी' या ग्रंथात केले आहे. पदम शर्मा यांनी त्याचा हवाला देऊन काश्मीरमध्ये जनमत घेतले तरी लडाख, जम्मू हे भाग गैरमुस्लीम असल्याने हे जनमत इस्लामविरोधी जाईल असे त्यांना वाटते. (८०)

अमेरिकेचे दहशतवादविरोधी धोरण हे ११० मजली वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यानंतर (११ सप्टेंबर २०००) अधिक आक्रमक बनले आहे असे सकृतदर्शनी वाटते. या हल्ल्यात ५००० माणसे ठार झाली. १४ बिलियन डॉलर्सचे गुंतवणूकदारांचे नुकसान झाले. ओसामा बिन लादेनच्या तालिबानी अल कायदा संघटनेवर बंदी घालण्यात आली तरी त्याला अजूनही पकडण्यात अमेरिकेला यश आलेले नाही. पाकिस्तानने त्याला आश्रय दिला आहे असे अधूनमधून प्रसिद्ध होते; परंतु पाकिस्तानचे अध्यक्ष मुशर्रफ त्याबाबत कानावर हात ठेवत असतात. पाकिस्तान दहशतवाद्यांना आश्रय देते, प्रशिक्षण देते, हे ठाऊक असूनही अमेरिका पाकिस्तानला मदत करते. इ.स. २००१ मध्ये अमेरिकेने पाकचे ३० बिलियन डॉलर्सचे कर्ज माफ केले. ओसामा बिन लादेनला शोधून काढण्यासाठी पाकिस्तानला खूष ठेवण्याचा अमेरिकेचा इरादा आहे. अफगाणिस्तानातले तालिबानी सरकार उलथून टाकण्यासाठी व तेथे अमेरिकाधार्जिणे सरकार स्थापन करण्यासाठी अमेरिकेने अफगाणिस्तानावर आक्रमण केले (ऑक्टोबर २००१). नोव्हेंबर २००१ मध्ये अमेरिकेच्या ८०० लढाऊ विमानांनी मजार-ए-शरीफवर हल्ला करून ते शहर ताब्यात घेतले. ओसामा बिन लादेन अण्वस्त्रांची खरेदी करण्यासाठी प्रयत्नशील



आहे हा अमेरिकेचा दावा युरोपच्या देशांना घाबरवण्यासाठी आहे– असा आरोप ओसामा बिन लादेनने एका मुलाखतीत केला...

**दहशतवाद्यांचे, अतिरेक्यांचे भारतात चाललेले उपद्व्याप रोखण्यात आपण अजून कमी पडत आहोत हे स्पष्ट आहे. या पुस्तकामुळे आयएसआयबद्दल बरीचशी अज्ञात माहिती आपल्याला कळते. सर्वसामान्य वाचकांना त्यामुळे वृत्तपत्रातील बातम्यांचे गांभीर्य अधिक जाणवू शकेल.**

आयएसआयच्या कारवायांच्या निमित्ताने गेल्या काही वर्षांतील एकूणच जगभरात चाललेल्या दहशतवादी घडामोडींचा परामर्श या पुस्तकात घेतला गेला आहे.

आयएसआयशी संबंधित असणाऱ्या दीनदार अंजुमन, डेमोक्रॅटिक फ्रीडम पार्टी, जमात ए इस्लामी, हुरियत कॉन्फरन्स वगैरे संघटनांची माहिती एका प्रकरणात आलेली आहे.

दहशतवाद रोखण्यासाठी भारताने केलेले प्रयत्न (सिमी आणि इतर संघटनांवर बंदी, पोटो वटहुकूम, एसटीडी व आयएसडी सेवांचे स्थगितीकरण) विसाव्या प्रकरणात देण्यात आलेले आहेत.

इ.स. २००२ पर्यंतच्या घटनांचाच परामर्श या पुस्तकात घेतला गेला आहे; त्यानंतरही दहशतवादाची व्याप्ती वाढतच चाललेली आहे. अमेरिकेची भूमिका अजूनही पाकिस्तानला चुचकारणारी आहे. आता तर खुद्द पाक शहरात देखील दहशतवादी आत्मघातकी बॉम्बस्फोट सुरू झाले आहेत. पाकिस्तानमध्ये निवडणुका घेण्याचा इरादा प्रेसिडेंट मुशर्रफ यांनी जाहीर केला आहे. आयएसआय या गुप्तचर संघटनेचे भवितव्य काय असा प्रश्न त्यामुळे कोणाला पडेल. नवीन सत्ताधीशांनाही तिच्या कलानेच धोरणे ठरवावी लागतील अशी शक्यता आहे. पाक लष्कराच्या पाठिंब्याशिवाय तेथे लोकशाही नांदणे अशक्य आहे. भारताच्या दृष्टीने आयएसआय ही मोठीच डोकेदुखी आहे. आपली गुप्तचर यंत्रणा आयएसआयच्या तुलनेत निष्प्रभ ठरत आहे का या प्रश्नाचाही गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. दहशतवाद्यांचे, अतिरेक्यांचे भारतात चाललेले उपद्व्याप रोखण्यात आपण अजून कमी पडत आहोत हे स्पष्ट आहे. या पुस्तकामुळे आयएसआयबद्दल बरीचशी अज्ञात माहिती आपल्याला कळते. सर्वसामान्य वाचकांना त्यामुळे वृत्तपत्रातील बातम्यांचे गांभीर्य अधिक जाणवू शकेल.

**पृष्ठे: १९६ ● किंमत : १५० रु. ● सभासदांना: १०५रु. ● पोस्टेज:२५रु.**


आदिमाता मासिक
जाहिरात



## वयोमानाच्या सव स्तरासाठी योग व ध्यानाचे महत्व

**सर्व वयोगटांसाठी**
**योगसाधना आणि ध्यानधारणा**

**बिजयालक्ष्मी होता**
**अनु. प्रशांत तळणीकर**




सर्व वयोगटांसाठी योगसाधना आणि ध्यानधारणा या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे पाच वर्षाच्या मुलापासून वयोवृद्धापर्यंत वेगवेगळ्या वयोगटातील व्यक्तींना योग्य अशी आसने कोणती आणि ती करण्याचे तंत्र यांचे अत्यंत सुलभ शैलीत केलेले विवेचन. विजयालक्ष्मी होता यांनी वय वर्षे ५, वय वर्षे ६, वय वर्षे ८, वय वर्षे १३ ते १८, तारुण्य, गर्भारपण, वयोवृद्ध असे वयोगट पाडलेले असून, त्या त्या वयात कोणत्या शारीरिक अवयवांच्या विकासाला प्राधान्य द्यायचे त्या अनुषंगाने कोणकोणती आसने (योगक्रिया) कराव्यात याबद्दलची माहिती थोडक्यात दिली आहे.

पाचव्या वर्षी मुलामुलींच्या फुफ्फुसांच्या वाढीकडे लक्ष देण्याची गरज असते. फुफ्फुसे ही अल्वियोली नामक हवेच्या लहानलहान असंख्य पिशव्यांनी बनलेली असतात. या पिशव्यांची वाढ वयाच्या आठव्या वर्षापर्यंतच होते. नंतर नाही. त्यामुळे या वयात सिंहासन, मकरासन, पद्मासन, भ्रमरी अशी आसने केल्यास फुफ्फुसे बळकट होतात, फुफ्फुसांना पूर्ण फुगवण्यासाठी ही आसने मदत करतात, त्यामुळे फुफ्फुसांची लवचिकता वाढून एकूणच आरोग्य उत्तम राहते. फुफ्फुसामध्ये जेवढी हवा जास्त तेवढा प्राणवायूचा पुरवठा जास्त होतो. फुफ्फुसाचा आकार जेवढा जास्त, तेवढी जास्त हवा व्यक्ती श्वासातून जास्त घेऊ शकते. फक्त १५ मिनिटांत सिंहासन, मकरासन, पद्मासन, भ्रमरी ही चारही आसने करता येतात. पाचव्या वर्षी मुलामुलींनी ही आसने केल्यास फुफ्फुसांची क्षमता आयुष्यभरासाठी वाढून प्राणवायूचा पुरेसा पुरवठा शरीराला होण्याची सुविधा अनायास प्राप्त होते.

सहाव्या वर्षी स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढवण्यावर भर देणे इष्ट ठरते.

**तेरा ते अठरा वर्षे या वयोगटातील पौगंडावस्थेतील मुले अनेकदा बेताल वागतात, आक्रमक होतात, मुरमं, पुटकुळ्या, दृष्टिदोष, श्रवणदोष या वयात जाणवू लागतात. इंडा (मानसिक उर्जा), पिंगळा (शारीरिक उर्जा) यांच्यातील संतुलन बिघडल्याने मुले अबोल, शांत, आक्रमक, हिंसक होऊ शकतात.**

सहा ते बारा ही वर्षे शारीरिक हालचालींमध्ये वैविध्य आणण्यासाठी उपयुक्त ठरतात; त्यालाच स्मरणशक्ती आणि एकाग्रता यांची जोड मिळाली तर बौद्धिकदृष्ट्याही मुलामुलींची प्रगती होत राहते. आनंदमदिरासनाने दोन भुवयांच्या मधील बिंदूवर लक्ष केंद्रित करून मज्जासंस्थेचे आरोग्य सुधारता येते. पदधीरासनामुळे सिंपथेटिक व पॅरासिंपथेटिक संस्थांच्या कार्यात सुसंगती राहून मानसिक क्षमता गतिमान होतात.

आठव्या वर्षी शारीरिक वाढ नियंत्रित करणाऱ्या पिट्युटरी ग्रंथींवर मौजीबंधन आणि गायत्री मंत्र, सूर्यनमस्कार याद्वारे पायनियल ग्रंथींच्या संवर्धनाची प्रक्रिया जारी ठेवली जात असे. गायत्रीमंत्राच्या उच्चाराने मन शांत आणि शुद्ध होते.

तेरा ते अठरा वर्षे या वयोगटातील पौगंडावस्थेतील मुले अनेकदा बेताल वागतात, आक्रमक होतात, मुरमं, पुटकुळ्या, दृष्टिदोष, श्रवणदोष या वयात जाणवू लागतात. इंडा (मानसिक उर्जा) आणि पिंगळा (शारीरिक उर्जा) यांच्यातील संतुलन बिघडल्याने मुले अबोल, शांत किंवा आक्रमक, हिंसक होऊ शकतात. या वयातील मुलांना उंची वाढवण्यासाठी ताडासन, पादहस्तासन यांचा उपयोग होतो. द्विकोनासनामुळे खांदे आणि छाती रुंद होते. लोलासनाने छाती रुंद होते. शशांक भुजंगासनामुळे दंड आणि छातीचे स्नायू मजबूत होतात.

स्त्रियांच्या शरीरात गर्भाशयाशी संबंधित मासिक पाळी, गर्भारपण, बाळंतपण, रजोनिवृत्ती या बाबींमुळे त्यांना वेदना व त्रास होत असतो. त्यामुळे पाठदुखीचे प्रमाण जास्त आढळते. मार्जारी आसनाने आणि धनुरासनाने पाठीचे स्नायू, गर्भाशय आणि गर्भाशयाला धरून ठेवणारे अस्थिबंधन यांचे कार्य सुरळीत चालू शकते.

तारुण्यावस्था, विवाह, नोकरीव्यवसाय यांच्यामुळे जीवनशैलीत मोठा फरक पडतो. मद्यपान, धूम्रपान, पार्ट्या, रात्रीची जागरणे यामुळे हृदय, फुफ्फुसे, यकृत, मूत्रपिंड वगैरे शरीरांतर्गत अवयवांवर त्याचा अनिष्ट परिणाम होऊ शकतो. विशी-तिशीतल्या अतिरंजित वर्तनाचे परिणाम काही व्यक्तींना भावी आयुष्यात सतत त्रास देत राहतात. या वयात नैसर्गिकरीत्याच आरोग्य उत्तम असते. परंतु व्यसनांच्या आहारी गेले तर पुढे काही वर्षांनी जड जाते.

योगासनांनी यकृत मजबूत झाले तर मद्यपानासारख्या व्यसनांनी होणारे दुष्परिणाम



टाळता येतात. सर्वांगासनाने थायरॉइड ग्रंथींना चालना मिळते. सुयोग्य चयापचयामुळे त्यांचे आरोग्य टिकून राहते. नपुंसकता, अंडवृद्धी, गर्भाशय खाली सरकणे वगैरे तक्रारी टाळता येतात. मत्स्यासन, पश्चिम उत्तानासन, अर्ध मत्स्येंद्रासन, शशांकासन ही आसनेही तरुणवयात आरोग्य उत्तम ठेवतात. गुरुशंख प्रक्षालनाने शरीरातील आतड्यात जमा झालेली विषारी द्रव्ये बाहेर पडतात. शरीरातील अतिताणाखालील अवयवांना नवे चैतन्य मिळते.

**ध्यानधारणा ही हठयोगाला जोडून करावी. एकाच वेळी जास्त काळपर्यंत हठयोग एक तास आणि ध्यानधारणा अर्धातास एवढे प्रमाण व्यवहार्य समजायला हरकत नाही.**

गरोदरपणात तितली, जाते फिरवणे, नौकासंचलन, भद्रासन, उत्थानासन, कंध्रासन, नमस्कार, मत्स्यक्रीडासन यांच्यामुळे आपली उर्जा टिकून राहते. गर्भाची वाढ उत्तम होते आणि प्रसूती सुलभ होते. ध्यानधारणा आणि योगनिद्रा यांच्यामुळे मन स्थिर, शांत आणि विचारी राहते. प्रसूती झाल्यानंतरही लगेच नाडी शोधन, पवनमुक्तासन वगैरे आसने सुरू करावीत. शिथिल झालेल्या कटिपोटातील पोकळी घट्ट करण्यासाठी शाहजोली आणि पोटाचे स्नायू आवळण्यासाठी अग्निसार योगक्रिया प्रभावी ठरतात.

वृद्ध व्यक्तींबाबत काचबिंदू, दृष्टिदोष, श्रवणसमस्या, त्वचारोग, प्रोस्टेट ग्रंथींची वाढ, हाडे ठिसूळ होणे, स्मृतिभ्रंश, कंपवात, अल्झायमर्स डिसीज वगैरे तक्रारी उद्‌भवतात. त्यांच्याशी सामना देण्याची क्षमता आपल्या शरीरात विकसित होऊ शकते. योगसाधनेने मन, ज्ञानेंद्रिये, स्मरणशक्ती आणि शारीरिक क्षमता उतारवयातही शाबूत राहतात. वज्रोली आसनाद्वारे प्रोस्टेट ग्रंथीचे विकार टाळता येतात. सूर्यनमस्काराने ऑस्टिओपोरोसिस टाळता येतो. सूर्यप्रकाशात व्यायाम केल्याने ड जीवनसत्त्व शरीराला मिळते. भ्रमरी प्राणायामामुळे श्रवणशक्ती उत्तम राहते. सर्वांगासनामुळे मेंदूला भरपूर प्रमाणात रक्तपुरवठा होतो.

ध्यानधारणेमुळे मानसिक उर्जा वाढते, परंतु शरीरातील उर्जेचा समतोल बिघडू शकतो. त्यामुळे ध्यानधारणा ही हठयोगाला जोडून करावी. एकाच वेळी जास्त काळपर्यंत हठयोग एक तास आणि ध्यानधारणा अर्धातास एवढे प्रमाण व्यवहार्य समजायला हरकत नाही.

ध्यानधारणेसाठी संगीत, रंग, घनरूप वस्तू, मंत्रोच्चार यांचा वापर मुलांनी करावा. प्रौढांनी त्राटक, नामस्मरण यांचा वापर करावा.

**आपल्याला मिळालेला देह ही या जगातील आपल्या अस्तित्वाची खूण. एकमेव ओळख. या देहाद्वारेच जीवनाचा आपण आनंद घेऊ शकतो आणि जीवनाचे सार्थक करू शकतो. आपला देह आरोग्यपूर्ण ठेवणे हे त्या दृष्टीने सर्वात मोठे धर्मसाधन ठरते.**

योगनिद्रा, ध्यानधारणा यांच्याबरोबर शरीरातील पेशींना सतत पोषकद्रव्यांचा पुरवठा होत राहणे आवश्यक असते. आपल्या आहाराद्वारे योग्य प्रमाणात जीवनसत्त्वे, कर्बोदके, प्रथिने, स्निग्ध पदार्थ, लोह, कॅल्शिअम, सोडिअम, आयोडिन, तांबे, मॅग्नेशिअम, मँगेनीज, झिंक, फोलिक ॲसिड, निकोटिनिक ॲसिड, पँटोथेनिक ॲसिड यांचा शरीराला पुरवठा व्हायला हवा. या पुस्तकात ही द्रव्ये जीवनसत्त्वे आणि ॲसिड्स कोणकोणत्या पदार्थांतून मिळतात याचे तक्ते शेवटी देण्यात आले आहेत. आम्ल-अल्क यांचे संतुलन साधणेही आवश्यक आहे. ते बिघडले तर गंभीर स्वरूपाचे आजार होऊ शकतात. नियमित उपवासामुळे शरीरव्यवस्थेतून विषारी पदार्थ काढून टाकून ती स्वच्छ करण्याचे यकृताचे कार्य व्यवस्थित होऊ शकते. त्वचा स्वच्छ ठेवणे, श्वसन योग्य प्रकारे करणे, घराभोवतीचा परिसर प्रसन्न ठेवणे, घराभोवती आवार असेल तर परसात तुळस, लिंब यासारखी झाडे लावणे, आशावादी दृष्टिकोन ठेवून जीवनातील सुखदु:खांना सामोरे जाणे अशीही काही पथ्ये हितकारक ठरतात.

आपल्याला मिळालेला देह ही या जगातील आपल्या अस्तित्वाची खूण. एकमेव ओळख. या देहाद्वारेच जीवनाचा आपण आनंद घेऊ शकतो आणि जीवनाचे सार्थक करू शकतो. आपला देह आरोग्यपूर्ण ठेवणे हे त्या दृष्टीने सर्वात मोठे धर्मसाधन ठरते. 'योगसाधना आणि ध्यानधारणा' या छोटेखानी पुस्तकानेही ही गोष्ट आपल्या मनावर बिंबू शकते. या पुस्तकातील मार्गदर्शनाचा लाभ घेऊन त्यानुसार आचरण ठेवले तर आपल्याला आपले आरोग्य आणि जीवन निकोप, निरामय ठेवण्याची किमया साध्य होऊ शकेल.

**पृष्ठे :७६ ● किंमत : ७० रु. ● सभासदांना : ४९ रु. ● पोस्टेज :२०रु.**



# पाठदुखी घालविण्यासाठी योगसाधना




आपला संपूर्ण दिवस वाचन-लेखनात जातो. संगणकासमोर तासन्‌तास आपण बसून राहतो. संध्याकाळी सभासमारंभाला गेल्यावरही आपण बसून राहतो किंवा तास-दोन तास उभे राहतो. स्त्रिया उंच टाचांच्या चपला घालून फिरतात. या आपल्या जीवनशैलीचा परिणाम आपल्या शरीरावर होतो. विशेषत: आपल्या पाठीवर परिणाम होतो याची आपल्याला जाणीवही नसते. पन्नाशीनंतर पाठीची तक्रार सुरू झाली म्हणजे ते उमगते. आणि आपल्या हालचालीवर मर्यादा येऊ लागल्यावर वेदनाशामक औषधे घेऊन जगण्याची पाळी येते. या वेदनाशामकांमुळेही शरीरामध्ये विषारी द्रव्ये जातात आणि पचनसंस्था बिघडते. पाठदुखीमुळे दैनंदिन कार्येही व्यवस्थित पार पाडता येत नाहीत; कार्यक्षमता कमी होते. आपण झोपतो तेव्हाही आपल्याला शरीरात २० एकक स्नायूसंबंधित ताण असतो. त्यामुळे पेशींना रक्तपुरवठा कमी होतो. हा ताण टाळण्यासाठी आपल्या जीवनशैलीत बदल करायला हवा. ताण हे पाठदुखीचे एक मोठे कारण असते. स्नायूंना पद्धतशीर व्यायाम मिळाला तर शरीर-मनाचा ताण कमी होऊन शरीराला मोकळे मोकळे वाटते. पाठीच्या कण्याच्या दोन मणक्यांमध्ये जी चकती असते ती आपल्या जागेवरून सरकली तर स्लिप्ड डिस्कचा त्रास सुरू होतो. आपल्या शरीराच्या चौकटीचा पाठीचा कणा हा एकमेव आधार असतो. मेरूदंड असेही त्याला म्हणतात. ३० लहान हाडे (मणके) एकावर एक रचून हा पाठीचा कणा– मेरूदंड तयार होतो. हे मणके अस्थिबंधनाने जोडलेले असतात. पृष्ठमज्जारज्जूने (स्पायनल कॉर्डने) ते एकमेकांशी दोरीत ओवल्याप्रमाणे व्यवस्थित राहतात. मज्जारज्जूमधून मज्जातंतू उगम पावतात आणि शरीराच्या प्रत्येक अवयवाला संदेश पोहोचवतात. मणके एकमेकांना घासू नयेत म्हणून त्यामध्ये चकतीसारखी उशी असते (इन्टरव्हॅर्टेब्रल डिस्क). या चकत्या जेलीसारख्या मऊ पदार्थाने भरलेल्या असतात. हा मऊ पदार्थ चकत्यांच्या तंतूंना घट्ट धरून ठेवतो. हालचालीच्या वेळी आवश्यक तो ताण निर्माण करू शकतो. या चकत्यांची झीज होत असते आणि पुरेशी विश्रांती मिळाल्यावर ती झीज भरून निघते. या चकत्यांमध्ये ८० टक्के ताण पडून त्यातील जेली बाहेर

**योगासनांनी पाठदुखी थांबू शकते आणि या तक्रारी दूर होऊ शकतात असा नामांकित योगचिकित्सक विजयालक्ष्मी होता यांचा अनुभव आहे. परमहंस स्वामी सत्यानंद सरस्वती यांच्या कृपाप्रसादाने त्यांना योगासनांमध्ये प्रावीण्य संपादन करता आले आणि शेकडो व्यक्तींच्या व्यथावेदना दूर करता आल्या.**

सांडते; मणक्यांमध्ये घर्षण उत्पन्न होते आणि पाठीच्या कण्याची लवचिकता कमी होते. त्यामुळे पाठ आखडून येते. पाठीत वेदना सुरू होते. पाठीचा कणा हा खालच्या बाजूला, म्हणजे कमरेला जोडलेला असल्याने कमर दुखू लागते. स्लिप डिस्कचा त्रास सुरू होतो. मानेच्या मणक्यांवर ताण पडला तर मानेच्या मणक्यातली चकती जागेवरून सरकते आणि सर्व्हायकल स्पाँडिलायटिसचा त्रास जाणवू लागतो. मान हा पाठीच्या कण्याचा सगळ्यात परिणामप्रवण भाग असतो. लहानमोठा कुठलाही अपघात झाला तर मानेलाच झटका बसतो आणि मानेतील अस्थिबंधने तुटू शकतात. अस्थिबंधन तुटणे ही गोष्ट हाड मोडण्याएवढीच वेदनादायक असते. मानेला दुखापत झाल्याने, चकती हलल्याने, चकती झिजल्याने, आजूबाजूच्या मज्जातंतूवर दाब पडतो. हात व खांदे दुखतात. त्यांना मुंग्या येतात. हे अवयव बधिर होतात. मानेतल्या कोणत्या मज्जातंतूवर दाब निर्माण झालेला आहे त्यावरून सर्व्हायकल स्पाँडिलायटिसची लक्षणे ठरतात.

कमरेतून निघून पायापर्यंत वेदना जाणवणे, कळ उठणे म्हणजे सायटिका.

स्पायनल कॉर्डच्या खालच्या म्हणजे कमरेतून निघून दोन्ही पायांमध्ये मागच्या बाजूने थेट टाचेपर्यंत सायटिक मज्जातंतू किंवा ओघळलेला स्नायू दाब आणत असल्यास सायटिका ही अवस्था उद्‌भवते.

पाठदुखीच्या तक्रारींचे स्वरूप असे वेगवेगळ्या प्रकारचे असू शकते.

वैद्यकीय उपचार करूनही अनेकदा काही फायदा होत नाही.

योगासनांनी पाठदुखी थांबू शकते आणि या तक्रारी दूर होऊ शकतात असा नामांकित योगचिकित्सक विजयालक्ष्मी होता यांचा अनुभव आहे. परमहंस स्वामी सत्यानंद सरस्वती यांच्या कृपाप्रसादाने त्यांना योगासनांमध्ये प्रावीण्य संपादन करता आले आणि शेकडो व्यक्तींच्या व्यथावेदना दूर करता आल्या.

पाठदुखी घालविण्यासाठी योगसाधना या पुस्तकात त्यांनी योगासनांचा केव्हा, कसा उपयोग करावा याची माहिती दिली आहे.

शवासन, अद्वासन, मत्स्यक्रीडासन याद्वारे तीव्र वेदना कमी होऊ शकतात. त्यासाठी कधी कधी दीड-दोन आठवडेही लागू शकतात. तीव्र वेदना कमी



झाल्यावर नियमित योगासने करता येतात. तीव्र वेदना असताना सर्व आसने करता येत नाहीत. करूही नयेत.

स्लिप डिस्कचा त्रास असेल पाय छातीवर, भुजंगासन, ताडासन, शवासन, मार्जारी आसन करणे श्रेयस्कर ठरते.

सर्व्हायकल स्पाँडिलायटिसमध्ये शशांकासन, आकर्ण, धनुरासन, सर्पासन, शवासन आणि हात वरखाली व मागेपुढे करणे फायदेशीर ठरते.

सायटिकामध्ये व्याघ्रासन, अर्ध शलभासन, सरल धनुरासन यांच्यामुळे दुखणे थांबवता येते.

**पोटाच्या पोकळीतला गर्भाशयासारखा अवयव मूळ जागेवरून खाली सरकणे याला प्रोलॅप्स म्हणतात. त्यामुळेही पाठ दुखते. नौकासन, उत्थानपादासन, कंध्रासन, पश्चिमोत्तानासन, विपरीत करणी मुद्रा, अश्विनी मुद्रा यांनी फायदा होतो.**

पाठीचा कणा सदोष असेल तर, स्कोलिऑसिसच्या अवस्थेत समकोनासन, गुप्त पद्मासन, अर्धचंद्रासन, स्पिंक्स, उष्ट्रासन, ताडासन ही आसने उपयुक्त ठरतात. स्कोलिओसिचे दुखणे लहान वयात, शरीर लवचिक असतानाच आटोक्यात येऊ शकते. लहानपणी पोक काढून बसण्याची सवय असेल तर पाठदुखीचा त्रास हमखास होतो. स्कोलिओसिस मुलांपेक्षा मुलींमध्ये जास्त आढळतो.


उसण भरल्याने पाठीचे स्नायू आखडतात. त्यामुळे हालचाल करणे कष्टदायक होते. मान आणि कंबर भरून येते.

पोटाच्या पोकळीतला गर्भाशयासारखा अवयव मूळ जागेवरून खाली सरकणे याला प्रोलॅप्स म्हणतात. त्यामुळेही पाठ दुखते. नौकासन, उत्थानपादासन, कंध्रासन, पश्चिमोत्तानासन, विपरीत करणी मुद्रा, अश्विनी मुद्रा यांनी फायदा होतो.

पाठ दुखू नये म्हणून सरळ पाठीच्या खुर्चीवर बसावे, पोक काढून बसू नये, बसल्यावर गुडघे मांड्यांच्या पातळीच्या वर असावे. झोपताना कठीण पृष्ठभागावर झोपावे. त्यामुळे कमकुवत पाठीला आधार मिळतो. अशा अनेक सूचनाही शेवटी दिल्या आहेत.

**पृष्ठे :७६ ● किंमत :७० रु. ● सभासदांना :४९ रु. ● पोस्टेज :२०रु.**

## आगामी




# पोस्टमास्तर
आणि
इतर कथा

मूळ लेखक
**रवीन्द्रनाथ ठाकूर**
अनुवाद
**मृणालिनी गडकरी**

**किंमत १४०रु.**
**पोस्टेज २५रु.**

***माणूस आहे म्हणूनच या जगात भावनांचा सुंदर गोफ विणला जातो. आणि त्याला साथ असते निसर्गाची.***
***रवीन्द्रनाथांच्या जीवनात 'माणूस' आणि 'निसर्ग' यांना असाधारण स्थान आहे. त्यांच्या कथेत निसर्ग हा फक्त वर्णनाकरिता येत नाही, तर भावभावनांच्या खेळात महत्त्वाची भूमिका बजावतो. निर्सगाची बदलणारी रुपं माणसाच्या बदलणाऱ्या भावनांच्या प्रतिमा असतात. निसर्ग आणि माणूस यांच्या संयोगातून फुललेली विश्वकवीची कथा तो महामानव होता हे नकळत सांगून जाते.***


**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




**भारतीय भाषांतील नामवंत साहित्यिकांची आस्वादक समीक्षा**

# भारतीय साहित्यिक

**डॉ. सुनीलकुमार लवटे**




कोल्हापूरचे डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी गेल्या पंचवीस वर्षांत लिहिलेल्या २५ लेखकांवरील छोटेखानी लेखांचा संग्रह 'भारतीय साहित्यिक' या नावाने 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने प्रसिद्ध केला आहे. या साहित्यिकारांमध्ये १४ हिंदी, ५ मराठी, २ पंजाबी आणि उर्दू, कन्नड, मल्याळम, ओडिया या भाषांतील प्रत्येकी एक असे विविध भाषांतील प्रतिभावंत आहेत. पुरस्कार, गौरव, शताब्दी, निधन अशा काहीतरी निमित्ताने लवटे यांनी 'सकाळ'मध्ये लिहिलेले प्रासंगिक लेख असे यांचे स्वरूप आहे.

भारतीय ज्ञानपीठ, साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, भारतीय भाषा परिषद यासारख्या संस्थांमुळे उत्तमोत्तम भारतीय साहित्याचे अनुवाद एका भाषेतून दुसऱ्या भाषेत होत असल्याने त्यांचा आस्वाद घेणे सुलभ झाले आहे. हिंदी भाषेचे अध्यापन हा व्यवसाय असल्याने हिंदी भाषेतील लेखक-कवींचे साहित्य शिकविण्याच्या निमित्ताने वाचन-अध्ययन होत राहिले; 'आंतरभारती'ची जाणीव दृढ होत गेली. 'भारतीय साहित्य' ही संकल्पना मनात पक्की होत गेली. लोकसाहित्य, संज्ञापन-संदेशवहनाचे माध्यम म्हणून भाषेचे आणि साहित्याचे महत्त्व, निरनिराळ्या भाषांतील साहित्याची ऐतिहासिक वाटचाल यांचा मागोवा घेण्याचे काम हिंदी भाषक अभ्यासकांनी भारतीय भाषाभाषांमधील दुवा म्हणून केले. साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, भारतीय ज्ञानपीठ यासारख्या संस्थांनी अनुवादावर लक्ष केंद्रित केले. त्यामुळेही जिज्ञासूंची सोय झाली.

मूलत: बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक असणाऱ्या भारतातील साहित्यात एक विशिष्ट जीवनदृष्टी आणि मूल्यभान आढळते आणि त्या सर्वांना सामावून

**प्रादेशिक भाषांतील तसेच परदेशातील महत्त्वपूर्ण साहित्यकृती आणि ज्ञान हिंदी भाषेत आणण्यासाठी अनेक उपक्रम राबवले आहेत. भारत सरकारनेही त्यासाठी भरपूर निधी उपलब्ध करून दिलेला आहे.**

घेणारी 'भारतीय साहित्य' ही संज्ञाही आपल्याला एक नवी अस्मिता देत आहे. हिंदी भाषेने राष्ट्रभाषा म्हणून आणि संपर्कभाषा म्हणून गेल्या साठ वर्षात आपली क्षमता वाढविण्यासाठी भरपूर प्रयत्न चालवले आहेत आणि प्रादेशिक भाषांतील तसेच परदेशातील महत्त्वपूर्ण साहित्यकृती आणि ज्ञान हिंदी भाषेत आणण्यासाठी अनेक उपक्रम राबवले आहेत. भारत सरकारनेही त्यासाठी भरपूर निधी उपलब्ध करून दिलेला आहे. चर्चासत्रे, परिसंवाद वगैरे उपक्रमांद्वारे विद्यापीठ पातळीवरही तौलनिक साहित्याला 'कल्चरल स्टडी' म्हणून मानाचे स्थान मिळत आहे.

त्या त्या साहित्यकाराचा परिचय देऊन, त्याच्या साहित्यकृतीची ठळक वैशिष्ट्ये, त्यांना मिळालेले मानसन्मान आणि त्यांचे योगदान यांची रूपरेखा उभी करणे– अशा स्वरूपाचे हे लेखन आहे. पाच-सहा पृष्ठांमध्ये हे सारे सामावून घेणे अवघड असते.

भगवतीशरण वर्मा, मैथिलीशरण गुप्त, जैनेंद्रकुमार, अज्ञेय, महादेवी वर्मा, हरिवंशराय बच्चन, रघुवीर सहाय, निर्मल वर्मा यासारख्या मान्यवर लेखकांबरोबर पटकथालेखक डॉ. राही मासूम रझा, रंगकर्मी सफदर हाश्मी, हास्यकवी शरद जोशी यांनाही या पुस्तकात जागा मिळाली आहे. मराठीतील सानेगुरुजी, शिवाजी सावंत, नारायण सुर्वे, डॉ. दु. का. संत, सुधाकर प्रभू या लेखकांचे परिचय या पुस्तकात आहेत. फैज अहमद फैज (उर्दू), अमृता प्रीतम, राजेंद्रसिंह बेदी (पंजाबी), डॉ. अनंतमूर्ती (कन्नड), तकषी शिवशंकर पिल्ले (मल्याळम), डॉ. सच्चिदानंद राऊत (उडिया) यांचाही समावेश केला गेला आहे.

ओदोलेन स्मेकल हे चेकोस्लोव्हाकियातील कवी हिंदी भाषेत लिहितात, 'हिंदी लोकसाहित्य आणि ग्रामीण कादंबऱ्या यांच्यातील अनुकरणात्मक शब्द' हा त्यांचा पीएचडीचा प्रबंध, भारतीय लोककथा, प्रेमचंदांची 'गोदान' ही कादंबरी, आधुनिक हिंदी कविता संकलन यांचे हिंदी अनुवाद, विद्यापीठासाठी हिंदी वार्तालाप, हिंदी पाठमाला, हिंदी भाषा, हिंदी-चेक शब्दकोश वगैरे त्यांचे लेखनप्रकल्प आणि 'तेरे दान किए गीत', 'मेरी प्रीत तेरे गीत', 'स्वाति बूंद', 'नमो नमो भारत माता', 'कमल को लेकर चल' हे १९८२-८३ मध्ये प्रसिद्ध झालेले



काव्यसंग्रह– यामुळे लवटे यांनी त्यांनाही 'भारतीय साहित्यकार' मानून त्यांच्या काव्यात भारतीय जनजीवनाचे जे दर्शन घडते, त्याचे वेगळेपण स्पष्ट केले आहे. भारतातील दारिद्र्य, जातीय दंगे, विषमता, बालमजूर, स्वार्थांधता, आत्मकेंद्रित वृत्ती याबद्दलही त्यांनी काव्यात विषाद व्यक्त केला आहे. देहाच्या नावावर चालणाऱ्या राजकारणाचे हे चित्र पहा.

**अबला जीवन हाय तुम्हारी यही कहानी । आँचलमें है दूध और आँखों में खारा पानी ।' या पंक्तींनी अजरामर झालेल्या मैथिलीशरण गुप्त यांचा राष्ट्रवाद देश-जात-प्रांत यांच्या परिघात घुटमळणारा नव्हता. 'एक नगरसा बने विश्व, हम उसके नागर' अशी त्यांची अपेक्षा होती.**

इतने पुराने मंदिर,
नगर नगर, ग्राम ग्राम
फिर भी नए बनाए जाते
अविराम
मंदिर नए
महान अभिनव
किंतु पुराने घावों के
हरे हरे
वही नाम!

...आणि वेगवेगळ्या वसाहतीमध्ये दिसणारा बकालपणा, अस्वच्छता, उकिरडे बघून त्यांना काय वाटते?

मेरा मन कभी सुख अनुभव नही करेगा
न कभी अकेलापन
बस्ती बस्ती में
जब तक रहेगा दुख, अंधापन, मैलापन

डॉ. स्मेकल यांची कविता भारताचे समग्र चित्र उभे करते. झेक नागरिक असले तरी ते रमतात. त्यांचे हृदय भारताने भरलेले व भारलेले आहे. त्यांना १९७८ साली भारत सरकारने विश्वहिंदी पुरस्कार देऊन गौरविले.

सुनीलकुमार लवटे यांना डॉ. स्मेकल यांची निष्ठा, कार्यपद्धती, तपश्चर्या, आचारविचारातील सुसंगती बघून 'व्यक्तिश: अत्यंत त्रास' होतो. का? भारतात सतत वाढणाऱ्या पाश्चात्त्य संस्कृतीच्या आणि इंग्रजी भाषेच्या पार्श्वभूमीवर आपण स्वदेशात विदेशी म्हणून जगतो, राहतो याची टोचणी डॉ. स्मेकल यांच्याकडे बघून लागून राहते, म्हणून!

वैचारिक द्वंद्व हा त्यांचा स्थायीभाव झाला होता. यशस्वी लेखकाला पत्नीखेरीज प्रेयसीही आवश्यक, प्रेयसी ही दुर्लभतेमुळे पत्नीपेक्षाही अधिक स्वकीय असते' या त्यांच्या प्रतिपादनाने अनेक लोक चक्रावून जात.

अबला जीवन हाय तुम्हारी यही कहानी । आँचलमें है दूध और आँखों में खारा पानी ।' या पंक्तींनी अजरामर झालेल्या मैथिलीशरण गुप्त यांचा राष्ट्रवाद देश-जात-प्रांत यांच्या परिघात घुटमळणारा नव्हता. 'एक नगरसा बने विश्व, हम उसके नागर' अशी त्यांची अपेक्षा होती. महात्मा गांधी हे त्यांचे आदर्श होते. हिंदी भाषेच्या आजच्या स्वरूपनिश्चितीला, खडीबोलीला काव्योपयोगी भाषा बनवण्याला मैथिलीशरण यांचे लेखन जबाबदार आहे. 'साकेत' या काव्यातील त्यांचा राम हा ईश्वर नसून 'आदर्श' आहे. त्यामुळे त्यांची साहित्य साधना ही एकविसाव्या शतकातील भारताला 'अंतर्मुख होण्याची संधी' आहे असे लवटे यांना वाटते.

जैनेंद्रकुमार यांचे गांधी, टॉलस्टॉय आणि शरच्चंद्र हे आवडते लेखक. परख, सुखदा, विवर्त, व्यतीत, जयवर्धन, अनामस्वामी, मुक्तिबोध, दशार्क या त्यांच्या कादंबऱ्या १९२९ ते १९८५ या सुमारे सात दशकात लिहिल्या गेल्या. त्यांच्या कथाही गाजल्या. आणीबाणीचे ते कट्टर विरोधक होते. आचार्यकुल संमेलनात त्यांनी भाग घेतला. तेथे भाषण देण्याआधी इंदिराजींना भेटून 'तुम्ही जे करताय ते चांगले नाही' असे त्यांनी स्पष्ट केले होते. ते आस्तिक होते. परंतु उत्तरायुष्यात ते म्हणू लागले, 'मुझे आस्तिकता क्या मिली कि उसने मुझे सदा के लिए निकम्मा कर दिया।' वैचारिक द्वंद्व हा त्यांचा स्थायीभाव झाला होता. यशस्वी लेखकाला पत्नीखेरीज प्रेयसीही आवश्यक, प्रेयसी ही दुर्लभतेमुळे पत्नीपेक्षाही अधिक स्वकीय असते' या त्यांच्या प्रतिपादनाने अनेक लोक चक्रावून जात.

'चित्रलेखा' (१९३१) या कादंबरीचे लेखक म्हणून भगवतीचरण वर्मा यांना भारतभर ओळखले जाते. प्रेमचंद्रांप्रमाणेच त्यांनीही समूहमनाचे चित्रण केले. 'सामर्थ्य और सीमा', 'रेखा', संधी', 'सच्ची बातें', 'वह फिर नही आया', 'थके पाँव', 'सबही नचावत राम गोसाई' या त्यांच्या इतर कादंबऱ्या. तसेच चित्रपटकथाही त्यांनी लिहिल्या. 'पद्मभूषण' देऊन त्यांना गौरविण्यात आले.

प्रयोगवादी कवितेचा जनक म्हणून अज्ञेय (वात्स्यायत) यांना ओळखले जाते. १९४३ मधील तारसप्तक व १९४६ इत्यलम या संग्रहांनी त्यांना हिंदीतील मर्ढेकर बनवले. १९७८ चा ज्ञानपीठ पुरस्कार त्यांना लाभला. 'पूर्वा', 'सागरमुद्रा', 'महावृक्ष के नीचे', 'पहले मैं सन्नाटा बुनता हूँ', 'कितनी नावोंमें कितनी बार' हे त्यांचे गाजलेले काव्यसंग्रह. मर्ढेकरांप्रमाणेच अज्ञेयांची कविताही 'दुर्बोध, अनाकलनीय, अभेद्य, अजाणतेपणी साठलेल्या अनुभवांची अभिव्यक्ती' यासारख्या टीकेला पात्र ठरली. 'दिनमान' या टाइम्स ग्रुपच्या हिंदी साप्ताहिकाचे संपादनही त्यांनी दीर्घकाळ केले.

'मधुशाला', 'मधुबाला', 'मधुकलश' या रुबायांच्या संग्रहामुळे १९३३-३५ च्या काळात भारतभर ख्यातकीर्त झालेल्या हरिवंशराय बच्चन यांच्या 'क्या भुलूँ क्या याद करूँ', 'दशद्वार से सोपान तक' या आत्मकथेला सरस्वती सन्मान मिळाला. नेहरूंशी जवळचे संबंध.

१९८२ चे ज्ञानपीठ मिळवणाऱ्या महादेवी वर्मा म्हणजे आधुनिक मीरा. 'निहार' हा पहिला काव्यसंग्रह १९३० साली आला. 'रश्मी', 'नीरजा', 'सांध्यगीत', 'दीपशिखा' हे त्यांचे पुढच्या दहा वर्षांत आलेले काव्यसंग्रह. 'छायावादी' (रोमँटिक मिस्टिसिझम) काव्यसंप्रदायाचे अग्रगण्य नमुने मानले जातात. प्रसाद, पंत, निराला आणि महादेवी या चौघांनी 'छायावादा'ला मान्यता व महत्त्व मिळवून दिले. इंदिरा संतांप्रमाणे विरहाच्या व्यथेने त्यांच्या कवितेला अंत:सूत्र पुरवले आहे. 'मरण का उत्सव अजर है । गीत जीवन का अमर है ।' 'ओज ही चिरप्राप्तिकावर– साधनाही सिद्धि सुंदर । रुदन में सुख की कथा है । विरह मिलने की प्रथा है अशा त्यांच्या भावनेने दु:खाचे दु:खपणचं. लुप्त होते. मृत्यूलाही त्यांच्या काव्यात महत्त्वाचे आशयकेंद्र लाभलेले आहे.

'महाभारत' या मालिकेचे लेखक म्हणून डॉ. राही मासूम रझा यांना सर्वजण ओळखतात. त्यांनी ३०० वर चित्रपटांच्या कथा-पटकथा लिहिल्या. सृजनशील लेखनही त्यांनी खूप केले. 'आधा गाँव' ही कादंबरी फाळणीच्या वेळचे वातावरण उभे करते. 'टोपी शुक्ला', 'हिंमत जैनपुरी', 'असंतोष के दिन', 'ओस के बूँद', 'सीन-७५', 'दिल एक सादा कागज', 'कटरा की आरजू' इत्यादी कादंबऱ्या, १८५७ च्या स्वातंत्र्यसमरावर आधारलेले महाकाव्य, 'नया साल', मौजे से सवा', 'रक्से मय', 'अजनबी शहर- अजनबी रास्ते' वगैरे काव्यसंग्रह– त्यांच्या सुफी आणि संत जीवनादर्शांचा प्रभाव दाखवतात.

'मधुशाला', 'मधुबाला', 'मधुकलश' या रुबायांच्या संग्रहामुळे १९३३-३५ च्या काळात भारतभर ख्यातकीर्त झालेल्या हरिवंशराय बच्चन यांच्या 'क्या भुलूँ

**ज्ञानपीठ विजेत्या अमृता प्रीतम या नागमणी हे मासिक चालवत; त्यातून अनेक नवीन पंजाबी लेखककवींना त्यांनी प्रकाशात आणले. बेदरकार जीवन जगून त्यांनी नव्या स्वतंत्र स्त्रीचे, स्वप्रज्ञ स्त्रीचे दर्शन घडवले.**

क्या याद करूँ', 'दशद्वार से सोपान तक' या आत्मकथेला सरस्वती सन्मान मिळाला. नेहरूंशी जवळचे संबंध. त्यामुळे राजीव गांधी आणि बच्चन यांचे पुत्र अमिताभ, अजिताभ यांची चांगलीच गट्टी. इंदिराजींना आणीबाणीनंतरच्या विजनवासात बच्चन यांचे घर हेच एकमेव धैर्यबळ देणारे स्थान होते.

ज्ञानपीठाचे मानकरी निर्मल वर्मा यांनी ऑस्ट्रियामध्ये काही वर्षे काढली. त्यामुळे त्यांच्या कथा-कादंबऱ्यांमध्ये परदेशातील पडसाद उमटलेले आहेत. 'चालू क्षण हाच सत्यक्षण' ही पाश्चात्त्य अस्तित्ववादी जीवनधारणा त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून प्रकट होते. 'वे दिन' ही १९६४ मध्ये प्रसिद्ध झालेली कादंबरी ऑस्ट्रियाच्या पार्श्वभूमीवरची आहे. 'लालटिन की छत' ही त्यांची कादंबरीही अभिजात मानली जाते. निबंधकार आणि चिंतनशील लेखक म्हणूनही त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

फैज अहमद फैज हे पंजाब प्रांतातील सियालकोटचे (जन्म १९११). १९३४-४० मध्ये ते अमृतसरला अरबीचे अध्यापक होते. १९४२-४७ सैन्यात ते कर्नल पदापर्यंत पोहोचले. फाळणीनंतर 'पाकिस्तान टाइम्स' हे दैनिक त्यांनी सुरू केले आणि त्याचे संपादनही केले. सरकारी धोरणावर परखड टीका केल्याने त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवून तुरुंगात डांबण्यात आले (१९५१-५४). १९६० मध्ये 'लोटस' या आफ्रो-एशियाई लेखकसंघाच्या मुखपत्राचे संपादकत्व त्यांच्याकडे आले. १९६२ मध्ये लेनिन शांतता पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले. त्याचबरोबर एक शायर म्हणून १९४१ पासूनच ते मशहूर होते. नक्श ए फरियादी (१९४१) वगैरे ७ काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहेत. तुरुंगातून आपल्या परदेशी पत्नीला लिहिलेली पत्रे 'सलाबे मेरे दरीचे में' या पुस्तकात संकलित केली गेली आहेत. कारागृहातील कविताही 'दस्त-ए-सबा' आणि 'जिन्दानामाँ' या दंतसंग्रहात आल्या आहेत. अरब-इस्राएल युद्ध, इराण-इराक संघर्ष, आफ्रिकेचा स्वातंत्र्यलढा, फिलिपीन्समधील संघर्ष– यावरही त्यांनी काव्यलेखन केले आहे. 'तुम नाहक टुकडे चुन चुनकर दामन में छुपाये बैठे हो । शीशों का मसीहा कोई नही क्या आस लगाये बैठे हो?' असा प्रश्न ते विचारतात. आपण काहीतरी अर्धकच्चे विचार उराशी कवटाळून बसतो आणि आरशांचा कोणीतरी प्रेषित



येईल अशी वाट बघत बसतो. ही वाट पाहणे निरर्थक होय असे ते बजावू पाहतात. देशद्रोही म्हणून बहिष्कृत केले तरी त्याची पर्वा नाही, देशप्रेमाने आणि देशहिताचेच ते बोलणार असा निर्धारही त्यांच्या कवितेतून व्यक्त होतो.

**प्रत्येक लेखक आपल्या भावविश्वाशी प्रामाणिक आणि बांधलेला असतो. त्यामुळे दोन लेखकांची तुलना करणे अनेकदा अप्रस्तुत ठरते. परंतु वाचकांच्या अनुभवविश्वाला एक नवे परिमाण देण्याचे त्या त्या लेखकाचे सामर्थ्य हेच खरे झपाटून टाकत असते.**

ज्ञानपीठ विजेत्या अमृता प्रीतम या नागमणी हे मासिक चालवत; त्यातून अनेक नवीन पंजाबी लेखककवींना त्यांनी प्रकाशात आणले. बेदरकार जीवन जगून त्यांनी नव्या स्वतंत्र स्त्रीचे, स्वप्रज्ञ स्त्रीचे दर्शन घडवले. विवाह न करता इमरोजबरोबर राहून त्याला आपल्या अनेक कादंबऱ्यांचा नायक म्हणून पेश केले. नागमणी ही कादंबरी प्रेमाला कलासाधनेतील अडसर मानणारा चित्रकार आणि प्रेमालाच सर्वस्व मानणारी प्रेयसी– यांच्यातील संघर्षाची कहाणी चित्रित करते. 'तेरहवाँ सूरज' ही त्यांची कादंबरी सर्वोत्तम मानली जाते. 'रसीदी टिकट' हे त्यांचे आत्मकथनही खूप गाजले... १९६८ मध्ये त्यांच्या कवितांवर अश्लीलतेच्या आरोपाखाली खटला भरण्यात आला. खरे तर रशियाने झेकोस्लोव्हाकियावर केलेल्या आक्रमणावर कठोर प्रहार करणाऱ्या त्या उपहासात्मक कविता होत्या.

भारतीय साहित्यक्षेत्रातील अशा काही अग्रगण्य लेखककवींच्या परिचयपर अशा या लेखांमुळे आपल्या लेखकांच्या जीवनदृष्टीतील, अनुभवविश्वातील वैचित्र्याचे, विविधतेचे दर्शन घडते. त्याबद्दलची आपली जवळीक गहिरी होते. वाङ्मयाचे मूल्यमापन हे काळाच्या कसोटीवर होत असते; परंतु त्याची समकालीन महत्ता आणि त्याला मिळणारा प्रतिसाद यांनाही मोल असते. प्रत्येक लेखक आपल्या भावविश्वाशी प्रामाणिक आणि बांधलेला असतो. त्यामुळे दोन लेखकांची तुलना करणे अनेकदा अप्रस्तुत ठरते. परंतु वाचकांच्या अनुभवविश्वाला एक नवे परिमाण देण्याचे त्या त्या लेखकाचे सामर्थ्य हेच खरे झपाटून टाकत असते.

लवटे यांच्या या पुस्तकामुळे काही अग्रगण्य भारतीय लेखकांबद्दलचे आपले कुतूहल अधिक वाढू शकेल.

**पृष्ठे: १५२ ● किंमत: १२० रु. ● सभासदांना: ८४ रु. ● पोस्टेज: २५ रु.**



## यशोधरा काटकर

# एका लेखनप्रवासाचा शोध

- उदय कुलकर्णी

यशोधरा काटकर यांची आतापर्यंत चार पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. 'बंजाऱ्याचे घर' हा आत्मकथनाच्या अंगाने जाणारा ललित लेखसंग्रह, 'अपूर्व अलौकिक एकमेव' हे व्यक्तिचित्रांचे पुस्तक, 'प्रवास पर्यटनाचे नवे पैलू' हा ट्रॅव्हल-टुरिझम मॅनेजमेंट या व्यवसायाभिमुख शिक्षणक्रमासाठी उपयुक्त असा परिचयग्रंथ आणि आता 'थर्ड पर्सन' हा कथासंग्रह. त्यांच्या कथा वाचताना आपल्याला कथानक, आशय, शैली याबाबतीत खूप वेगळेपण जाणवते. 'स्वत:चेच एक कलात्मक विश्व निर्माण करणाऱ्या ह्या कथा आहेत,' असे डॉ. आनंद यादव त्यांच्याबद्दल म्हणतात आणि ही इतकी समर्पक ओळख आहे की त्यापलीकडे काही म्हणण्याची आवश्यकता उरत नाही. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात अनुभवांची विविधता आहे. १९९० नंतर आपल्याकडे जागतिकीकरण, उदारीकरण सुरू झाले. आर्थिक, सांस्कृतिक अंगाने त्यावर नेहमी चर्चा होते. पण शिक्षणक्षेत्रातही त्यामुळे झपाट्याने बदलत झाले. यशोधरा शिक्षणक्षेत्रातील या बदलाच्या केवळ साक्षीदार नाहीत तर एक फॅसिलिटेटर आहेत. लेखन, संस्कार, समाज हे बदल अशा अनेक विषयांवर त्यांच्याशी चर्चा केली, त्याचा वृत्तांत–

माधवी देसाई ह्या प्रख्यात लेखिका त्यांच्या आई व चित्रपटतपस्वी भालजी पेंढारकर हे त्यांच्या आईचे वडील. भालजींचे संस्कार प्रखर हिंदुत्ववादी. 'देव, देश, धर्म यासाठी मरा किंवा मारा' असे शिकवणारे, त्यामुळे त्यांना पहिली पुस्तके वाचायला मिळाली ती बाबासाहेब पुरंदरेंच्या 'राजा शिवछत्रपती'चे दहा भाग. यशोधरांचे वडील नरेंद्र काटकर हे गोमंतक मराठा. गोव्याचे घर सोडून स्वत:च्या पायावर आयुष्य उभे करायला ते मुंबईत नोकरीला आले. त्यांच्या अकाली निधनानंतर माधवीताईंचा 'स्वामी'कार रणजित देसाईंबरोबर विवाह झाला,






**यशोधरा काटकर लिखित 'थर्ड पर्सन' या कथासंग्रहातील निवडक कथांचे वाचन करताना नामवंत कादंबरीकार श्री. विश्वास पाटील शेजारी प्रकाशक श्री. अनिल मेहता**

ते वातावरण खूपच वेगळे. यशोधरा, भोसले घराण्याच्या सून झाल्या, पुढे त्या विभक्त झाल्या, तोही अनुभव वेगळा. हे खूप विस्ताराने इथे दिलेले नाही; पण बहुसंख्य लोकांच्या आयुष्यात इतक्या घडामोडी होत नसतात, त्यामुळे कदाचित सविस्तर दिले आहे वाटेल आणि हे लिहिण्याचा उद्देश आहे, याचा त्यांच्या लेखनावर किती प्रभाव आहे ते पाहणे.

भालजींच्या आदर्शवादी मूल्यांचा, संस्कारांचा प्रभाव त्यांच्या लेखनावर आहे आणि नाही. याबाबत त्या म्हणतात, प्रत्येक पिढीने किंबहुना प्रत्येक 'जिवंत' माणसाने जुन्या संस्कारांचे मूल्यमापन केले पाहिजे, आपले आयुष्य आपल्या मूल्यांवर उभे करायला पाहिजे. जग झपाट्याने बदलले आहे, बदलत आहे, चांगले-वाईट या संकल्पना तपासायला पाहिजेत. आमच्या पिढीच्या मनात गोंधळ होता. नवीन पिढीत तो नाही. यशोधरांचे वडील नरेंद्र काटकर यांना चित्रकलेची खूप आवड होती. ते स्केचेस काढायचे, चारकोलने चित्रे काढायचे. घरी माशांचा टँक होता, त्यातले बदलते रंग पाहायचे. यशोधरांच्या लेखनात चित्रमय शैली एकजीव होऊन येते, त्याचा उगम येथे असावा. काही कथानकांमध्येही चित्रकार, आर्टवर्ल्ड याचे चित्रण येते. सध्या चित्रकलेकडे एक कला या विशुद्ध नजरेने पाहण्याऐवजी, त्याकडे गुंतवणूक म्हणून पाहिले जाते. 'विकाऊ' चित्रकार आणि त्यांच्या चित्रांच्या कोट्यवधीमधील किमती यातल्या उलाढालींची चक्रे हलवणारे

दलाल यांना त्या आर्टवर्ल्ड माफिया म्हणतात. हा विषय त्यांना खूप अस्वस्थ करतो.

रणजित देसाईंच्या घरी त्यांना इंग्लिश, मराठी अनेक पुस्तके वाचायला मिळाली. 'स्वामी'कार म्हणून देसाईंना प्रसिद्धी मिळाली पण यशोधरा म्हणतात, त्यांच्या निसर्गकथा या मराठीतील एक महत्त्वपूर्ण मानदंड आहेत, ते त्यांचे बलस्थान होते. यशोधरांच्या कथांतही निसर्ग आहे, पशू-पक्षी आहेत. तो प्रभाव कदाचित तिथून तर आला नसेल?

यशोधरांच्या आई ह्या लेखिका. रोजच्या जीवनातल्या गोष्टी फुलवून, रंगवून सांगण्याचे कसब त्यांच्याकडे आहे. तर यशोधरा मात्र अबोल. आई आदर्शवादी, धर्म, रुढी-परंपरा मानणारी अशी स्त्री. स्त्रियांनी घर– कुटुंब– कुळाचाराची चौकट सांभाळावी असे मानणारी. पण आईने कुळाचाराबरोबर कुळागारही सांभाळले आहे. स्वत:च्या लेखनप्रपंचाबरोबर अनेक नवोदित लेखक, निराधार महिलांना हक्काचे घर मिळवून आधार दिला आहे. पण यशोधरांची वृत्ती व लेखन आईपेक्षा खूप वेगळे.

प्रिया तेंडुलकर त्यांची मैत्रीण. ती एकदा त्यांना म्हणाली, 'जे बोलू शकत नाहीत ते चांगले लिहू शकतात.' त्या उद्‌गारामुळे त्यांना लिहिण्याचे बळ मिळाले. आईच्या लिखाणापेक्षा त्यांचे लेखन खूप वेगळे आहे हे आपल्या लक्षात येते. यशोधरांचे वडील गोमंतक मराठा. हा उल्लेख मुद्दाम केला होता, ते या घरात संस्कार वेगळे असतात का, की जातीपेक्षा हा क्लासचा मुद्दा आहे, मध्यमवर्ग म्हणजे एकच अपब्रिंगिंग असते का जाणून घेण्यासाठी. त्या म्हणतात, आमच्या घरात मुलींवर नक्कीच मर्यादा होत्या, काय करावे, काय करू नये याचे अलिखित नियम होते. कोल्हापूरचे संस्कार असा उल्लेख त्या करतात, गोव्याचे वेगळे तसेच रणजित देसाईंच्या घरचे खानदानी संस्कार वेगळे. पण त्यांच्या लेखनात जातीचा किंवा 'जेंडर'चा अभिनिवेश नाही. लेखकाने स्वत:ला धर्म व जातीच्या कुंपणात बंदिस्त करू नये, ते व्यक्ती, समाज आणि साहित्याला घातक आहे, असे त्या म्हणतात.

शाळा-कॉलेजमध्ये असेपर्यंत आपले वाचन सुरू असते. मग नोकरी, लग्न, मुले चक्र सुरू झाले की वाचन बंद पडते. यशोधरांचेही तेच झाले. १९९० साली त्यांनी मुंबईतल्या नरसी मोनजी कॉलेजमध्ये ट्रॅव्हल टुरिझम मॅनेजमेंटविषयी शिकवायला सुरुवात केली. ह्या कॉलेजचे वाचनालय खूप समृद्ध होते. इथे त्यांचे मराठी पुस्तकांचे वाचन पुन्हा सुरू झाले व अनेक पुस्तके वाचली. जाणीव विकसित झाल्यावर हे वाचन झाले, त्यामुळे त्याकडे डोळसपणे बघता आले असावे. स्वत: लिहिताना म्हणूनच पूर्वीच्या बाळबोध कल्पना त्यांना सहजगत्या आल्या. म्हणजे कथेला सुरुवात-मध्य-शेवट असावा किंवा जगात चांगले व वाईट लोक असतात. त्यातल्या सुष्टांचा विजय झाला की सुखांतिका होते, इत्यादी. आयुष्य इतके ढोबळ नसते ते एव्हाना त्यांना कळून चुकले होते. तंत्र, शैली याबाबतीत त्यांच्या कथा वेगळ्या आहेत. रूढ अर्थाने कथा सुरू होते,



असे वाटते पण त्यातल्या व्यक्तिरेखांना पूर्वायुष्य असते तर कथा संपल्यानंतरही कथानक सुरू राहू शकते, नंतर अनेक वाटा फुटू शकतात. माणसांवर सज्जन, दुर्जन असा शिक्का मारता येत नाही. व्यक्ती सतत बदलत असते. आपण स्वत:ही प्रसंगी वाईट वागलेले असतो. या सर्वांचे भान कथा लिहिताना पाहिजे. नवकथेच्या प्रवाहात सामील झालेल्या अनेकांमधल्या अरविंद गोखलेंना त्या खरे नवकथाकार मानतात.

अनेक वर्षे यशोधरा मुंबईत राहतात. इतर चारचौघींसारखीच त्यांचीही स्ट्रगल चालू आहे. इथे राहणाऱ्या माणसांवर मृत्यूचे सावट सतत असते, एक अव्यक्त भीती सदैव साथ करत असते. त्याची छाया त्यांच्या कथांमध्ये आढळते. तसेच गावाकडून आलेली एकटी राहणारी, झाडांवर, पक्ष्यांवर प्रेम करणारी संवेदनशील माणसे त्यांच्या कथांत प्रामुख्याने येतात. अनेक लेखकांचे लेखन म्हणजे स्वत:ला आलेल्या किंवा ऐकलेल्या अनुभवांची कलात्मक मोडतोड असते. पण यशोधरांच्या लेखनाबाबत असे म्हणता येईल की, कथेसाठी त्या स्वत:च्या अनुभवविश्वाचा परीघच घेतात; पण फक्त अनुभवांवर आधारित त्यांच्या कथा नाहीत. त्यात कल्पनाशक्तीची सृजनात्मक भरारी आहे. 'स्व'ची ओळख जाणण्यासाठी त्या विभक्त झाल्या, पण त्यांचे लेखन रूढ अर्थी स्त्रीवादी नाही किंवा त्यात कडवटपणा अजिबात आढळत नाही. 'बंजाऱ्याचे घर' व 'अपूर्व अलौकिक एकमेव' या दोन ललित पुस्तकांतून त्यांनी स्वत:विषयी, स्वत:च्या अनुभवांविषयी लिहिले. पण लवकरच त्या त्यातून बाहेर पडल्या आणि सृजनाला अनिर्बंध मोकळीक देणारा कथालेखनाचा मार्ग त्यांनी स्वीकारला. स्वत:बद्दल किंवा आत्मचरित्रात्मक लिखाणासाठी मोठी हिंमत लागते, पूर्वायुष्याकडे वळून बघताना पुनरावलोकनाचा आनंद, पश्चात्तापाचे आसू, घडून गेलेल्या चुकांबद्दल हताशा आणि आता ते सुधारू शकत नाही म्हणून निराशा अशा मोठ्या क्लेशदायक प्रवासातून लेखक जात असतो. काळाच्या गर्तेत ढकलून दिलेला तो 'मी' असा पुन्हा-पुन्हा समोर येऊन उभा राहतो. त्याकडे बघणे, त्याला स्वीकारणे व कागदावर जिवंत करणे यासाठी फार मोठी जिगर लागते. स्वत:ला असे सोलून समाजासमोर ठेवणारे लेखक विशेषत: ज्यांच्यावर नीतीपरंपरा आणि कलात्मक, कलात्मक म्हणून त्याचा उद्‌घोष आजही केला जातो ती मूल्यपरंपरा, त्या सगळ्या बंधनांतून सुटून स्वत:ची अशी सृजनात्मक वाट चोखाळणाऱ्या लेखिकांवर यशोधरांचे मनापासून प्रेम आहेच. आज त्या कथालेखनाच्या प्रांतात मोठ्या जोमाने उतरलेल्या आहेत.

लेखनप्रक्रियेबाबत त्या म्हणतात, मनात आहे तेच आणि तेवढेच कागदावर उतरते असे नाही. लिहिता लिहिताही काही वेळा बदल होत जातात. कधी येणाऱ्या विचारांचा आवेग असह्य होत असतो, तर कधी हळू, सावकाश प्रतिमा

उमटत राहतात. एकदा लिहिल्यानंतर त्यात वारंवार, खूप सुधारणा केली जात नाही, त्यामुळे उत्स्फूर्तता नाहीशी होऊ शकते. काय लिहायचे याबद्दल मनात संदिग्धता नसेल तर लेखक लवकर मोकळा होतो, जास्त कलाकुसर करायची गरज राहत नाही. क्रिएटिव्हिटी व क्राफ्ट म्हणजे सृजनशीलता व तंत्र दोन्ही लेखकाकडे पाहिजे. संपादकांनी लेखनात बदल सुचवावेत का याबबत त्या म्हणतात, संपादक हीदेखील निर्मितीशील व्यक्ती पाहिजे. त्याने विश्लेषण करावे, लेखकाशी चर्चा करावी पण स्वत:ची मते लेखकावर लादू नयेत. ती शेवटी लेखकाची निर्मिती आहे व तिच्यावर लेखकाची छाप पाहिजे. त्याच वेळेला हेही खरे आहे की ग्रामीण भागातून काही लेखक पुढे येतात किंवा नवखे लेखक असतात त्यांच्या पाठीशी उभे राहणे, त्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक असते. ही तारेवरची कसरत आहे. अतिशय सांभाळून, तारतम्य बाळगून हे व्हायला हवे. अन्यथा, साहित्यिक, साहित्यकृती आणि वाचक या सर्वांनाच ते अन्यायकारक ठरेल.

लेखकाकडे तीव्र निरीक्षणशक्ती, खूप कुतूहल हवे, त्याच्या विचारांची बैठक पक्की पाहिजे. त्याने खूप वाचले पाहिजे. अभ्यास केला पाहिजे. माणसांची आयुष्ये त्याकडे बघून समजून घ्यायला पाहिजेत. निर्मिती करताना स्वत:ला घडवणे व मोडणे या प्रक्रियेला सामोरे जायची त्याची तयारी हवी. सतत बदल होणे हे अटळ असते हे जाणून स्वत:ला बदलले पाहिजे.

कमी पडतो शिवाय साहित्यविषयक चर्चा, गप्पागोष्टी आपल्याकडे होत नाहीत. वर्तमानपत्रीय पुस्तक परीक्षणे समाधानकारक नक्कीच नाहीत. या सर्व बाबींमुळे पुस्तके लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. काही लेखक मात्र आता संपलेले असूनही त्यांनी लेखन थांबवलेले नाही. काही नवीन न देता, तेच तेच दहा-पंधरा-वीस वर्षे लिहीत आहेत. त्यांच्या लिखाणात नावीन्य उरलेले नाही. पूर्वी केलेल्या कामगिरीच्या बळावर ते आजही सगळे मानसन्मान, पुरस्कार आणि शासनदरबारी असणारी मानाची पदे मिळवून तुष्टपुष्ट होत आहेत. त्यांच्या साहित्याची योग्य ती दखल नव्या पिढ्यांनी जरूर घ्यावी; पण या लेखकांनी आता निवृत्त व्हायला हवे. विंदांसारखा ज्येष्ठ कवी हे तारतम्य बाळगू शकतो, मग इतरांनी बाळगायला काय हरकत आहे? त्या स्वत: मधूनमधून ब्रेक घेतात. त्यांना वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. नियमित पत्रे, ई-मेल पाठवणारे आणि बाहेरगावाहून फोन करून तासभर भरभरून बोलणारे वाचकही त्यांना लाभले आहेत.

एकूणच संस्कार, अपब्रिंगिंग, घरातील जवळची माणसे काय लिहितात यापेक्षा लेखकाच्या प्रेरणा वेगळ्या असतात. त्याप्रमाणे तो स्वत:ची वाट शोधतो, त्याच्या आंतरिक उर्मीतून लिहितो असे म्हणता येईल.

लेखक समाजाकडे कसा पाहतो, आजच्या वास्तवाविषयी त्याचे काय मत आहे हे जाणून घेणे मला आवश्यक वाटते. समाजात जे घडत आहे, ते लेखनात झिरपते, तसेच गार्की, टॉलस्टॉय, हेमिंग्वे आणि काफ्कासारखे लेखक समाजावर प्रभाव टाकू शकतात, साहित्याचा प्रभाव बदलवू शकतात. आपल्या मराठी समाजाने विचार करणे थांबवलेले आहे असे त्या म्हणतात. जुनाट मूल्ये, बुरसटलेपणा आहे व तो वाढत आहे. कर्मकांडांचा, बुवा, बाबालोकांचा प्रभाव वाढला आहे. बदलणाऱ्या जगातल्या प्रवाहांकडे स्वत:च्या कुवतीनुसार बघणे, त्यावर मनन-चिंतन करायला कुणाला वेळ आहे? मग असल्या भोंदुगिरीला, मग ती कोणत्याही क्षेत्रातली असो, तिला विरोध करायला कोण पुढे येणार? कोणापाशी आहे ते धैर्य?

यशोधरांकडे अनुभवांची विविधता आहे, कल्पनाशक्ती आहे. नवीन देण्याची उर्मी आहे. त्यांच्याकडून आणखी मोलाचे मराठी साहित्याला नक्कीच मिळेल. त्यांच्या कादंबरीची आपण वाट पाहू या.

**-साभार- 'प्रिय मैत्रिण' सप्टें.०७.**

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**info@mehtapublishinghouse.com**

आपले **E-mail ID** 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वरील **E-mail ID** वर कळवा.


**प्रिय वाचकमित्रहो........**

आपल्या सोयीसाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन
दर रविवारी नियमित सुरु राहील.
वेळ - सकाळी १० ते दुपारी ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**

## नवे कोरे

# द काईट रनर



मूळ लेखक
**खालिद हुसैनी**

अनुवाद
**वैजयंती पेंडसे**

**किंमत : २७० रु.**
**पोस्टेज : ३० रु.**

आपल्या वडिलांच्या नजरेत भरण्याजोगं, त्यांचं कौतुक मिळवण्याजोगं काहीतरी करण्यासाठी आसुसलेला बारा वर्षांचा आमिर, पतंगांची स्थानिक दंगल जिंकण्याचा निर्धार करतो. त्याचा इमानी दोस्त हसन त्याला मदत करण्याचं वचन देतो. कारण हसन नेहमीच आमिरला मदत करत आलेला असतो. पतंगांच्या त्या दंगलीच्या दिवशी संध्याकाळी घडलेल्या, एका घटनेमुळे दोघांचं भावविश्व उध्वस्त होऊन जातं...

१९७०च्या दशकात रशियन फौजांनी अफगाणिस्तानवर कब्जा केल्यानंतर आमिरच्या कुटुंबाला अमेरिकेत गेल्यानंतरही मनात एक जाणीव सतत जागृत होती ती म्हणजे एक ना एक दिवस, कधीतरी त्याला जरूर परतून यावं लागणार आहे. नव्या जगातलं त्याचं समृद्ध आयुष्यही त्याला कधीच देऊ न शकणाऱ्या एका गोष्टीसाठी - ती म्हणजे प्रायश्चित्त!

त्याच्या हातून घडलेल्या अक्षम्य गुन्ह्याचं प्रायश्चित्त!



**समाजातील उपेक्षित घटकांच्या व्यथा-वेदनेचे प्रत्ययकारी चित्रण**

## विमुक्त

**दादासाहेब मोरे**




'गबाळ' या आत्मकथनाद्वारे कुडमुडे जोशी जमातीच्या सुखदु:खांचा पट उलगडून दाखवणाऱ्या दादासाहेब मोरे यांनी अन्य भटक्या विमुक्त जमातींच्या व्यथा-वेदना प्रकट करण्यासाठी कथालेखन केले. त्यांच्या १४ कथांचा विमुक्त हा संग्रह १९९४ मध्ये प्रसिद्ध झाला.

मोरे यांनी आपल्या मनोगतात भारताच्या विषम समाजव्यवस्थेतील शेवटचा घटक म्हणूनही भटक्या विमुक्त जमातींना सामावून घेतले गेलेले नाही, हजारो वर्षांपासून भटक्या विमुक्तांना समाजव्यवस्थेपासून दूर ठेवण्यात आलेले आहे, गावगाड्यातील उत्पादनप्रक्रियेमध्ये भटक्याविमुक्तांना सामावून घेण्याचे टाळले गेले आहे हे स्पष्ट केले आहे. त्यामुळे उदरनिर्वाहाठी या भटक्या जामतीजमातींना सतत फिरावे लागते आणि आध्यात्मिक भटके, मनोरंजन करणारे भटके तसेच जनावरांच्या पालनपोषणासाठी वणवण फिरत राहणारे भटके म्हणून जीवनपद्धतीचा अवलंब करून आपले अस्तित्व टिकवून धरणे क्रमप्राप्त ठरले; कुडमुडे जोशी, पिंगळे जोशी, पोपटवाले, नंदीबैलवाले, रावळ, मडकर अशा जमाती भविष्यकथन करतात; प्राण्यांचा व पक्ष्यांचा त्यासाठी वापर करतात, स्थिर समाजाची आध्यात्मिक गरज पूर्ण करतात. गोंधळी जमात अध्यात्म आणि मनोरंजन दोहोंचा मेळ घालते. दरवेशी, माकडवाले, डोंबारी, कोल्हाटी, डवरी, गोपाळ, सापगारुडी, पांगूळ समाजाचे मनोरंजन करण्यासाठी गावोगाव फिरत राहात. वैदू वनस्पती औषधे देऊन समाजाची वैद्यकीय गरज भागवत. कैवाडी, घिसाडी, बंजारी, फासेपारधी वस्तुविनिमयातून समाजाच्या गरजा भागवत. जनावरांना चारण्यासाठी जमाती भटकत राहात, त्या जनावरांची विक्री करीत. परंतु स्थिर समाजाच्या रंजन, अध्यात्म, वैद्यकीय आणि वस्तुविनिमयाच्या गरजा भागवणारी नवनवी साधने

**कुरणशोधक भटके, अन्नशोधक भटके, चरण भटके, आध्यात्मिक करमणूक करणारे भटके... यांना गाव नाही, घर नाही, जातीजमातीच्या, जातपंचायतीच्या तुरुंगात ते बंदिस्त आहेत. भाकरीच्या शिळ्या तुकड्यासाठी त्यांना दारोदार लाचार होऊन भटकावे लागते.'**

सहजपणे उपलब्ध होत गेली; त्यामुळे भटक्या जमातींची उपयुक्तता संपली. पारंपरिक व्यवसाय कालबाह्य झाल्यामुळे भटक्या विमुक्तांच्या पारंपरिक कौशल्याचे महत्त्व संपुष्टात आले. भटक्या विमुक्तांना त्यामुळे उदरनिर्वाह करणेही कठीण झाले आहे. अशा एकूण ४२ भटक्या विमुक्त जाती आहेत; त्यामधील बारा-तेरा जमातींचे वास्तव जीवन रेखाटण्यासाठी या कथा मोरे यांनी लिहिल्या आहेत.

डॉ. भालचंद्र फडके यांनी आपल्या प्रस्तावनेमध्ये म्हटले आहे, 'विशेषत: भटक्या विमुक्त समाजातील माणसे उघड्यानागड्या अवस्थेत आदिमानवाचे जीवन गडद काळोखात जगत आहेत. लाचारपणे भीक मागत. माणसापेक्षा जनावरांच्या संगतीत राहून अन्नाच्या शोधात भटकत आहेत. कुरणशोधक भटके, अन्नशोधक भटके, चरण भटके, आध्यात्मिक करमणूक करणारे भटके... यांना गाव नाही, घर नाही, जातीजमातीच्या, जातपंचायतीच्या तुरुंगात ते बंदिस्त आहेत. भाकरीच्या शिळ्या तुकड्यासाठी त्यांना दारोदार लाचार होऊन भटकावे लागते.'

या जमातींमध्ये आजही जातपंचायत सर्वांवर अधिकार चालवते. जातिबहिष्कृत होण्याचे भय सर्वांना वाटते. जातीपंचायतीचा न्याय सर्वांना शिरोधार्थ मानावा लागतो. त्यानुसार वागावे लागते.

लग्न, घटस्फोट याबाबत जातपंचायतीचा अधिकार चालतो.

आपापसातले तंटे सोडवण्याबाबत जातपंचायतीचा निर्णय अखेरचा ठरतो.

जातपंचायतीची न्यायदानाची व्यवस्था जातबहिष्कृतीच्या भयावर टिकून राहिलेली असते. वाळीत टाकले जाणे ही सर्वात भयंकर शिक्षा ठरते; पुन्हा जातीत येण्यासाठीही जातपंचायतीचे काही दंडक असतात. त्यानुसार दंड भरणे, जमातीतील लोकांना मेजवानी देणे, मद्य पाजणे वगैरे गोष्टी केल्यावर पुन्हा जातीत घेतले जाते.

या जातपंचायतीच्या जाचातून मुक्त होण्याचा प्रयत्नही काही व्यक्ती, काही कुटुंबे करतात. जात-जमातीची चौकट झुगारून, माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा त्यांच्यात प्रबळ ठरते. विद्रोहाची ही कृती वाळीत टाकले जाण्याच्या भयावर मात करते. नव्या जीवनाचा अंगीकार करण्यासाठी ती प्रेरक ठरते.

'विमुक्त' या पहिल्याच कथेत अशा जातपंचायतीच्या जाचातून स्वत:ला मुक्त करून घेण्याचा बाणेदारपणा दाखवणाऱ्या लच्छीची गाठ पडते.



धमन्याला त्याच्या पोराच्या ऑपरेशनसाठी गुलब्या पैसे देतो; त्या मोबदल्यात पैसे परत मिळेपर्यंत धमन्याच्या बायकोला– लच्छीला गहाण म्हणून गुलब्याकडे राहावे लागते... परंतु ही लच्छी पैसे फिरण्याच्या आधीच गुलब्याच्या घरातून बाहेर पडते आणि धमन्याबरोबर व मुलांबरोबर राहू लागते. तेव्हा गुलब्या जातपंचायतीत लच्छीविरुद्ध दावा गुदरतो. धमन्याला त्याचे जातवाले विचारतात; ''पैकं न्हाईत तर बायकूला घरात कसं घेतलंस?... बायकूला गुलब्याकडे धाड आणि जातपंचायतीच्या विरुद्ध कृती केल्याबद्दल दंड भर... नाहीतर तुला जातीतनं वाळीत पडावं लागेल.''

**ही कथा जातीजमातीच्या मर्यादांना झुगारून देऊन नव्या युगात प्रवेश करू करण्याला प्रेरणा देते. नव्या वास्तवाचे भान देते. बंदिस्त परंपरागत विचारसरणीला आणि समाजव्यवस्थेतील मूल्यप्रणालीला नाकारून स्वतःच्या अस्तित्वाला नवा संदर्भ, नवा आशय देण्यासाठी प्रवृत्त करते.**

लच्छीही म्हणते, ''मी गुलब्याकडे जाणार न्हाय. त्येनं पयशाच्या बदल्यात माज्या पालातलं आशील-नशील ते घेवावं... आमी अंगावरच्या कापडासकट न्हायाला तयार हाय.''

जातीपंचायत रात्रभर खल करते. बुजुर्ग सरपंच संध्या काळे निर्णय देतात, ''धमन्या बायकूबी घरात ठिवून घितली... उद्याच्यात आपल्या जातीत आसंच बहुधा लागलं तर... एकमेकांचया सबदावर कोणसुदिक इस्वार ठिवणार न्हाय... तवा धमन्यानं आपलं पाल... गुलब्याच्या ताब्यात देवावं... अंगावरच्या कापडाससकट आपल्या बायकू-पोरास्नी घिऊन कुटंबी जावावं...त्यांचा आणि त्यांच्या बायकू-पोरांच्या जातीशी कसलाच संबंध न्हाय...'' लच्छी आणि धमन्या मग शहराकडे निघतात. त्यांच्या चेहऱ्यावर वेगळेच तेज असते.

लेखक शेवटी म्हणतो, ''लच्छी आणि धमन्या यांनी पालाकडे वा तेथील माणसांकडे ढुंकूनही पाहिले नाही.. ते आपल्या जातीच्या, आदिम परंपरांपासून, दुष्ट रुढींपासून मुक्त झाले होते. जातीच्या, जमातीच्या बंधनांनाच नव्हे तर जातीजमातीच्या चौकटींना कायमचा रामराम ठोकून, माणूस म्हणून जगण्यासाठी जात होते. त्याचवेळी सूर्य उगवत होता.

ही कथा जातीजमातीच्या मर्यादांना झुगारून देऊन नव्या युगात प्रवेश करू करण्याला प्रेरणा देते. नव्या वास्तवाचे भान देते. बंदिस्त परंपरागत विचारसरणीला आणि समाजव्यवस्थेतील मूल्यप्रणालीला नाकारून स्वत:च्या अस्तित्वाला नवा संदर्भ, नवा आशय देण्यासाठी प्रवृत्त करते. तशा कृतीचा गौरव करते.

**पण जातपंचायत म्हणते, ''आजपासून आपल्या जातीत असं झालेलं न्हाय. आणिक आता झालं तर जातीला बट्टा लागंल... तुमा दोघांला त्या पुरीचं लगीन करून द्यायचं असंल तर करून द्या. पण जातीतला कुणी तयार होणार न्हाय... जातपंचायत तुम्हा दोगास्नी वाळीत टाकेल.''**

जातपंचायतीचा प्रभाव इतरही काही कथांमध्ये दिसतो.

नऊ वर्षे वयाची चांगी. बालपणीच चार वर्षाची असताना तिचे लग्न संतराम मामांच्या गोमाबरोबर झाले; असे तिला आईने सांगितलेले. लग्न म्हणजे काय हे त्यावेळी कळतही नव्हते. सहाव्या-सातव्या वर्षी थोडी समज आली. गोमा पालात आला की ती पळून बाहेर जायची. पण गोमा अचानक मरण पावला... दोन वर्षांपूर्वी... आणि चांगली विधवा झाली. जुनं लोखंड शेवटून त्यापासून खुरपी, पार पहार, विळे, कुऱ्हाडी, धावा, कुळवाचे फास तयार करून व शेवटून देण्याचे काम घिसाडी कुटुंबे करतात. गोमाच्या मृत्यूनंतर त्याच्या बायकोला सांभाळायची जबाबदारी सासरच्या माणसांवर असे जातपंचायत मानते. परंतु चांगीचा बाप तिचे लग्न करायचा प्रयत्न करतो. जातपंचायतीत संताराम म्हणतो, ''माजं पोरगं गेलंय... देवानं माजा व्हुता तेवडा बी आधार मोडलाय... त्या पोरीला माझ्या घरात ठिवून मी काय करू? जलमभर मला तिच्या आत्म्याचा शाप घ्यावा लागणार. मलाबी दोन मुली हायत. आय-बाच्या मनाला काय वाटतं त्याची जाण मला हाय. देवळात देव नशील तर त्या देवळाला काय किंमत हाय?... ही पोरगी एवढीशी... तिच्या आयुष्याचं वाटोळं हुण्यापरास तिच्या बापाला– लगीन करून द्याला परवानगी देवावी.''

पण जातपंचायत म्हणते, ''आजपासून आपल्या जातीत असं झालेलं न्हाय. आणिक आता झालं तर जातीला बट्टा लागंल... तुमा दोघांला त्या पुरीचं लगीन करून द्यायचं असंल तर करून द्या. पण जातीतला कुणी तयार होणार न्हाय... जातपंचायत तुम्हा दोगास्नी वाळीत टाकेल.''

...जातपंचायत आपल्या निर्णयाचाच आग्रह धरते. ''मंडळी, आपल्या जातीत एकदा लिंब भाजला मंजी पुन्यांदा लिंब भाजाचा नसतुया... ही रीत ठावूक असूनही यंकानं जातपंचायत बुलावली ही त्याची पयली चूक... अन् जातपंचायतील अवमान केला ही दुसरी चूक... यंकानं दोनशे एक रुपये दंड म्हणून जातपंचायतीला द्यावा... आपल्या मुलीला संतारामच्या घरी धाडावी... तिला सांभाळायची जबाबदारी संताराम– सासऱ्यावर हाय.''

...त्याप्रमाणे चांगी संतारामच्या घरी येते... पालाच्या मेढीजवळ भाता असतो.



चुकून तिचा हात भात्याच्या दोरीकडे जातो. दोरी ओढली गेल्याने भात्यातून हवा बाहेर फेकली जाते. विझलेल्या आगटीतून राखेचा लोळ उठतो. त्या आगटीत एक ठिणगी... बघून चांगी भेसून हसते... आग पसरते... चांगीच्या देहाचा कोळसा झालाय असं लोकांना दिसतं.

जातपंचायतीचा निष्ठुरपणा एका नऊ वर्षाच्या निरागस मुलीचा बळी घेऊनच संतोष पावतो.

'अजाण' या कथेतील पंधरा वर्षे वयाच्या सुरतीचीही अशीच गोची होते. आजारी पडल्याने तिला दवाखान्यात नेले जाते... दवाखान्यात तिला भूल देतात... ती घरी येते... काही दिवसांनी तिची पाळी चुकते. पोट वाढते. जातपंचायत बसते. ''पोटात वाढणारा गर्भ कुणाचा ते सांग.'' ती कुणाचं नाव घेत नाही. ''मला कायबी ठाव न्हाय. मी कुणाचं नाव घेऊ?'' हेच तिचे उत्तर राहते.

जातपंचायत निर्णय देते... ''सुपडूनं आपल्या पोरीच्या पापाची जबाबदारी घिऊन ह्यो पाडा सोडून लेकराबाळासकट कुटंबी निगून जावं... न्हाय तर त्येनं या पोरीला पाड्यावरून हाकलून द्यावं.''

सुरतीपुढे असंख्य प्रश्नांचे मोहोळ घोंगावू लागते.

आपल्या विनाशाला जबाबदार कोण? पोटात वाढणारा गर्भ कुणाचा म्हणून सांगणार? यापुढेही शरीर विकण्याचाच व्यवसाय करावा लागणार का? यात आपला दोष काय?

ती सभोवतीच्या माणसांकडे तुच्छतेने बघू लागते. स्वतःच्या वाढलेल्या पोटाकडेही खुनशी नजरेने बघू लागते.

भटक्यांना आपापले परंपरागत व्यवसाय करणेही आता सोपे राहिलेले नाही हेही या कथांमधून अधोरेखित करण्यात आले आहे.

कंजारभाट हातभट्टी लावून दारू तयार करतात आणि ती विकतात. पोलिसांना हप्ते देतात. चोरून व्यवहार करतात... पण कधी हप्ता चुकला म्हणून तर कधी नवीन आलेले ऑफिसर आपले वर्चस्व दाखवायचे म्हणून हातभट्ट्यांवर छापे घालतात. तयार माल जप्त करतात किंवा फेकून देतात. पोलिस स्टेशनवर तरण्याताठ्या लक्षीला रात्रभर डांबून ठेवले जाते. तिचा बाप भानुदास तिला

**आपल्या विनाशाला जबाबदार कोण? पोटात वाढणारा गर्भ कुणाचा म्हणून सांगणार? यापुढेही शरीर विकण्याचाच व्यवसाय करावा लागणार का? यात आपला दोष काय? ती सभोवतीच्या माणसांकडे तुच्छतेने बघू लागते. स्वतःच्या वाढलेल्या पोटाकडेही खुनशी नजरेने बघू लागते.**

**पारध्यांवर चोरीचा आळ घेणे सर्वात सोयीस्कर. कापड चोरल्याच्या केवळ संशयावरून राहीला लोक पकडतात. पारध्यांच्या पालावर गावकरी चाल करून येतात. तुटून पडतात. सरपंच राहीला चावडीत डांबून ठेवतो. माराने अंग ठणकत असते.**

सोडवायला येतो तेव्हा तिचा चोळामोळा झालेला असतो. ''बाबा, गिधाडांनी घात केला माझा'' म्हणून ती ओक्साबोक्शी रडू लागते. (धंदा)

पारध्यांवर चोरीचा आळ घेणे सर्वात सोयीस्कर. कापड चोरल्याच्या केवळ संशयावरून राहीला लोक पकडतात. पारध्यांच्या पालावर गावकरी चाल करून येतात. तुटून पडतात. सरपंच राहीला चावडीत डांबून ठेवतो. माराने अंग ठणकत असते.

''चार घरं मागून पोट जाळावं म्हटलं तर शिव्यांचा भडिमार, मार. हेच नशिबात लिहिलेले. ह्या जातीत जन्माला आलो हाच आपला गुन्हा ठरला. चोरी करूनही चोर; न करूनही चोर... ही माणसं आपल्याला चांगल्या माणसासारखं का जगू देत नाहीत?'' असा प्रश्न पारधी महिला एकमेकींना विचारतात.

पारध्यांना आपली पालं त्या गावातून उठवावी लागतात... आपले चंबूगबाळे आवरून गाढवावर लादून दुसऱ्या गावी जावे लागते. (अंधारातील प्रवास)

अस्वलाचा खेळ करणाऱ्या कमल्याची अस्वलीण रंगी मरण पावते. नवीन अस्वलाला शिकवून तो पहिलाच खेळ करतो. तर ते अस्वल त्याच्या मुलाला ओरबाडून काढते... मुलगा जखमी होतो... प्रेक्षक चार पैसेही टाकत नाहीत... उलट अस्वलवाल्याच्याच वस्तू पकडून नेतात... (अस्वलाचा खेळ)

पिढीजात धंदा करतानाही प्रशिक्षण लागतेच.

'शिक्षण'मधला सुभाष पहिल्यांदाच खिसा कापण्याचे प्राथमिक धडे घेऊन बापाबरोबर प्रात्यक्षिक करू लागतो. ''ह्याला तिरंगायला नीट येत नाही. उद्या पोटाला काय बिबं घालणार हाय व्हय?'' असे म्हणत त्याला बापाने मारून मुटकून तयार केलेला. पत्ती (ब्लेड) नीट धरता येत नाही म्हणून फैलावर घेतलेला सुभाष... बापाबरोबर बाजारात जाऊन सावज हेरतो... एका माणसाचा फुगलेला खिसा पाहून पॅन्टच्या खिशावर पत्ती मारतो... हातात पाकिट येते... पण त्यात कागदपत्रे मिळतात. पैसे किरकोळच मिळतात... बाप लगेच त्याचे सांत्वन करतो, ''वाईट वाटून घेऊ नकोस. येकदा ही कला चांगली जमली म्हणजे येकाच्या न्हायीतर दुसऱ्याच्या खिशाला माल घावेल...'' एकटा तो खिसा कापू पाहतो– पण पकडला जातो. कसाबसा तो पळ काढतो. लपून



बसतो. संध्याकाळी हा सुभाषघरी येत नाही म्हणून सर्वजण चिंता करतात... तो येतो... काहीच हाती लागलं न्हाई म्हणून तो हबकलेला असतो. बाप त्याला सांगतो, ''आरं मग... भितुयास कशापाय? त्येंच्या हातातनं सुटून आलास... ही काय थोडं न्हाय. तू आज बरंच शिकल्यासारखं हाय.'' दुसऱ्या दिवशी तो आत्मविश्वासानं दुसऱ्या बाजारला जायला तयार होतो... (शिक्षण)


म्हातारा संत्या आपल्या केसांनी मोठा दगड उचलण्याचा खेळ दाखवू पाहतो... पण त्याला ते जमत नाही. त्याची प्रेक्षक मग टवाळी करतात... (निर्धार)

कोठीत पहिल्यांदाच गेलेल्या कमलीला कोठीची मालकीण सांभाळून घेते. पाणी दे... पान दे... अशी कामे सांगून सांजच्याला २० रुपयांची नोट तिच्या हातावर ठेवते... ती रात्री कृष्णा नदीत उडी मारून आपले जीवन संपवते. (अभागी कमल)

...अशा विविध व्यक्तिरेखा, विविध समस्या लेखकाने कथारूपात मांडल्या आहेत. भटक्या विमुक्तांना मानाने, कष्ट करून प्रामाणिकपणे जगायचे आहे... जातपंचायतीच्या अनिष्ट प्रभावापासून मुक्त व्हायचे आहे... माणूस म्हणून जगायचे आहे... न्यायासाठी समतेचा लढा द्यायचा आहे... हे या कथांद्वारे वाचकांच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**पृष्ठे :१६४ ● किंमत:१३० रु. ● सभासदांना:९१ रु. ● पोस्टेज:२५रु.**

**आगामी**



**चार शब्द द्यावे - घ्यावे**


**(संभाषणचातुर्यावर उपयुक्त माहिती)**

**संजीव परळीकर**

आपल्या अंगातली हुशारी दाखवायची असेल, तर संभाषण हे करावचं लागतं. चार शब्द देताना आणि घेताना थोडीशी काळजी घ्यायची. ती आपल्याला कशा प्रकारे घ्यायची याबद्दल उपयुक्त माहिती देणारे असे हे मार्गदर्शक पुस्तक.

**किंमत ७०रु.**
**पोस्टेज २० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




## भास-आभासाच्या अद्‌भुत पातळीवर नेणाऱ्या गुढरम्य भयकथा

# मांजराची सावली

**जयश्री कुलकर्णी**

'मांजराची सावली' आणि 'विषवल्ली' या दोन भयकथासंग्रहात जयश्री कुलकर्णी यांनी वेळोवेळी लिहिलेल्या निवडक २० भयकथांचा समावेश झाला आहे.

भयकथा, गूढकथा, रहस्यकथा यांच्या वाट्याला सहसा महिला जात नाहीत; परंतु जयश्री कुलकर्णी यांनी लेखिका म्हणून कुठलेही क्षेत्र स्वत:ला वर्ज्य मानलेले नाही. सामाजिक, कौटुंबिक कथांबरोबरच मनोविश्लेषणात्मक कादंबरी, ललित लेख एवढेच नव्हे तर वास्तुशास्त्र, पर्यटन, विज्ञान यावरही लेखन केले आहे आणि निरनिराळ्या वृत्तपत्रांतून तसेच मासिकांतून त्यांचे हे लेखन छापून येत आहे. साठ-सत्तर रहस्यकथा त्यांनी लिहिल्या आहेत. 'कुठल्याच एका लेखनविषयाशी बांधिलकी ठेवणे मला रुचत नाही...' असे त्या म्हणतात. अमुकच विषय किंवा लेखनप्रकार जमतो असा न्यूनगंड त्यांना कधी वाटला नाही, उलट वेगवेगळे वाङ्‌मयप्रकार हाताळावेसे वाटले, लेखनात साचेबंदपणा येऊ नये असा प्रयत्न त्यांनी केला. रहस्यकथा आणि गूढकथा हे लेखनप्रकार जुळ्या भावंडांसारखे आहेत असे त्यांना वाटते. त्यामध्ये खूप साम्य आहे. परंतु दोन्ही प्रकारांचे तंत्र आणि मांडणी करताना वैचारिक भूमिका मात्र पूर्णतया वेगळी असावी लागते असा त्यांचा अनुभव आहे. रहस्यकथेत तर्कशुद्धतेवर सतत अनपेक्षित घटना आणि प्रसंग कथावस्तूत आणावे लागतात आणि त्या घटना-प्रसंगांच्या शक्यतेबद्दल वाचकाला अविश्वास वाटू नये अशा प्रकारे त्यांचे स्वरूप वास्तवदर्शी, विश्वसनीय राहावे अशी काळजी घ्यावी लागते. संबंधित व्यक्तींचे वर्तनही सुसंगत आणि पटण्यासारखे असावे लागते. गूढकथेत किंवा भयकथेत घटनाक्रम हा वास्तवाच्या वा तर्काच्या चौकटीतलाच असण्याची गरज नसते. पात्रांचे विचार, पात्रांचे वर्तन रूढ संकेतांना डावलणारे असू शकते. त्यांचे वेगळे तर्कशास्त्र असते. अतींद्रिय शक्तींचे किंवा घटनांचे स्वरूप अनेकदा आपल्या साचेबंद कल्पनांच्या पलीकडे जाऊन काहीतरी अद्‌भुत, अचाट, आश्चर्यकारक असते. त्या घटनेमागची स्पष्टीकरणे ही वास्तवाच्या कसोट्यांना झुगारून देणारी, वेगळ्याच मानसिक भास-अभासाच्या आणि इंद्रियांच्या पातळीवर नेणारी असतात. अतृप्त वासनांच्या पूर्ततेसाठी रेंगाळत राहिलेले जीव, भूतयोनीतले जीवात्मे, पूर्वजन्माचे स्मरण असणारे जीव, पशुपक्ष्यांची विविध रूपे धारण करण्याची क्षमता असणारे जीव, जारण मारण वशीकरण-तंत्रामंत्रांमधील सिद्धी अवगत असणारे जीव, टेलिपथी, टेलिपोर्टेशन, ब्लॅक मॅजिक, मंत्रतंत्राने स्थल-कालावर मात करू शकणाऱ्या सिद्धी, एकाच वेळी दोन वा अधिक ठिकाणी उपस्थित राहण्याची क्षमता, मृत्यूचा अनुभव, मृत्यूनंतरचे अस्तित्व, अज्ञाताचे भय, झपाटलेले घर किंवा वास्तू, गुप्त खजिन्याचे संरक्षण करणारे भुजंग, अबोध मनातल्या भयगंडाच्या भावना, अशा अनेकविध प्रकारचे अनुभव गूढकथा 'वास्तव' पातळीवर ग्राह्य धरून, विश्वासार्ह वाटतील अशा कौशल्याने पेश करते. अशा अशुभ शक्तींवर काबूत ठेवण्याच्या सिद्धी अवगत असणारे काही साधक, मांत्रिक, तांत्रिक वा सत्त्वशील सज्जन संतमहंतही आपला प्रभाव दाखवण्यास पुढे येतात. ते अशुभाचे निवारण करतात.

**शक्तींचे किंवा घटनांचे स्वरूप अनेकदा आपल्या साचेबंद कल्पनांच्या पलीकडे जाऊन काहीतरी अद्‌भुत, अचाट, आश्चर्यकारक असते. त्या घटनेमागची स्पष्टीकरणे ही वास्तवाच्या कसोट्यांना झुगारून देणारी, वेगळ्याच मानसिक भास-आभासाच्या आणि इंद्रियांच्या पातळीवर नेणारी असतात.**

'मांजराची सावली' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत जयश्री कुलकर्णी म्हणतात, ''भीतीचे किंवा घाबरण्याचे आणि घाबरवण्याचे आकर्षण माणसाला लहानपणापासूनच असते... तरीही लहान मुलांना अपरिपक्व वयात भूतकथा, भयकथा सांगू नयेत किंवा वाचायला देऊ नयेत. बालवाचक बौद्धिकदृष्ट्या पूर्ण विकसित झाला, आयुष्याकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन सक्षम झाला, तसेच श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक त्याला समजू लागला तरच भयकथा-भूतकथांमधील कल्पनाविश्वाला सामोरा जायला तो तयार झाला असे म्हणता येईल. मांगल्यावरच्या श्रद्धेचा पाया भक्कम असायला हवा. थोडक्यात, थोड्या वेळेपुरते 'रोमांचक अनुभवातून' जाणे वेगळे आणि कायमच मनात अनाकलनीय भीतीचे ओझे बाळगून जगणे वेगळे. चुकीच्या कल्पनांच्या प्रभावाखाली जगणारी काही प्रौढ माणसेही अमंगल शक्तींचे अस्तित्व, देवदेवतांच्या आराधनेतील कडक नियम किंवा इतर ताण उरावर

**एके रात्री धाकटी मुलगी झोपेतून उठून स्वप्नात भयंकर मांजर दिसतेय म्हणू लागली... मी स्वतः एकदा तिच्या डोक्यावरून हात फिरवत असताना मला तिची सावली भिंतीवर दिसली. ती सावली मांजराची होती...हे सर्व काय चाललंय तेच कळत नाही...'**

बांधून जन्मभर जगतात. हे निश्चितच धोकादायक आहे. प्रत्येक सुजाण व्यक्तीने याचे भान ठेवायला हवे.''

जयश्री कुलकर्णी यांच्या भयकथा या स्वयंस्फूर्त, स्वतंत्र आहेत आणि त्यांच्या केंद्रस्थानी कल्पनाव्यूहांचे वेगवेगळे नमुने आढळतात.

'मांजराची सावली' ही कथासंग्रहाला शीर्षक पुरवणारी कथा.

डॉ. मनोजकडे त्यांचे क्लबमधले मित्र नेमाडे येऊन एक अजब तक्रार करतात, ''आमच्या घरातील रेडिओच्या जागी फ्लॉवरपॉट, गोल टिपॉयच्या जागी आयताकृती टिपॉय, साडेसहा फुटी कपाटाच्या जागी पाच फूट उंचीचे कपाट अशा वस्तू आहेत... त्या कशा बदलल्या गेल्या हेच कळत नाही... एके रात्री धाकटी मुलगी झोपेतून उठून स्वप्नात भयंकर मांजर दिसतेय म्हणू लागली... मी स्वत: एकदा तिच्या डोक्यावरून हात फिरवत असताना मला तिची सावली भिंतीवर दिसली. ती सावली मांजराची होती...हे सर्व काय चाललंय तेच कळत नाही...' डॉ. मनोज याला आपल्या काकांकडून टेलिट्रॅन्सफॉर्मेशनची विद्या मिळालेली असते आणि अमंगल शक्तींच्या तसेच अघोरी मांत्रिकांपासून संरक्षण होण्यासाठी एक संरक्षक कवचही त्याच्या शरीराभोवती तयार केलेले असते. आपल्या योगसाधनेचे सर्व सामर्थ्य एकवटलेला एक नीलमणीही काका त्याला देतात. शुद्ध आचरण आणि परमेश्वराची सेवा करीत राहा असे सांगून ते आपल्या संग्रहातील दुर्मिळ वैद्यकीय व इतर पुस्तकांचीही व्यवस्था पहा असे सांगतात. त्यानंतर त्यांचे देहावसान होते. नेमाडे यांच्या घरात टेलिट्रॅन्सफॉर्मेशनचा प्रकार होत असणार हे मनोजच्या लक्षात येते. तो नेमाडे यांच्या शेजारी नव्यानेच एक भाडेकरू रहायला आल्यावर या प्रकारांना सुरुवात झाली असे नेमाडे म्हणतात तेव्हा त्या शेजाऱ्याला डॉ. मनोज भेटतो... हा शेजारी म्हणजे अंगद... त्याच्याकडे आपल्या काकांची काही पुस्तके मनोजला दिसतात... ती रद्दीवाल्याकडून घेतली आहेत असे अंगद सांगतो... त्यावरून त्याने टेलिट्रॅन्सफॉर्मेशनची विद्या आत्मसात केलेली असते आणि नेमाडे यांचा सावत्रभाऊ असल्याचा दावा करून तो म्हणतो, ''तुमच्या मुलीचं मांजरात रूपांतर झालं तरी तिचं मन आणि बुद्धी मात्र माणसाचीच राहणार... मला २५ हजार दिले तर मी माघार घेईन...'' डॉ. मनोजवर तो अशुभ शक्तींद्वारे हल्ला चढवू



पाहतो; परंतु नीलमण्यामुळे मनोजवर काही परिणाम होत नाही. अंगद म्हणतो, ''आता तू वाचलास. पण माझ्या शक्तीची कल्पना तुला आली असेल. माझ्यापासून दूर राहा...''

**लक्षा रद्दीवाला एक चार बाय आठचा दुकानाचा गाळा भाड्याने घेतो. त्या गाळ्यातला लाँड्रीवाला मरण पावल्याने तो गाळा रिकामा झालेला असतो... डिपॉझिटची रक्कम एक हजार रुपये कशी भरायची हा प्रश्न त्याला पडतो. परंतु गांधी पुलाजवळ एक माणूस पडलेला त्याला दिसतो आणि....**

अंगदच्या या धमकीने डॉ. मनोज त्याचा बंदोबस्त करण्यासाठी आपल्या विद्येचा वापर करतो. सुधीराच्या शरीरावर आपल्या डोळ्यांतून निघणारे विशिष्ट किरण केंद्रित करतो. मांजराच्या शरीराचे उपरे अणू वेगवेगळे होऊन, आसपास वावरणारे मूळ अणू आपली जागा घेतात आणि सुधीरा पूर्ववत होते... तिच्या शरीराभोवती मनोज संरक्षक कवच तयार करतो.

ही कथा इथेच संपत नाही.

अंगद हा सुधीराला पळवून नेतो आणि कालभैरवीच्या देवळात तिचा नरबळी देऊ पाहतो. नेमाडे डॉ. मनोजकडे मदतीसाठी येतात... मनोज नीलमणी खिशात टाकून बघतो तर नेमाडे यांच्या जागी एक पांढरट विरविरीत आकार दिसतो... स्वत:भोवती संरक्षक कवच तयार करून मनोज निघतो... अंगदने नेमाडेंच्या रूपात अशुभ शक्तीला पाठवले आहे हे तो ओळखतो आणि अंगदचा डाव त्याच्यावर उलटवतो. अंगदला न मारता टेलिट्रॅन्सफॉर्मेशनद्वारे त्याच्या शरीरातले अणु-परमाणूत रूपांतर करून ते सर्व दिशांना पसरवून टाकतो. बळीच्या चौथऱ्यावरील स्त्रीला मुक्त करतो आणि ''तू आता घरी जाशील आणि घडलेला सर्व प्रकार विसरून जाशील'' असाही संदेश देतो.

टेलिट्रॅन्सफॉर्मेशनची कल्पना वापरून 'मांजराची सावली' या कथेची उभारणी केली गेली आहे.

लक्षा रद्दीवाला एक चार बाय आठचा दुकानाचा गाळा भाड्याने घेतो. त्या गाळ्यातला लाँड्रीवाला मरण पावल्याने तो गाळा रिकामा झालेला असतो... डिपॉझिटची रक्कम एक हजार रुपये कशी भरायची हा प्रश्न त्याला पडतो. परंतु गांधी पुलाजवळ एक माणूस पडलेला त्याला दिसतो आणि त्याच्या शेजारी पडलेल्या पाकिटात त्याला नोटांची चवड दिसते. कोणी बघत नाही हे बघून तो ते पाकिट उचलून आपल्या झोपडीत येतो... त्यात एक हजार रुपयांच्या नोटा असतात... गाळ्याचे डिपॉझिट देऊन तो गाळा ताब्यात घेतो... त्या गाळ्यात बसल्यावर अधूनमधून त्याच्या डोक्यात कलकल होऊ लागते. समोरच्या कागदावर

**'चक्रव्यूह' या कथेत पाच वर्षांपूर्वी पुराणवस्तू संशोधन करताना रुपाली मध्यप्रदेशच्या जंगलातल्या स्टडी टूरच्या वेळी तेथून आणलेल्या वस्तूंपैकी एका चपट्या डबीला अपशकुनी मानत असते. त्या डबीत कसले तरी चूर्ण असते आणि पाठीमागे विचित्र लिपीत काहीतरी कोरलेले असते.**

काही रेघोट्या दिसू लागतात... आणि काही अपघातांची भयंकर चित्रे कागदावर दिसू लागतात... सुसाट येणारा ट्रक– सायकल... टक्कर... त्याच्या खाली झालेला रक्तमांसाचा चिखल... बस पुलावरून नदीत पडून झालेले मृत्यू... आणि आश्चर्य म्हणजे कागदावरच्या या आकृत्यांनुसार प्रत्यक्ष घडणाऱ्या. घटनांच्या बातम्या नंतर वृत्तपत्रात दिसतात... तो अस्वस्थ होतो... त्याची खाण्यापिण्यावरची वासना उडते... दुकानात गेल्यावर वेगवेगळे आवाज त्याच्या कानावर आदळतात... त्याला कागदावर चित्र काढायला भाग पाडतात... 'ए साल्या, चित्र काढ...'' तो गाळा आधीच बळी गेलेल्या अनेक जीवांचे आश्रयस्थान असतो... तो घरी जातो... परत दुकानात येतो. कागद पेन्सिल हातात घेतो. चूप बसा एकदम. मी तुमचा बळी तुम्हाला देतोय...'' आणि आवाज बंद होतात... कागदावर तो स्वत:चेच चित्र काढतो... दुसऱ्या दिवशी तो मृतावस्थेत सापडतो. चौकशीला आलेला इन्स्पेक्टर दुकानाच्या पायरीवर बसतो... त्याच्या मेंदूत असह्य कलकल होऊ लागते... ते डोके गच्च दाबून धरतात... त्या गाळ्यातले अतृप्त आत्मे आपल्या नव्या बळीची व्यवस्था करतात... 'मृत्यूचे दलाल' ही कथा दुसऱ्या माणसाद्वारे अतृप्त आत्मे आपल्या खाद्याची, आपल्या बळीची योजना कशाप्रकारे पुढे नेत राहतात याची एक तऱ्हा प्रकट करते.

डॉ. मनोजप्रमाणेच पंडितराव नामक एक सिद्धीप्राप्त मांत्रिकही काही कथांमध्ये भेटतात.

'चक्रव्यूह' या कथेत पाच वर्षांपूर्वी पुराणवस्तू संशोधन करताना रुपाली मध्यप्रदेशच्या जंगलातल्या स्टडी टूरच्या वेळी तेथून आणलेल्या वस्तूंपैकी एका चपट्या डबीला अपशकुनी मानत असते. त्या डबीत कसले तरी चूर्ण असते आणि पाठीमागे विचित्र लिपीत काहीतरी कोरलेले असते. तिचा विश्वासू नोकर चंदन ती डबी उघडतो आणि त्यानंतर बेपत्ता होतो तेव्हा रुपाली आपला मित्र विभाकर याला बोलावून ती डबी दाखवते. विभाकर म्हणतो, ''ही डबी पंडितरावांना दाखवायला हवी. ते तिचे रहस्य शोधून काढतील.'' पाच वर्षांपूर्वीच्या त्या स्टडी टूरमध्ये रुपाली तिचे प्रा. सिन्हा व इतर सहकारी मित्र यांना जंगलात राहणारी एक आदिवासी तरुणी भेटलेली असते. डॉ. सिन्हा यांना ती डबी सापडलेली



असते आणि नंतर ते मृतावस्थेत आढळतात... पंडितराव ही पूर्वकहाणी ऐकून, या डबीत एक दुर्दैवी आत्मा बंदिस्त असावा असा तर्क करतात आणि मंत्राने मारलेले पाणी त्या डबीवर टाकतात. त्याबरोबर ती डबी टणटण उड्या मारू लागते. एक पुरुषी किंकाळी ऐकू येते. ''मला त्रास देऊ नको.'' ''मी तुला मुक्ती देणार आहे. तू कोण आहेस?'' तेव्हा आवाज येतो, ''मी सोमदत्त. चारशे वर्षांपूर्वी मी सेनापती होतो. बादशहाच्या बेगमेचे प्रेम माझ्यावर जडले. पण तिच्या दासीने घात केला. बादशहाने माझे डोके धडावेगळे केले. बेगमेलाही ठार केले आणि मला म्हटले– मी तुझ्या आत्म्याला कायमचे जखडून ठेवणार आहे. तुझ्या अस्थींचे चूर्ण करून ते डबीत बंदिस्तकरणार आहे. बेगमेच्या प्रेताबरोबर ही डबी राहील...''

**नंतर पंडितराव खुलासा करतात, ''सोमदत्ताची ती डबी दोनशे वर्षांपूर्वी एका युवतीने उघडली. तिच्या आत्म्याला थडग्यापाशी पहारा देत बसण्याची वेळ आली. नंतर प्रा. सिन्हा यांच्यावर ती पाळी आली... आता त्यांची जागा चंदनने घेतलीय... हे दुष्टचक्र आहे.''**

पंडितराव त्याला आश्वासन देतात, ''सोमदत्त, मी तुझ्या अस्थिचूर्णावर धार्मिक संस्कार करवून तिचे योग्य जागी विसर्जन करीन. तुला मुक्ती मिळवून देईन.''

...पंडितराव रुपालीला घेऊन त्या मध्यप्रदेशातील जंगलात जातात... त्यांनाही ती झोपडी– तिच्यासमोर एक व्यक्ती दिसते... ती व्यक्ती म्हणजे चंदन असते... रुपाली हाक मारते... पण पंडितराव म्हणतात, ''हा चंदन नाही. ही एक अमानवी शक्ती आहे... तू रिंगणात पाऊल ठेवू नकोस...''

नंतर पंडितराव खुलासा करतात, ''सोमदत्ताची ती डबी दोनशे वर्षांपूर्वी एका युवतीने उघडली. तिच्या आत्म्याला थडग्यापाशी पहारा देत बसण्याची वेळ आली. नंतर प्रा. सिन्हा यांच्यावर ती पाळी आली... आता त्यांची जागा चंदनने घेतलीय... हे दुष्टचक्र आहे.''

...या कथेत शेवटी आणखी एक 'आश्चर्य' प्रकट होते. हा सोमदत्त कोण?ही रुपाली कोण?... त्यांचे पूर्वजन्मीचे ऋणानुबंध कसे असतात... त्याचा केवळ निर्देश येतो आणि कथा संपते.

मसुरीच्या ग्रीन व्ह्यू हॉटेलमध्ये डॉ. दिवाण यांच्या पत्नीचा खून केल्याच्या आरोपावरून प्रा. जयवंत नामजोशी यांना पोलिस कोठडीत डांबले जाते. तो खून नामजोशींनी केलेला नाही...

डॉ. दिवाण यांची व नामजोशींची गाठ त्या हॉटेलातच पहिल्यांदा पडली.

**पूर्वी एकदा फॉरेस्टच्या गेस्ट हाऊसमध्ये उतरलो होतो. रात्री स्वप्न पडले. शेजारच्या खोलीचे दार उघडे होते- त्यातून पाण्याचा आवाज येत होता... मी जाऊन बघितले... बाथरूम... त्यात एका तरुणीचे प्रेत... मी घाबरलो... खून खून ओरडत बेशुद्ध पडलो. हा केवळ भास होता...**

रात्री २०९ नंबरच्या खोलीतून किंकाळी ऐकू येते. ''टबमध्ये बाईचे प्रेत आहे. ती तेथे कोठून आली हे मला ठाऊक नाही,'' असे त्या खोलीत राहणारे नामजोशी सांगतात. मॅनेजर व इतर लोक जमा होतात. मॅनेजर आत बाथरूममध्ये जाऊन बघतो. त्या गृहस्थाला म्हणतो, ''टबमध्ये तर काहीही नाही. तुम्हाला भास झाला असेल...'' इतर पॅसेंजरही खालीपिली नींद हराम कर दी– म्हणून चरफडत आपापल्या खोलीत जातात... त्या गृहस्थाला डॉ. दिवाण आपली ओळख देऊन म्हणतात, ''उगाच खूप घाबरलात तुम्ही. तुम्हाला थोडी ब्रॅन्डी आणून देतो... ती घ्या म्हणजे बरे वाटेल.'' नंतर ते दोघे गप्पा मारत बसतात.

प्रा. नामजोशी बोलता बोलता म्हणतात, ''माझं मघाचं वागणं अगदीच मूर्खपणाचं होतं, नाही? सगळ्यांनाच त्रास झाला त्यामुळे... स्वप्न आणि सत्य यांची माझ्या मनात गल्लत होते कधी कधी... त्यावेळी माझ्या मनाच्या पार चिंध्या होतात... पूर्वी एकदा फॉरेस्टच्या गेस्ट हाऊसमध्ये उतरलो होतो. रात्री स्वप्न पडले. शेजारच्या खोलीचे दार उघडे होते– त्यातून पाण्याचा आवाज येत होता... मी जाऊन बघितले... बाथरूम... त्यात एका तरुणीचे प्रेत... मी घाबरलो... खून खून ओरडत बेशुद्ध पडलो. हा केवळ भास होता... अजूनही त्या स्वप्नाने मी अस्वस्थ होतो... आजही त्या स्वप्नाची पुनरावृत्ती झाली आहे... स्वप्नाचा शेवट मात्र वेगळा झाला... पोलिस माझी चौकशी करीत आहेत... मी खून केलेला नाही हे सांगतोय... पण ते मला मारहाण करून माझ्याकडून कबुलीजबाब मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत...''

डॉ. दिवाण म्हणतात, ''ही तुमच्या सबकॉन्शस माइंडने निर्माण केलेली भुतावळ असावी... तुमचा प्रेमभंग वगैरे झालाय का?...''

''माझं एका मुलीवर प्रेम होतं खरं... पण मला लग्न नको होतं. ते प्रेम स्वप्नाच्याच पातळीवर मी राहू दिलं. प्रेमभंग वगैरे काही झाला नाही. मानसोपचार तज्ज्ञांकडेही मी गेलो. ते असेच म्हणतात.''

डॉ. दिवाण त्यावर सुचवतात, ''ते रिपोर्ट आहेत का? मला दाखवा.''

...आणि तीन-चार दिवसांनी डॉ. दिवाण प्रा. नामजोशींना म्हणतात, ''यू-



यूकिल्ड माय वाइफ– वेडाच्या भरात तुम्ही माझ्या बायकोचा खून केलात...''

प्रा. नामजोशींना पोलिस पकडून नेतात...

डॉ. दिवाणांचे सांत्वन पोलिस इन्स्पेक्टर करतात... डॉ. दिवाण मनातल्या मनात प्रा. नामजोशींना धन्यवाद देतात... पझेसिव्ह वृत्तीच्या आपल्या पत्नीच्या इस्टेटीवर डोळा असणाऱ्या डॉ. दिवाणांना नामजोशींच्या निमित्ताने स्वच्छंदी आयुष्य जगायची उत्तम संधी मिळाली होती ना!

...परंतु लेखिका ही कथा इथे संपवत नाही.

**डॉ. दिवाण खुषीत रात्री ड्रेसिंग टेबलापुढे उभे राहतात... दीप्तीकडे जायचे ठरवतात... आणि बाथरूममध्ये जातात... तेथे टबमध्ये मृत पत्नी प्रिया त्यांच्याकडे बघत असते... डॉ. दिवाण किंकाळी फोडतात...**

डॉ. दिवाण खुषीत रात्री ड्रेसिंग टेबलापुढे उभे राहतात... दीप्तीकडे जायचे ठरवतात... आणि बाथरूममध्ये जातात... तेथे टबमध्ये मृत पत्नी प्रिया त्यांच्याकडे बघत असते... डॉ. दिवाण किंकाळी फोडतात...

...भूतप्रेतावर विश्वास असो नसो, 'त्या दारापलीकडे' ही कथा शेवटपर्यंत वाचकाला खिळवून ठेवते.

'नरबळी'मधील गूढरम्य वातावरण– संन्यासी मांत्रिक– देवीपुढे आत्मसमर्पण करायला निघालेला चक्रधर आणि पंडितराव– विभाकर यांनी त्याला वाचवण्याचा केलेला प्रयत्न... त्यामुळे चिडलेला संन्यासी... त्या संन्याशावर तुटून पडलेले वखवखणारे आत्मे...


पंडितराव त्या संन्याशावर अंत्यसंस्कार करून त्याला मुक्त करतात...

हे पंडितराव 'विषारी विळखा' या कथेतही पुन्हा भेटतात. अमितावर प्रेम करणाऱ्या सोमनाथचा खून करून त्याचे प्रेत कारंजासाठी खणलेल्या खड्ड्यात पुरण्यात येते... अमिताचे लग्न होते... तिच्या वडिलांना वेड लागते... अमिताला वेगवेगळे भास होऊ लागतात... पंडितराव तिला घेऊन... त्या सोमनाथच्या आत्म्याला आश्वासन देतात, ''तुझी काही इच्छा असेल तर ती पूर्ण करायचे वचन देते... तुझ्या बायकामुलांना सुखाचा घास मिळेल अशी व्यवस्था करते... कारंजाखाली पुरलेल्या तुझ्या देहावर योग्य ते धार्मिक संस्कार करते...''

...आणि बागेतले कारंजे उद्ध्वस्त होते. तेथे एक सांगाडा सापडतो... पंडितरावांची कामगिरी फत्ते होते.

**पृष्ठे: १७६ ● किंमत: १३० रु. ● सभासदांना: ९१ रु. ● पोस्टेज: २५ रु.**

## नवे कोरे




# अलाइव्ह

मूळ लेखक: **पिअर्स पॉल रीड**

अनु : **अशोक पाथरकर**

**किंमत: १५०रु.**
पोस्टेज: २५रु.

चाळीस उतारू व पाच कर्मचारी यांना घेऊन उड्डाण केलेले ते विमान अँडीज पर्वतावर आदळले. तुकडे झालेल्या विमानाचा अर्धा भाग एवढाच आसरा त्यांना उरला! थोडीशी वाईन व काही चॉकलेटे एवढेच खाद्य!

अपघात झाला तेव्हा फक्त ३२ जण वाचले होते. काही दिवसात २७ उरले. मग १९ आणि शेवटी फक्त १६!


शेवाळेसुद्धा नसलेल्या बर्फाच्छादित उंचीवर ते ७२ दिवस कसे जिवंत राहिले? कसे वागले? त्यांची सुटका कशी झाली? आणि सुटकेनंतर त्यांना कोणत्या अनुभवाला सामोरे जावे लागले? याची रोमांचकारी सत्यकथा!



**नाविन्यपूर्ण अनुभवांचे वैचित्र्य प्रकट करणाऱ्या भयकथा.**

# विषवल्ली

**जयश्री कुलकर्णी**




'मांजराची सावली' या कथासंग्रहातील तीन कथांमध्ये भेटणारे महानयोगी, साधनेद्वारे अतींद्रिय शक्ती मिळवून अमंगल शक्तींपासून लोकांना मुक्त करणारे पंडितराव 'विषवल्ली' या पुस्तकातील 'कशासाठी? सुखासाठी?' या कथेतही भेटतात. हिमालयात योगसाधना करून सुखदेव हा अंगारक महाराज बनून आपल्या जुन्या ओसाड वाड्यात मुक्कामाला येतो. हिमालयाच्या गिरीकंदरात एका हठयोग्याच्या मार्गदर्शनाखाली तो काही सिद्धी मिळवतो. त्या सिद्धींच्या आधारे माणसाला सुखी बनवण्याचा मार्ग आपल्याला सापडला आहे असा त्याचा दावा असतो. कुतुहलाने त्याला बघायला आलेल्या शाळकरी मुलांना तो 'बादली' आपोआप विहिरीतून पाणी घेऊन येते, कवटी हवेतून समोर येऊन तुम्हाला काय हवेय असे विचारते वगैरे चमत्कार दाखवून घाबरवून टाकतो. तो गावात अधूनमधून येत राहतो. पण लोक त्याच्या नादी लागत नाहीत. त्याच्यापासून दूरच राहतात... डॉ. श्रीपाद जोगदंड हे कलाप्रेमी गृहस्थ चित्रप्रदर्शन बघता बघता गायब होतात... त्यामुळे पोलिस खातेही संभ्रमात पडते... पंडितरावांच्या वाचनात त्याबद्दलच्या बातम्या येतात आणि त्यांना या प्रकाराचे आश्चर्य वाटते. त्यांचा शिष्य आणि मदतनीस मित्र विभाकर त्यांना भेटायला येतो आणि सांगतो, ''आज सकाळी टेकडीवर कोवळ्या उन्हात बसून एक पुस्तक वाचत होतो... त्यातील एका परिच्छेदाच्या शेवटी असणाऱ्या प्रश्नार्थक वाक्याने मी विचारात पडलो... ते प्रश्नचिन्ह सर्व जगाला व्यापून टाकत आहे असे मला जाणवले. माझे देहभान हरपले. ते प्रश्नचिन्ह आपला जबडा उघडून मला गिळायला पुढे येत आहे. असे वाटले; कोणीतरी माझा हात धरून मला ओढताना दिसले... मी पृथ्वीकडे

**''माणसाला सुखाची आसक्ती असते. ती त्याला कधीच सुख देऊ शकत नाही. त्याची विचारशक्ती त्याच्या सुखाच्या आड येते. विचारशक्तीच नसेल तर माणसाची आसक्ती, माणसाचा हव्यास त्याच्या सुखाच्या आड येणार नाही. जे मिळेल त्यावर माणूस खूष राहील.**

खेचला गेलो. आपण पुस्तक वाचतोय हे मला आढळले... पण त्या क्षणी प्रचंड उलथापालथ झाल्याची भावना मनात घोटाळत होती... मी त्वरेने टेकडीवरून खाली आलो... तुम्हाला भेटावे असे वाटले.''

''तू टेकडीवर एकटाच होतास का?'' पंडितराव प्रश्न विचारतात.

''प्रथम एकटाच होतो... पण नंतर माझ्यापासून काही अंतरावर एक बैरागी मला दिसला. तो माझ्याकडे रोखून बघत होता... भगवी कफनी... गळ्यात रुद्राक्ष माळा... दाढी... क्रूर डोळे...''

''याचा अर्थ कोणीतरी आपल्या मनोबलाच्या जोरावर तुला सशरीर कोठेतरी घेऊन जात होते... पण तुझी माझ्याशी असणारी मानसिक संलग्नता त्या व्यक्तीच्या प्रयत्नाआड आली आणि तू स्वत:चे संरक्षण करू शकलास... याआधी बेपत्ता झालेल्या लोकांकडे जाऊन तू त्यांची माहिती मिळव... ते गायब झाले तेव्हा कोणी बैरागी जवळ होता का ते शोधून काढ.''

पंडितरावांची शंका बरोबर निघते. बेपत्ता झालेल्या व्यक्तींच्या जवळपास वाड्यातला बैरागी होता असे सांगणारे साक्षीदार मिळाले... हा बैरागी मनोबलाने या व्यक्तींना कुठे नेत असावा असा प्रश्न त्यांना पडतो... त्यासाठी पंडितराव आणि विभाकर गावाबाहेरच्या त्या ओसाड वाड्यात प्रवेश करतात...

...अंगारक बैरागी पंडितरावांना आपल्या मायाजालात अडकवू पाहतो. ते त्याला जमत नाही.

नंतर अंगारक सांगतो, ''मी हे सर्व मनुष्यजातीच्या सुखासाठी करीत आहे. मी त्या व्यक्तींना बळी दिलेले नाही. मी त्यांना सृष्टीत नेले आहे. तेथे ते सर्वजण मजेत आहेत...''

तसे करण्याचे कारण तो स्पष्ट करतो, ''माणसाला सुखाची आसक्ती असते. ती त्याला कधीच सुख देऊ शकत नाही. त्याची विचारशक्ती त्याच्या सुखाच्या आड येते. विचारशक्तीच नसेल तर माणसाची आसक्ती, माणसाचा हव्यास त्याच्या सुखाच्या आड येणार नाही. जे मिळेल त्यावर माणूस खूष राहील. मी निर्माण केलेल्या सृष्टीत कोणत्याच माणसाला आपण कोण, कुठले हे स्मरत नाही. इतर जगाहून आपले भिन्न अस्तित्वही त्याला जाणवत नाही. जे मिळेल



त्यावर तो खूष असतो.''

''म्हणजे तू त्यांना पशूच्या पातळीवर नेऊन ठेवलेस... तुझा हेतू चांगला आहे. पण तुझा मार्ग चुकीचा आहे. त्या बेपत्ता व्यक्तींच्या आप्तमित्रांना तू दु:खी केलेले आहेस.''

''मी त्यांनाही माझ्या सृष्टीत नेईन.''

''त्यांची विचारशक्ती नष्ट करून तू त्यांना नेऊ पाहतोस... मग पशू आणि ते यांच्यात काही फरक उरणार नाही... माणसाने बुद्धीच्या बळावर सुखाची अनंत साधने निर्माण केलेली आहेत... त्यांनाही मग अर्थ उरणार नाही...''

**''त्यांची विचारशक्ती नष्ट करून तू त्यांना नेऊ पाहतोस... मग पशू आणि ते यांच्यात काही फरक उरणार नाही... माणसाने बुद्धीच्या बळावर सुखाची अनंत साधने निर्माण केलेली आहेत... त्यांनाही मग अर्थ उरणार नाही...''**

''मला तुमचा उपदेश नकोय. मी हे कार्य असेच शेवटपर्यंत करीत राहणार... मला कोणी अडवू शकणार नाही... आता याचा प्रयोग मी तुमच्यावरच करणार आहे. तुम्हाला माझ्या त्या सृष्टीत नेऊन टाकणार आहे... आता तुम्ही येथून चालते व्हा... या वाड्यात थांबू नका.''

पंडितराव विभाकरला सांगतात, ''हा माणूस फारच पक्का आहे... तो माणसाचे ट्रान्सफॉर्मेशन करण्याचे जे मंत्र वापरतो ते म्हणजे ज्याचं ट्रान्सफॉर्मेशन करायचे त्या व्यक्तीची एखाद्या वस्तूच्या ठिकाणी एकाग्रता झालेली असेल तेव्हा आपल्या मानसिक शक्तींचा उपयोग करून त्या व्यक्तीला नाहीसा करणे...''

अंगारक बैरागी पंडितरावांच्या घरापुढे चकरा मारीत राहतो पण पंडितराव सावध असतात. पंडितराव एका वरातीपुढचे दारूकाम बघत असताना बैरागी तेथील भुईनळ्याकडे लक्षपूर्वक बघत राहतो... आणि पंडितराव त्याचे बैराग्याचेच टेलिट्रॉन्सफॉर्मेशन करतात... तो भुईनळा आकाशाला भिडतो. त्यातली एक ठिणगी विराट रूप धारण करून अंगारकाच्या दिशेने येते आणि पलीकडे जाते. अंगारकाला आपल्या शरीराचा विलक्षण दाह झाला एवढेच समजले.

''मी अंगारकाला त्यानेच बनवलेल्या सृष्टीत पाठवून दिले... त्याचीच युक्ती वापरून त्याला त्या जगात पाठवल्याने तिकडे गेलेला अंगारक मांत्रिक असणार नाही... त्याला स्वत:चे असे व्यक्तिमत्त्व असणार नाही. तो बुद्धिहीन, विचारहीन पण सुखी मनुष्यप्राणी बनला आहे...''

''त्याने नेलेल्या इतर माणसांचे काय?''

''त्यांच्यासाठी मी फक्त प्रार्थना करू शकतो. अंगारकाच्या मंत्रांचा त्यांच्यावरचा

**जॉर्ज एकटाच आदिवासी वस्तीत जाऊन अर्धनग्न युवतींचे फोटो काढू लागतो... एका स्त्रीला स्पर्श करतो तर आसमंतात एक वेगळीच निःस्तब्धता पसरल्याचे त्याला जाणवते... तो वस्तीकडे नजर टाकतो... प्रत्येक झोपडीपुढे आदिवासी स्त्रीपुरुष त्याला उभे दिसतात...**

प्रभाव संपल्यावर त्यांना आपल्या माणसांत परत यावेसे वाटेल... त्यांच्या इच्छाशक्तीवर ते अवलंबून राहील... अंगारक हजारो लोकांना पशू बनवणार होता... त्याच्या जाण्याने मानवावरचे महान संकट टळले आहे.''

टेलिट्रान्सफॉर्मेशन या कल्पनेचा वापर करून वेगळ्या जगात वा वेगळ्या काळात जाता येते अशी कल्पना 'टाइममशीन'मध्ये वापरण्यात येते. या कथेमध्ये त्या कल्पनेचीच एक चुणूक बघायला मिळते. व्यक्तीचे लक्ष एखाद्या गोष्टीवर केंद्रित झालेले असताना तिच्या मनावर काबू मिळवता येतो हे सूत्र येथे प्रमाण मानले आहे. पडितरावही याच सूत्राचा वापर करून अंगारकाला त्याच्याच 'सृष्टीत' पाठवून देतात– ही कथेला मिळालेली कलाटणी वाचकांना आश्चर्याचा अनुभव देते.

'फुलवा'मध्ये ज्या प्रेयसीला महिंद्रने दगा दिला आणि ती गरोदर असताना तिच्यापासून पळ काढला, त्याच प्रेयसीने त्याच्या घरी दररोज रात्री येऊन त्याच्याशी रतिक्रीडा चालू ठेवल्याची कल्पना राबवली आहे. परंतु जेव्हा तिचा पाठलाग करून महिंद्र तिचा ठावठिकाणा शोधू लागतो तेव्हा त्याला ती हडळ असल्याचे जाणवते... या कथेतही महिंद्रने शेवटी दिलेली कलाटणी वाचकांना चक्रावून टाकणारी आहे.

पूर्वाश्रमीच्या प्रेमाचे पडसाद याच जन्मात नव्हे तर पुढच्या अनेक जन्मात वेगवेगळ्या देशातही उमटत राहतात. या कल्पनेभोवती 'बळी', 'प्रीत बावरी युगायुगांची' या कथा गुंफलेल्या आहेत.

भारतात जन्मलेला जॉर्ज इंग्लंडमध्ये स्थायिक होतो. भारताबद्दल त्याला तिरस्कार वाटतो. तो पत्नीच्या ब्रिजिता हिच्या आणि पत्रकार ज्युलीच्या आग्रहामुळे भारताच्या भेटीवर येतो. जॉर्ज ''वा! काय माणसं आहेत! जनावरं यांच्यापेक्षा बरी!'' अशी शेरेबाजी करीत आदिवासींच्या वस्तीत हिंडतो... त्यांचा वाटाड्या गाईड देवेंद्र त्यामुळे उद्विग्न होतो... जॉर्ज एकटाच आदिवासी वस्तीत जाऊन अर्धनग्न युवतींचे फोटो काढू लागतो... एका स्त्रीला स्पर्श करतो तर आसमंतात एक वेगळीच नि:स्तब्धता पसरल्याचे त्याला जाणवते... तो वस्तीकडे नजर



टाकतो... प्रत्येक झोपडीपुढे आदिवासी स्त्रीपुरुष त्याला उभे दिसतात... त्यांच्या नजरा जॉर्जवर खिळलेल्या असतात... भीतीची लाट त्याच्या शरीरातून थरथरत जाते... त्याला एक उग्र दर्प जाणवतो... तो खिशातून नोटा काढून त्या आदिवासींकडे भिरकावतो... पण ते त्याच्याकडे येत राहतात... ढोल वाजल्याचा आवाज ऐकून ज्युली, ब्रिजिता व देवेंद्र वस्तीत येतात... गिधाडे जॉर्जचा फडशा पाडताना दिसतात... जॉर्जचा 'बळी' गेलेला असतो.

**अमेरिकन शिष्टमंडळातून भारतात आलेल्या ग्रेगरीला राजप्रासादाजवळच्या झोपडीत मुक्काम असताना रात्री एक पहाडी स्त्री 'सैयाबीना घर सुना...' आळवताना दिसते... दुसऱ्या रात्रीही तलावाजवळ एक स्त्री दिसते... तिच्या पैंजणांचा आवाज ऐकू येतो...**

अमेरिकन शिष्टमंडळातून भारतात आलेल्या ग्रेगरीला राजप्रासादाजवळच्या झोपडीत मुक्काम असताना रात्री एक पहाडी स्त्री 'सैयाबीना घर सुना...' आळवताना दिसते... दुसऱ्या रात्रीही तलावाजवळ एक स्त्री दिसते... तिच्या पैंजणांचा आवाज ऐकू येतो... ग्रेगरी तिच्याजवळ जातो. ती स्त्री सांगते, ''माझं नाव कानन बाला... माझा महाल येथून २५ मैलांवर आहे. तिथं उद्या रात्री भोजनाला तुम्ही सर्वजण या... मी अज्ञातवासात आहे. इतर कुणाला मेजवानीचे आधी सांगू नका.'' दुसऱ्या दिवशी ग्रेगरी व त्याचे सहकारी काननबालाचा पाहुणचार घेतात. पाश्चात्त्य पद्धतीचा थाटमाट. तेथे ग्रेगरीला आपला पुतळा बघायला मिळतो. तो थक्क होतो... रात्री ग्रेगरीला एकट्यालाच काननबाला पुन्हा ये असे सुचवते. पाचशे वर्षांपूर्वीची एक घटना ती सांगते आणि म्हणते, ''त्या दिवसापासून पाचशे वर्षे मी तुझी वाट बघतेय... तुझा सूड घेण्यासाठी... माझ्या आत्म्याची मुक्ती व्हावी म्हणून...'' आणि काननबालाच्या ठिकाणी त्याला एक भेसूर भयंकर स्त्री दिसते...

आदिवासी वस्तीतून जंगलातून एक रस्ता काढण्याचा प्रस्ताव येतो... त्या रस्त्यात आदिवासी देवाचे वसतिस्थान असते. पाच उंबराची झाडे एका रिंगणात असतात... तो रस्ता त्या देवस्थानाला वळसा घेऊन करावा अशी सूचना आदिवासींचा प्रमुख वामन केशव जोशी या फॉरेस्ट ऑफिसरला करतो... पण त्या भाकडकथेवर विश्वास नाही असे जोशी सांगतो... मजूर कामाला येत नाहीत... गावात ढोल वाजला की मजूर गायब असे वरचेवर होते... ''तुमचा दगडाचा देव मला काय करणार आहे?'' असे जोशी म्हणतो. तो देवाच्या गळ्यातील कवड्यांची माळ फेकून देतो... नंतर त्याला सर्वत्र ती माळ सापासारखी आपल्या मागे मागे येत

**निनाद त्या वाड्यात राहण्याचे ठरवतो... वाड्याच्या मागे दाट जंगल असते... तो त्या जंगलात जाऊ पाहतो तर तेथील झाडे त्याच्या शरीराला भिडतात. त्याला आवळू पाहतात...**

आहे असा भास होत राहतो... तो मांत्रिकाकडे जातो... पण रात्री ती माळ त्याला खिडकीवर आवाज करतानादिसते... तो नंतर मृतावस्थेत सापडतो (मांत्रिक).

गावाजवळच्या वेताळाच्या पुलावर रात्री कोणी जायला तयार होत नाही. निवेदक रात्री त्या पुलावरून यायला निघतो. विनय त्याला पुलाशी भेटून म्हणतो, 'अरे, किती वेळ तुझी वाट बघतेय... रात्री पुलावरून जाण्यात धोका आहे.' पूल ओलांडून दोघे येतात. डाकबंगल्याचे दार उघडल्यावर सदाशिव म्हणतो, 'बरीच रात्र केली. तुमचे मित्र येऊन संध्याकाळपासून वाट बघताहेत.'' निवेदक बघतो तर समोर विनय बसलेला. ''अरे गृहस्था, इतका वेळ कुठं होतास?'' निवेदक बाहेर दाराकडे बघतो. मिट्ट काळोख... निवेदक खाली कोसळतो... (वेताळाचा पूल)

गावाबाहेरच्या रिकाम्या वाड्यात एक डॉक्टर दवाखाना उघडण्याचे ठरवतात. निनाद त्या वाड्यात राहण्याचे ठरवतो... वाड्याच्या मागे दाट जंगल असते... तो त्या जंगलात जाऊ पाहतो तर तेथील झाडे त्याच्या शरीराला भिडतात. त्याला आवळू पाहतात... तो सूर्यबिंबाकडे लक्ष देतो... आणि भानावर येतो... वाड्यात येतो. नोकर हंबीर त्याला विचारतो, ''धाकले मालक, बखळीकडे पुन्हा जाऊ नका... ती जागा वंगाळ आहे.'' हंबीर मात्र त्या बखळीकडे रोज नैवेद्य घेऊन जात असतो. त्यामुळे निनाद त्याला छेडतो... ''मालक तिथल्या वातावरणात एका चेटक्याची हत्या झालेली आहे. गावकऱ्यांनी त्याला ठेचून दगडांनी, काठ्यांनी मारले. त्याची जिवंतपणीच होळी पेटवली. तो चेटक्या मेला. आता त्याला दररोज नैवेद्य ठेवतो... वाडा व बखळ यांच्यात भिंत बांधलेली आहे... पूजा, मंत्रतंत्र याद्वारे त्या अस्तित्वाला भिंतीपलीकडे ठेवण्यात येत आहे.'' पुढे निनाद त्याबाबत काम करतो हे विषवल्ली या कथेत सांगितले आहे.

अशा वेगवेगळ्या कल्पनांभोवती जयश्री कुलकर्णी यांनी या गूढकथांची निर्मिती केलेली आहे. त्यांनी वापरलेल्या कल्पना सर्वस्वी नावीन्यपूर्ण नसल्या तरी त्यांनी उभारलेल्या कथावस्तू नावीन्यपूर्ण अनुभवांचे वैचित्र्य प्रकट करतात.

**पृष्ठे :१५२ ● किंमत: १२० रु. ● सभासदांना :८४ रु. ● पोस्टेज :२५रु.**



## एड्स रोगाविषयी सर्वंकष माहिती देणारे मार्गदर्शनपर पुस्तक.

## एड्स

**डॉ. दिलीप बावचकर**




डॉ. दिलीप बावचकर यांचे 'एड्स' हे पुस्तक म्हणजे मराठीत या रोगावरचा एक सर्वांगीण माहितीचा खजिनाच आहे. एड्सशी संबंधित साठावर बळींचा परामर्श या पुस्तकात घेण्यात आला आहे.

जगाला सध्या सर्वांत जास्त भेडसावणारा आणि ज्याच्यावर स्वस्त, सोयीस्कर औषध किंवा लस उपलब्ध नाही असा रोग म्हणजे एड्स. जगात आज पन्नास कोटीवर एड्सचे रुग्ण आहेत. वीस-बावीस कोटी रुग्ण या रोगाला बळी पडलेले आहेत. दररोज २० हजार व्यक्तींना एड्स आपल्या कवेत घेतो आणि त्यात १५ ते २५ या वयोगटातील ७ हजार तरुण असतात. एड्सने अनाथ पोरकी झालेली मुले दीड कोटीपेक्षाही जास्त आहेत. आफ्रिका खंडातील काही देशात १५ ते ३० या वयोगटातील तरुणपिढीच उरलेली नाही. तेथे आढळतात वय वर्षे १५ पेक्षा कमी असणारी अनाथ मुले आणि ३५ वर्षांपुढील वयस्कर व्यक्ती. भारतात दरवर्षी २ कोटी ८० लाख महिला गरोदर राहतात. त्यापैकी एक टक्का म्हणजे २ लाख ८० हजार महिला एचआयव्ही पॉझिटिव्ह असतात. त्यांना होणाऱ्या मुलांपैकी ३० टक्के बालके एचआयव्ही पॉझिटिव्ह असतात. आजपर्यंत सुमारे ४५ लाख मुलांना एचआयव्ही संसर्ग झालेला असून, त्यातील निम्मी अधिक मुले मरण पावली असून उर्वरित मुलांपैकी निम्मी मुले एड्सच्या अंतिम टप्प्यात आहेत.

एड्ससाठी परिणामकारक लस शोधण्याचे प्रयत्न जगभर चालू आहेत. परंतु अजून सुरक्षित व वापरण्यास सोयीस्कर अशी लस सापडलेली नाही. एचआयव्ही हा मानवी शरीरातच जिवंत राहू शकणारा विषाणू आहे. त्यामुळे ह्या संशोधन करणे अवघड असते. इतर व्याधींच्या विषाणूंचे संशोधन प्राण्यांवर प्रयोग करून

**हे विषाणू प्रामुख्याने व्यक्तीच्या रक्तामध्ये, वीर्यामध्ये, योनिस्रावामध्ये असतात. लाळ, घाम, अश्रू, मूत्र यातही असू शकतात. पुढे ते लिव्हर, मेंदू इत्यादी अवयवांतही शिरकवा करून देतात.**

करण्यात येते. एचआयव्हीचे विषाणू हे मानवी शरीरातच जिवंत राहू शकतात; मनुष्यदेह सोडून इतर सजीव प्राण्यांमध्ये (उंदीर, कुत्रा, म्हैस, घोडा, डास-ढेकूण इ.) ते जिवंत राहू शकत नाहीत. मानवी देहाकडून मानवी देहाकडेच त्याचे संक्रमण होते व मानवी देहातच त्याचे जीवनचक्र पूर्ण होते. त्यामुळेच त्याला 'ह्युमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस' असे नाव मिळालेले आहे. इम्युनिटी म्हणजे रोगप्रतिकारक शक्ती. ही आपल्या पांढऱ्या पेशींच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. एचआयव्ही मानवी शरीराबाहेर जगूच शकत नाही. हा विषाणू मानवी शरीरात प्रवेश केल्यावर विशिष्ट पांढऱ्या पेशींवर हल्ला चढवतो आणि त्या शीतयुद्धात आपल्या शरीरातील पांढऱ्या पेशींची संख्या कमीकमी होत जाते आणि शरीरातील अंतर्गत सुरक्षाचक्र (इम्युनिटी) कोलमडून पडते. ही अवस्था येण्यास अनेक वर्षे लागू शकतात. प्रत्येक माणसाबाबत एचआयव्हीच्या शरीरात प्रवेश आणि पांढऱ्या पेशींचे सुरक्षाचक्र कोलमडून पडण्याची स्थिती या दरम्यान जाणारा कालावधी वेगवेगळा असतो. म्हणून हा विषाणू शरीराच्या दृष्टीने यमदूतच होय.

हा विषाणू शरीरात शिरण्यासाठी ती व्यक्ती स्वत:च जबाबदार असते. हा रोग आपण स्वत: मिळवलेला असतो. (लैंगिक संबंध, रक्त व रक्तघटक, दूषित सीरिंज व सुया, मादक द्रव्य सेवन, गर्भवती स्त्रीकडून होणाऱ्या संततीला)... हे विषाणू प्रामुख्याने व्यक्तीच्या रक्तामध्ये, वीर्यामध्ये, योनिस्रावामध्ये असतात. लाळ, घाम, अश्रू, मूत्र यातही असू शकतात. पुढे ते लिव्हर, मेंदू इत्यादी अवयवांतही शिरकवा करून देतात. खोकला, शिंक, एड्सबाधित व्यक्तीबरोबरचे वास्तव्य, हस्तांदोलन, चुंबन, एकमेकांचे कपडे वापरणे यातून हा विषाणू शरीरात संक्रमित होत नाही.

'एड्स' हा केवळ वैद्यकीय प्रश्न नाही. अनेक सामाजिक आणि आर्थिक समस्या, त्यामुळे निर्माण झालेल्या आहेत. आपले कौटुंबिक जीवनच त्यामुळे ढवळून निघाले आहेत. एकदा एड्सचे विषाणू एखाद्या व्यक्तीच्या शरीरात शिरले म्हणजे ते लगेच त्याचा मृत्यू घडवून आणतात असे नाही. पण त्याच्या रोगप्रतिकारक शक्तीनुसार काही काळानंतर तरी ते त्याचा बळी घेणारच हे



**१८८१ मध्ये न्यूयॉर्क शहरात रुग्णालयात दाखल झालेल्या तरुणांमध्ये 'कॅपोसीस सार्कोमा' (कातडीचा विशिष्ट कर्करोग) आणि विशिष्ट प्रकारचा न्यूमोनिया या दोन रोगांची लक्षणे आढळून आली.**

वास्तव नजरेआड करता येत नाही. एड्सला वय, शिक्षण, जातपात, गरीब, श्रीमंत हे भेद ठाऊक नाहीत. १८८१ मध्ये न्यूयॉर्क शहरात रुग्णालयात दाखल झालेल्या तरुणांमध्ये 'कॅपोसीस सार्कोमा' (कातडीचा विशिष्ट कर्करोग) आणि विशिष्ट प्रकारचा न्यूमोनिया या दोन रोगांची लक्षणे आढळून आली. हे दोन्ही रोग सामान्यत: ६०-७० वर्षे वयाच्या वृद्ध रुग्णांमध्ये आढळतात; परंतु यावेळी ते तरुण रुग्णांमध्ये आढळले. त्यामुळे वैद्यकीय जगात खळबळ माजली. १९८३ मध्ये पॅरिस येथील लुई पाश्चर इन्स्टिट्यूटमध्ये ल्यूक माँटेग्निअर या शास्त्रज्ञाने या रोगाशी संबंधित विषाणूचा शोध लावला. या विषाणूला एचआयव्ही असे नाव देण्यात आले; आणि विषाणूमुळे होणाऱ्या रोगाला एड्स असे नाव मिळाले. १९८४ पासून याबाबतची माहिती जगभर जनजागृतीसाठी देण्यास आरंभ झाला. १९८६ मध्ये चेन्नईमधील काही वेश्यांमध्ये या रोगाची लागण झाल्याचे निदर्शनास आले. मुंबई आणि मणिपूर -मिझोराम मध्येही बरेच रुग्ण आढळले.

एचआयव्हीचा मानवी शरीरात प्रवेश झाल्यावर तो आपल्या रोगप्रतिकार यंत्रणेतील सीडी-४ या पेशींकडे आकृष्ट होतो. या पेशींमधील खोबणीसारख्या रचनेत तो शिरकाव करून बसतो आणि एचआयव्हीच्या गाभ्यात अंतर्भूत असलेले आरएनए (रेट्रोव्हायरस) आणि रिव्हर्स ट्रॅन्सक्रिप्टेज एन्झाइम मानवी पेशीमध्ये फेकले जातात; ते मानवी केंद्रकाम्लामध्ये पोहत राहतात. एचआयव्ही आरएनएचे रूपांतर डीएनए मध्ये होऊ लागले. मानवी डीएनएमध्ये शिरलेले हे पूर्व-विषाणू स्वत:च्या पुनरावृत्तीची संधी साधून, आपली आवृत्ती काढत राहतात. (याला प्रजनन म्हणत नाहीत. एचआयव्ही विषाणूची पुनरावृत्ती फक्त जिवंत मानवी पेशीतच निघू शकते.) या आवृत्तींना व्हिरिऑन्स – विषाणूंची पिलावळ असे म्हणतात. हे विषाणू हळूहळू मानवी पेशीच्या बाह्य आवरणातून पेशीबाहेर फेकले जातात आणि रक्तप्रवाहात मिसळतात. ही व्हिरिऑन्स हळूहळू एचआयव्हीच्या पूर्णरूपात विकसित होतात आणि पुन्हा नवीन सीडी-४ पेशीवर हल्ला करायला सज्ज होतात. हा क्रम चालूच राहतो. रुग्णाची प्रतिकारक्षमता कमी कमी होत

**एड्सचा प्रसार कसा होतो याबद्दल गैरसमज असल्याने माणसे एड्सग्रस्त व्यक्तीला महारोग्याप्रमाणे दूर ठेवतात. पण तसे करणे चूक आहे. एड्सचा प्रसार पुढील गोष्टींद्वारे होत नाही, हे लक्षात ठेवून अकारण भय टाळावे.**

जाते व अखेर रुग्ण एड्सचा बळी ठरतो. एकदा एचआयव्ही संसर्ग झाला की तो आयुष्यभर टिकून राहतो. एचआयव्ही त्वचेमधून आरपार जाऊ शकत नाही, परंतु अंत:त्वचेमधून शरीरात शिरू शकतो. एचआयव्हीवर कोणतीही प्रतिबंधक लस अजून उपलब्ध नाही. पाश्चात्त्य देशात समजा अशी लस सापडली तरी ती भारतातील रुग्णांना उपयुक्त ठरेलच असे नाही. कारण आपल्याकडे आढळणारा एचआयव्ही १ मधील सी हा उपप्रकार पाश्चात्य देशात आढळत नाही.

एचआयव्ही हा भयानक विषाणू असला तरी थोड्या उष्णतेनेही तो मारला जातो.

एचआयव्ही शरीरात शिरला तरी कधी कधी त्या व्यक्तीच्या शरीरात एड्सच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे ती व्यक्ती या रोगाला बळी पडत नाही. मात्र अशा केसेस क्वचितच सापडतात.

एड्सचा प्रसार कसा होतो याबद्दल गैरसमज असल्याने माणसे एड्सग्रस्त व्यक्तीला महारोग्याप्रमाणे दूर ठेवतात. पण तसे करणे चूक आहे. एड्सचा प्रसार पुढील गोष्टींद्वारे होत नाही, हे लक्षात ठेवून अकारण भय टाळावे.

* एड्सग्रस्त व्यक्तीशी हस्तांदोलन, आलिंगन, चुंबन यातून एड्सची लागण होती नाही.

* कपडे, टॉवेल, नॅपकीन, अंथरुण, किल्ली, दागिने, पेन, फोन यांच्या वापरातून एड्स होत नाही.

* एकत्र राहाणे, प्रवास करणे (बस/रेल्वे/विमाने) यामुळे एड्स होत नाही)
* एकाच विहिरीत, तलावात पोहल्याने एड्स होत नाही.
* एकाच स्वच्छतागृहाचा वापर केल्याने एड्स होत नाही.
* हवा, पाणी, अन्न यातून एड्सचे विषाणू शरीरात प्रवेश करीत नाहीत.
* एकच बादली, साबण वापरल्याने एड्स होत नाही.
* सलूनमधील वस्तरा, ब्लेड यामुळे एड्स होत नाही.
* कुत्रा, मांजर अशा पाळीव प्राण्यांद्वारे एड्सचा प्रसार होत नाही.
* एड्स रुग्णाची सेवा केल्याने एड्स होत नाही.



**सिॲटलमध्ये तयार झालेली ॲडिनो असोसिएटेड व्हायरस लस इ.स. २००५ पासून प्रयोगासाठी भारतात उपलब्ध झाली आहे. ती एचआयव्ही-१ रुग्णांसाठी उपयुक्त आहे. पुणे येथे ३० स्वयंसेवकांच्या गटावर या लसीचे प्रयोग चालू आहेत.**

* खोकला, शिंक, रक्तदान, यातून एड्स होत नाही.

* एचआयव्ही संसर्गित व्यक्तीबरोबर एक राहण्याने, काम केल्याने एड्स होत नाही.

* लाळ, अश्रू, घाम यातून एड्स होत नाही.

एचआयव्ही शरीरात शिरल्यानंतर तीव्र जंतू संसर्ग, लक्षणविरहित अवस्था आणि रोगप्रतिकारक शक्तीचा ऱ्हास व इतर रोग्यांच्या लक्षणांा प्रादुर्भाव असे तीन टप्पे आढळतात.

शेवटच्या टप्प्यात क्षयरोग, लसिका ग्रंथीची वाढ, नागिण, न्यूमोनिया, मेंदूविकार, कर्करोग, लिम्फोमा वगैरे आजारांची लक्षणे जाणवू शकतात. पहिला ते शेवटचा टप्पा यामध्ये एक ते दहा वर्षांचा अवधी जाऊ शकतो. रुग्णाचे वय, आहार, व्यसने यावर ते अवलंबून असते.

एचआयव्हीचे निदान करण्यासाठी इलायझा आणि वेस्टर्न ब्लॉट या दोन चाचण्या घेतल्या जातात या चाचण्यांसाठी चार-पाच हजार रुपये खर्च येतो.

औषधांचा खर्च महिना १५०० ते १० हजार येतो.

सिॲटलमध्ये तयार झालेली ॲडिनो असोसिएटेड व्हायरस लस इ.स. २००५ पासून प्रयोगासाठी भारतात उपलब्ध झाली आहे. ती एचआयव्ही-१ रुग्णांसाठी उपयुक्त आहे. पुणे येथे ३० स्वयंसेवकांच्या गटावर या लसीचे प्रयोग चालू आहेत.

ही लस उपलब्ध झाली तरी ती भावी रुग्णांना एड्सपासून दूर ठेवील. सध्या जे एड्सग्रस्त आहेत, त्यांना तिचा उपयोग होणार नाही.

या लसीच्या चाचण्या बेल्जियम, जर्मनी व चीन या देशातही चालू आहेत.

एड्स झाल्यावर व्यक्तीच्या ज्या प्रतिक्रिया दिसतात त्यात नकार, दैवी शाप, देवाला नवस, पश्चाताप, सतत भय, सूड आणि स्वीकार अशा वेगवेगळ्या नमुन्याच्या आढळतात.

एड्सच्या प्रतिबंधासाठी शासनातर्फे विविध कार्यक्रम आणि उपक्रम राबवले जात आहेत. शाळांमध्ये विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी प्रशिक्षण, वैद्यकीय स्टाफचे प्रशिक्षण, गुप्तरोग नियंत्रण कार्यक्रम, कंडोम वापराबाबत कार्यक्रम, स्वैच्छिक समुपदेशन, जनजागृती कार्यक्रम, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग (ट्रक

**ज्या माता गरोदरपणी एचआयव्ही संसर्गित असणाऱ्या मातांच्याद्वारेच प्राप्त होतो. त्या मातांची बाळंतपणाच्या पहिल्या अवस्थेत नेव्हिरॅपनची २०० मि.ग्रॅ.ची एकच मात्रा घेतली तर व्हर्टिकल ट्रान्समिशनचे प्रमाण बरेच कमी होऊ शकते.**

ड्रायव्हर, झोपडपट्टी, वेश्याव्यवसाय इ. क्षेत्रामध्ये जागृती) कौटुंबिक आरोग्य मोहीम, सामाजिक स्वास्थ केंद्रे, पथनाट्ये, महिला मेळावे इ.इ. १ ते ७ डिसेंबर हा जागतिक एड्स सप्ताह पाळणे.

९० टक्के बालकांना एचआयव्ही संसर्ग हा ज्या माता गरोदरपणी एचआयव्ही संसर्गित असणाऱ्या मातांच्याद्वारेच प्राप्त होतो. त्या मातांची बाळंतपणाच्या पहिल्या अवस्थेत नेव्हिरॅपनची २०० मि.ग्रॅ.ची एकच मात्रा घेतली तर व्हर्टिकल ट्रान्समिशनचे प्रमाण बरेच कमी होऊ शकते. या गोळीची किंमत १४ ते १६ रुपये एवढी अल्प आहे. जन्मलेल्या बालकालाही हे औषध देता येते. बाळाच्या जन्मानंतर दीड वर्षांपर्यंत त्याला एचआयव्ही संसर्ग आहे की नाही हे समजणे अवघड असते. जन्मानंतर दीड वर्षाने एलायझा किंवा पी २४ अँटिजेन तपासणी करता येते. ही औषधे काही मुलांना सहन होत नाहीत. जन्मानंतर काही काळाने एचआयव्ही संसर्ग होणाऱ्या बालकांवर उपचार करणे हे अवघड जाते. त्यासाठी सोयीस्कर औषधे उपलब्ध कमी आहेत.

एड्सबाबत अनेक प्रश्न वाचकांच्या मनात असतात. त्यांचीही उत्तरे डॉ. बावचकर यांनी या पुस्तकात दिली आहेत.

* एड्स झालेली व्यक्ती निरोगी व्यक्तीला चावली तर एड्स होतो का?

* गोंदणे, नाक-कान टोचणे यातून एचआयव्हीचा प्रसार होतो का?

* डास चावल्याने एचआयव्ही संसर्ग होतो का?

* एड्स झाल्यापासून किती दिवसांनी मृत्यू येतो?

* एड्सबाधित पुरुष लवकर मरण पावतात पण एड्सबाधित स्त्री अनेक दिवस जगू शकते हे खरे का?

* नियोजित वधू-वरांची लग्नाअगोदर एचआयव्ही चाचणी सक्तीची करावी का?

* एचआयव्ही मातेने गर्भपात करून घेणे गरजेचे आहे का?

* एड्स झालेल्या व्यक्तीचे संपूर्ण रक्त बदलले तर रुग्ण बरा होतो का?

* एचआयव्ही पॉझिटिव्ह व्यक्तींना वेगळे ठेवावे का?



* एचआयव्ही संसर्ग/एड्स झालेल्या व्यक्तींना शिक्षा करावी का?

* एचआयव्ही पॉझिटिव्ह व्यक्तींनी मुले होऊ द्यावी का?

* एचआयव्ही पॉझिटिव्ह व्यक्तींनी विवाह करावा की करू नये?

* एड्सग्रस्तांचे पुनर्वसन, बचावगट कसे करावे?

* एड्सग्रस्तांना समुपदेशन कसे करावे?

याशिवाय एड्स अंतिम अवस्थेत असणाऱ्या व्यक्तींचे शेवटचे दिवस सुसह्य करणे. स्वेच्छा समुपदेशन, एड्स रुग्णांची सर्वंकष देखभाल, एड्स आणि मानवी हक्क वगैरे विषयांचाही ऊहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे.

**एड्सबद्दल अशी सर्वंकष माहिती देणारे दुसरे पुस्तक मराठीत नाही. त्यामुळे डॉ. दिलीप बावचकर (सोलापूर) यांनी तळागाळातील लोकांनाही एड्सची व्यवस्थित माहिती व्हावी, त्याबद्दलची भीती कमी व्हावी, गैरसमजांचे निराकरण व्हावे म्हणून केलेला हा प्रयत्न महत्त्वपूर्ण आहे.**

एड्सबाबत जनजागृती शिबीरातील उपस्थितांनी पुढील शपथ घ्यावी अशी अपेक्षा असते.

'आम्ही आरोग्यपूर्ण जीवन जगू आणि निकटवर्तीयांचे एचआयव्ही एड्सपासून संरक्षण करू.

आम्ही एचआयव्ही/एड्सबाधित व्यक्तींची काळजी घेऊ, त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना सर्वतोपरी मदत करू.

एचआयव्ही/एड्सबाधित व्यक्ती कामाच्या ठिकाणी, शाळा-महाविद्यालय-रुग्णालयात आढळल्यास कलंकित समजून भेदभावाने वागणार नाही.

आम्ही आपल्या परिचितांना एचआयव्ही/एड्ससंबंधित माहिती देण्यास मदत करू.

कोणाही बाधित व्यक्तीला मानव अधिकारापासून वंचित राहू देणार नाही.

अशा व्यक्तींबाबत योग्य ती गुप्तता राखू.'

एड्सबद्दल अशी सर्वंकष माहिती देणारे दुसरे पुस्तक मराठीत नाही. त्यामुळे डॉ. दिलीप बावचकर (सोलापूर) यांनी तळागाळातील लोकांनाही एड्सची व्यवस्थित माहिती व्हावी, त्याबद्दलची भीती कमी व्हावी, गैरसमजांचे निराकरण व्हावे म्हणून केलेला हा प्रयत्न महत्त्वपूर्ण आहे.

**पृष्ठे : २१६ ● किंमत: १५० रु. ● सभासदांना : १०५ रु. ● पोस्टेज : २५रु.**




*** पद्मश्री विखे पाटील साहित्य पुरस्कार**

परभणीचे पत्रकार आसाराम लोमटे यांच्या 'इडा पिडा टळो' या कथासंग्रहास या वर्षीचा पद्मश्री विखे पाटील साहित्य पुरस्कार २८ ऑगस्ट रोजी प्रवरानगर येथे ज्येष्ठ साहित्यिक अरुण साधू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची समिती उत्कृष्ट साहित्य निर्मिती असलेल्या ग्रंथांची निवड करते. पुरस्काराचे हे १६ वे वर्ष आहे. २५ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

राज्यस्तरीय पुरस्काराप्रमाणे नगर जिल्ह्यातील लेखक, कवी यांच्या नवनिर्मित साहित्यकृतीसही उत्कृष्ट जिल्हा पुरस्काराने गौरविण्यात येते. १० हजार रुपये रोख व स्मृतीचिन्ह असे स्वरूप असलेला जिल्हा पुरस्कार यावेळी नगरचे भालचंद्र बालटे यांच्या 'साक्षी' या कथासंग्रहाला देण्यात आला. साहित्याप्रमाणेच कलाक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या या कलावंतांना याच समारंभात विखे पाटील कलागौरव पुरस्कार देऊन गौरविले जाते. यावेळी श्रीरामपूरचे जुन्या पिढीतील प्रसिद्ध फोटोग्राफर बजरंग गुळस्कर हे जिल्ह्यातील नवे नेतृत्व, नव्या चळवळीचे साक्षीदार असून त्याचे अनेक कंगोरे त्यांनी आपल्या कॅमेऱ्यातून टिपले आहेत. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्कारही त्यांच्या नावावर आहेत.

*** 'बाळशास्त्री जांभेकर' अनुवाद पुरस्कार**

आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्रातर्फे मराठीतील उत्कृष्ट अनुवादित पुस्तकाचा 'दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार' निर्मला स्वामी गावणेकर यांनी अनुवादित केलेल्या 'द लाइफ ॲण्ड डेथ इन शांघाय'ला, तर ललितेतर पुस्तकांसाठी ज्येष्ठ पत्रकार अशोक जैन यांनी अनुवादित केलेल्या 'कस्तुरबा'ला जाहीर झाला.

मानचिन्ह व १२ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप असते. कविवर्य विंदा करंदीकर यांनी ज्ञानपीठ पुरस्काराच्या रकमेतून केंद्राला दिलेल्या देणगीतून जाहीर झालेले हे पहिलेच पुरस्कार आहेत.

*** 'प्रभाकर पणशीकर' जीवनगौरव पुरस्कार**

नाट्य-सिने दिग्दर्शिका आणि निर्मात्या विजया मेहता यांची 'नटवर्य प्रभाकर



पणशीकर रंगभूमी जीवनगौरव' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. मराठी रंगभूमी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या रंगकर्मीला दरवर्षी राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे हा पुरस्कार दिला जातो.

सांस्कृतिक कार्यमंत्री अशोक चव्हाण यांनी या पुरस्काराची घोषणा केली. एक लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे हे दुसरे वर्ष आहे.

तीसहून अधिक नाटकांचे दिग्दर्शन आणि जवळपास नाटकांतून भूमिका करणाऱ्या विजयाबाईंची 'हमीदाबाईची कोठी', 'बॅरिस्टर', 'नागमंडळ', 'वाडा चिरेबंदी', 'संध्याछाया' आदी नाटके चांगलीच गाजली. 'रावसाहेब', 'पेस्तनजी', 'हवेली बुलंद थी', 'हमीदाबाई की कोठी' हे त्यांचे गाजलेले चित्रपट.

'खरे तर पुरस्कार ही एक प्रकारे शाबासकी असते. सरकारने माझ्या पाठीवर मारलेली शाबासकीची थाप खूप मोलाची वाटते,' अशा शब्दांत विजया मेहता यांनी आपला आनंद व्यक्त केला.

*** गाडगीळ भगिनी पुरस्कार**

'कुटुंबातील सदस्यांना परस्परांशी बांधून ठेवणारी एकत्र कुटुंबपद्धती हेच आपल्या संस्कृतीचे बलस्थान आहे,' असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले. गाडगीळ भगिनींच्या वतीने दिला जाणारा मातृपितृ स्मृती पुरस्कार बालसाहित्य लेखिका माधुरी पुरंदरे आणि नाशिक येथील समाजसेविका मुन्वर सुलतान यांना डॉ. जाधव यांच्या हस्ते देण्यात आला, यावेळी ते बोलत होते. क्रांती नातू, तिलोत्तमा भालेराव, सुरेखा पाणंदीकर, शारदा विंचूरकर, उषा आहेकर या गाडगीळ भगिनी या प्रसंगी उपस्थित होत्या.

डॉ. जाधव म्हणाले, 'जेव्हा आपण जगाच्या पाठीवर कुठेही जातो, तेव्हाच एकत्र कुटुंबपद्धती हे आपल्या संस्कृतीचे बलस्थान असल्याचे लक्षात येते. कुटुंबव्यवस्थेत सध्या बदल होत असले तरी त्यामागे असणाऱ्या संस्कारांचा मूळ कणा टिकून आहे. मात्यापित्यांच्या स्मृती जागृत ठेवण्याचे गाडगीळ भगिनींचे कार्य हे त्याचेच प्रतीक आहे.'

'मातृपितृ स्मृती पुरस्कार' बालसाहित्य क्षेत्रात अधिकाधिक चांगले काम करण्यासाठी मिळालेले प्रोत्साहन आहे,' अशी प्रतिक्रिया लेखिका पुरंदरे यांनी व्यक्त केली. मुन्वर सुलतान यांनीही मनोगत व्यक्त केले. उषा आळेकर यांनी आपले मातापिता कै. काकासाहेब गाडगीळ आणि आनंदीबाई गाडगीळ यांच्या आठवणींना उजाळा दिला. सूत्रसंचालन क्रांती नातू यांनी केले.

*** चतुरंगचा 'जीवन गौरव पुरस्कार'**

'चतुरंग प्रतिष्ठान'च्या वतीने दिल्या जाणाऱ्या यंदाच्या 'जीवन गौरव पुरस्कारा'साठी

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या साधनाताई आमटे यांची निवड करण्यात आली आहे. येत्या डिसेंबरअखेरीस माटुंग्यातील रुपारेल महाविद्यालयाच्या पटांगणावर होणाऱ्या दोनदिवसीय रंगसंमेलनामध्ये हा पुरस्कार साधनाताईंना प्रदान करण्यात येणार आहे. समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना चतुरंग प्रतिष्ठानच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार दिला जातो. यंदाच्या या १७ व्या पुरस्कारासाठी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल साधनाताई आमटे यांची निवड करण्यात आली. एक लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सामाजिक क्षेत्रातील साधनाताईंच्या प्रेरक कामगिरीविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे, असे नमूद करताना 'लोकसत्ता'चे माजी संपादक डॉ. अरुण टिकेकर यांच्या अध्यक्षतेखालील आणि डॉ. नरेंद्र जाधव, विजय कुवळेकर, विनय सहस्रबुद्धे, अविनाश धर्माधिकारी, रवींद्र पिंगे व प्रफुल्ला डहाणूकर आदीजण सदस्य असलेल्या निवड समितीने एकमताने साधनाताईंची निवड केली.

### * विष्णुदास भावे पुरस्कार

मराठी रंगभूमीबरोबर चित्रपट व दूरदर्शन मालिकेतून प्रभावी भूमिका साकार करून 'चिमणराव'ची भूमिका अजरामर करणाऱ्या दिलीप प्रभावळकर यांना यंदाचा कै. विष्णुदास भावे गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीचे अध्यक्ष डॉ. शरद कराळे यांनी दिली. प्रतिष्ठेचे कै. विष्णुदास भावे गौरवपदक रंगभूमिदिनी म्हणजे ५ नोव्हेंबर रोजी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षा श्रीमती लालन सारंग यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. रोख पाच हजार, शाल, स्मृतिचिन्ह व गौरवपदक असे पुरस्काराचे स्वरूप आहे. आतापर्यंत बालगंधर्व, केशवराव दाते, आचार्य अत्रे, भालचंद्र पेंढारकर, मास्टर कृष्णकराव, मामा पेंडसे, दुर्गा खोटे, पु. ल., ग. दि. मा., विठाबाई नारायणगावकर, प्रभाकर पणशीकर, हिराबाई बडोदेकर, डॉ. श्रीराम लागू, चंद्रकांत गोखले, निळू फुले, चित्तरंजन कोल्हटकर आदींना गौरवपदकाने सन्मानित करण्यात आले आहे.

### * राज्य सांस्कृतिक पुरस्कारांचे वितरण

'मला प्रत्यक्षात कोणतेही व्यसन नाही; मात्र मिळालेल्या पुरस्कारामुळे खरंच नशा चढली. ती तशीच कायम राहील. राज्य शासनाचा पुरस्कार स्वीकारण्यासाठी मी येथे आले, सजले, भारावले अन् धन्य झाले,' अशी भावना ज्येष्ठ अभिनेत्री आणि नृत्यांगना जयश्री टी यांनी राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्रदान सोहळ्यात व्यक्त केली. राज्य शासनाचा नृत्यासाठीचा सांस्कृतिक पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.



खासदार विजय दर्डा, बसोलीचे संस्थापक चंद्रकांत चन्ने यांच्या हस्ते 'तमाशा'साठी हरिभाऊ शंकर कुदळे यांना सन्मानित करण्यात आले. पं. श्रीकृष्ण उर्फ बबनराव हळदणकर (कंठसंगीत), आशा खाडिलकर (उपशास्त्रीय संगीत), आदिवासी गिरिजनसाठी मोलाचे कार्य करणारे बस्तीराम बाबूराव नाईक, दत्तदासबुवा घाग (कीर्तन), व्हायोलिनवादक फय्याज हुसेन (वाद्यसंगीत), निरंजन भाकरे (लोककला), शाहीर यशवंत ज्ञानू पवार यांनाही या वेळी सन्मानित करण्यात आले. प्रख्यात दिग्दर्शक संजय सूरकर यांच्या हस्ते आत्माराम भेंडे यांच्या वतीने त्यांचे बंधू वसंत कुलकर्णी यांनी पुरस्कार स्वीकारला.

### * 'स्नेहांजली पुरस्कार'


स्नेहल प्रकाशनच्या वतीने दिला जाणारा 'स्नेहांजली पुरस्कार' या वर्षी लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. भीमराव गस्ती यांनी जाहीर झाला आहे. डॉ. गस्ती हे बेळगावमध्ये राहणारे असून, अखिल भारतीय बेरड रामोशी सेवा समितीचे अध्यक्ष आहेत.

बेळगाव, धारवाड, विजापूर या जिल्ह्यांतील देवदासी ही कुप्रथा संपविण्यासाठी त्यांनी 'उत्थान' या संस्थेची स्थापना केली आहे. या संस्थेच्या माध्यमातून तू समाजासाठी विविध उपक्रम राबवित असतात.

पाच हजार रुपये, स्मृतिचिन्ह, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

❐

आगामी




डॉ. किरण बेदी प्रस्तुत

**तुरुंगातील सावल्या**

भारतीय कारागृहातील माता व मुले

मूळ इंग्रजी लेखक
**रुझबेह भरुचा**
अनुवाद
**लीना सोहोनी**

**किंमत १८०रु. पोस्टेज ३० रु.**

## सार्धसुधं...

# मूठभर पोह्यासाठी

**प्रमोदिनी वडके-कवळे**

"छत्रपति टर्मिनससे आनेवाली तेज लोकल सात बजकर बारह मिनट"

"पाऽआलिसऽ पाऽआलिसऽ बूऽट पालिस"

"चर्चगेट जानेवाली धीमी लोकल प्लॅटफॉर्म नंबर दो पर आ रही है ये लोकल□"

"चाऽय गर्रऽम"

"सात बजे छुटनेवाली अंधेरी लोकल आज दस मिनट देरीसे□"

"मोगरा..चमेली...बाई गजरा देऊ का? पाचला दोन"

आवाजांचे वेगवेगळे तुकडे झेलत मी प्लॅटफॉर्मवरच्या एका मोडक्या बाकावर शांतपणे बसले होते. "शांतपणे" असं नुसतं म्हणायचं. कारण मनातल्या मनात माझी चुळबुळ चालूच होती. एकीकडे मुंबईकरांच्या चपळ हालचालींचं कौतुक वाटत होतं आणि दुसरीकडे पुणेकरांच्या पेशवाई निवांतपणावर चिंतन करावसं वाटत होतं. मधेच देवाजवळ मला निदान यापुढची तरी अंधेरी जानेवाली लोकल पकडता यावी अशी प्रार्थनाही ह्या बाकावर बसूनच चालली होती. संध्याकाळच्या गडबडीच्या वेळी हर हर महादेव म्हणून लोकलच्या भर गर्दीत घुसण्याचा निधडेपणा आणि बळ एकवटण्याचा मन:पूर्वक प्रयत्न करत असल्यामुळे नकळतच आजूबाजूच्या कोलाहलापासून मी पार आलिप्त झाले होते. एखादी फास्ट लोकल प्लॅटफॉर्मवरून धडधडत पुढे सरकावी तसे नुसते आवाज कानावरून पुढे जात होते.

अचानक माझ्या श्रवणस्टेशनात एका आवाजाची गाडी धडधडत आली... आली आणि थांबूनच राहिली. लोकल पकडण्याचे सर्व उपाय आणि चिंता विसरून नकळत माझी मान आणि डोळे त्या आवाजाचा वेध घेत एकशे ऐंशी अंशात फिरले.

जगाऽवेऽहेगळा याचक आनिऽ जगाऽहाऽवेहेगळा धनीऽहीऽ
जगाऽवेऽहेगळा याचक आनिऽ जगाऽहाऽवेहेगळा धनीऽहीऽ
मूठभर पैशाऽसाहाटी दिल्ही काऽ सुवर्ननग्री कुनीऽहीऽ

एक आंधळं जोडपं एकमेकांच्या आधाराने गात गात त्या गर्दीतून वाट काढत पुढे सरकत होतं. ती दोघं इतकी मन लावून गाणं म्हणत होती की जणू काही



गाण्याचे ते सूर हीच त्यांची काठी होती. आणि त्याला धरून चालताना त्यांना पुढचा रस्ता सापडत होता. त्यांच्या मागोमाग आठदहा वर्षांचं एक झिपरं कळकट पोरगं चालत होतं. त्याच्या हातात दीडदोन इंचाचे शहाबादी फरशीचे दोन तुकडे होते. त्यांचा चिपळ्यांसारखा उपयोग करून तो त्या दोघांच्या गाण्याला ताल देत होता. मात्र त्याचं ताल देणं जीव ओतून नव्हतं. तो डोळस असल्यामुळे आजूबाजूच्या गर्दीवर त्याची नजर भिरभिरत होती आणि हातातल्या फरशांची हालचाल अगदी यांत्रिकपणे होत होती.

स्टेशनवरचं किंवा लोकलमधलं नेहमीचं दृश्य असल्याने कुणाला त्यातलं वेगळेपण जाणवत नव्हतं. आणि गाडी पकडायच्या धावपळीत कुणी थांबून किंवा धावताधावता साधं वळूनही त्या कुटुंबाकडे पहात नव्हतं.

..पण मला मात्र त्यांच्याकडे, विशेषत: त्यांच्या गाण्याकडे, त्या गाण्यातल्या मैत्रीबद्दलचं निखळ सत्य सांगणाऱ्या डोळस शब्दांकडे, अशी पाठ फिरवणं जमेना. ते दोघं गात गात पार पुढे निघून गेले तरी मी त्यांच्या सुरांच्या काठीला धरून त्यांचा पाठलाग करत राहिले.

डोळे नसल्यासारखी चाचपडत...!

पोहे.. कुठेही कधाही अगदी दुष्काळी प्रदेशातही उपलब्ध असणारं सर्वसामान्य धान्य. सोन्याची द्वारका वसवणाऱ्या कृष्णाला त्याविषयी एवढं अप्रुप वाटावं? तेही केवळ मूठभर पोह्यांसाठी... अशी काय जादू होती त्यांच्या चवीत.. जी द्वारकाधिपतीला आपल्या महालातल्या पंचपक्वान्नातही मिळत नव्हती. ती जादू होती बालमैत्रीतल्या ओढीची! मधली इतकी वर्ष सरून गेली तरी आपला मित्र आपलाच राहिला आहे. आपलं बालपण त्याने आठवणींच्या पुरचुंडीत नीट जपून ठेवलं आहे या मधुर आश्वासनाची!!

नाती जपणं हा फक्त माणूस ह्या सजीवाचा वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म आहे. ही नाती त्यानेच निर्माण केली. त्यानेच त्या नात्यांना वेगवेगळी नावं आणि संदर्भही दिले.

मानसशास्त्रज्ञांचे सिद्धांत काहीही म्हणोत पण माझ्या मते माणसाची मूळ प्रवृत्ती आहे भयाची.. आणि बाकी कोणत्याही संकटापेक्षा त्याला सगळ्यात जास्त भीती वाटत असते ती एकटेपणाची.

अगदी तान्ह्या मुलाचंच उदाहरण घ्या ना. भूक आणि ओल्या वस्त्राची जाणीव यानंतर त्याच्या रडण्याचं तिसरं कारण असतं एकटेपणा. आपल्याला आईने उचलून घेतलंय अशी जाणीव झाली की तिच्या स्पर्शातल्या आश्वासनाने त्या अजाण जिवाचं रडणं लगेच थांबतं.. "तुला एकट्याला बाथरूममधे कोंडून ठेवीन." "तुझ्याशी कुणी बोलणार नाही." असल्या धमक्यांनी खट्याळातली खट्याळ मुलंसुद्धा लगेच शरण येतात.

याच भयगंडातून आणि सतत सोबतीच्या अनिवार ओढीतून मानवाला नात्यांची

कल्पना सुचली असावी. मग कुठे भावनेला आव्हान करून तर कुठे समाजपुरूषाचा धाक दाखवून त्याने वेगवेगळ्या नात्यांची कोष्टक मांडली असतील. अशा हिशोबी कोष्टकातल्या नात्यांची उब दोनपदरी असते. ती बालपण, तारूण्य, वृद्धापकाळ या तिन्ही अवस्थांमधे सोबतही करते. आणि त्या त्या वयाच्या वेगवेगळ्या गरजाही भागवते.

नात्यांची विविधता हा कलाकारांना मोहवणारा एक अनादिअनंत असा विषय! आपापल्या अनुभवानुसार आणि समजुतीनुसार प्रत्येकाला वेगवेगळ्या नात्यांचं कमीजास्त महत्त्व वाटत असलं तरी मैत्रीच्या नात्यातला नितळ निरागसपणा मात्र सर्वांनाच एकमताने मान्य होतो. मैत्री, कृत्रिम बंधनापेक्षा वेगळं आणि बरेचदा रक्ताच्या नात्यालाही मागे टाकणारं एक गहिरं नातं. रक्ताच्या किंवा मानलेल्या नात्यात सोय असते.. सुरक्षितता असते.. स्वार्थही असतो.

पण मैत्रीच्या नात्यात मात्र असते ती फक्त एकमेकांबद्दलची ओढ आणि सोबतीचं निरपेक्ष आश्वासन!

आणि अशा या मैत्रीच्या नात्यावरची दाटमऊ साय म्हणजे बालमैत्री.

आयुष्यभर छोट्यामोठ्या ध्येयांच्या मागे धावताना कित्येकदा एकटेपणाचे वैफल्यदायी अनुभव येतात. माणसांवरचा नात्यांवरचा सगळ्यावरचाचं विश्वास उडू पहातो. अशा वेळी कुणीतरी आपल्या सोबत आहे हे आश्वासन म्हणजे बुडत्याला प्रलयातही पोहत ठेवणारी काडी असते.

जन्माबरोबर आपोआप मिळणाऱ्या नात्यांचं वस्त्र तसं बेभरवंशाचंच! कधी त्याचा रंग फिकुटतो तर कधी वीण उसवते. कधी जरीची चमक काळवंडते तर कधी धागे विरून जातात. मैत्रीचं नातंही याला अपवाद नसतं. पण बालपणातली मैत्री मात्र...

घरातल्या माणसांची सोबत सोडून मूल पहिल्यांदा बाहेर पडतं ते शाळेत किंवा आता पाळणाघरात जायला. आणि तिथे त्याची 'मैत्री' या चिरंतन नात्याशी ओळख होते. चिंचेच्या कोवळ्या पालवीसारखी ही बालमैत्री. आंबटतुरट तरीही हव्याहव्याशा चवीची आणि शब्दात सांगता न यणाऱ्या लालपोपटी रंगाची रेशीमघडी.

कधी ही बालमैत्री कोवळेपणीच संपून जाते. पण तिच्या आठवणी मात्र पुस्तकातल्या मोरपिसासारख्या तलम टवटवीत रहातात. कधीकधी मात्र छोट्यामोठ्या भांडणतंट्याचं, हेव्यादाव्याचं, स्पर्धेचं आणि गैरसमजाचं अशी नाना वादळं झेलून ही बालमैत्री वर्षानुवर्ष टिकते.. अशी टिकली तर ती छानपैकी पिकते आणि त्या मुरलेल्या पक्वपणात दुराव्याचा आंबटपणा विरघळून जातो आणि अशा मैत्रीची गोडी आणखी वाढते.

चौथीपाचवीत एकत्र शिकणारी एका बेंचवर बसून गळ्यात गळे घालणारी दोन मुलं काळाच्या लाटेत दूर फेकली जातात. मधे वर्षामहिन्यांच्या कितीतरी लाटा उसळतात. किनारे बदलतात... आणि खूप वर्षानी आयुष्याचे मार्ग पार बदलून



गेल्यावर अचानक दोघांची भेट होते. त्यावेळी ती हवापाणी, राजकारण, खेळातली आंतरराष्ट्रीय हारजीत, वेगवेगळ्या खात्यांमधले भ्रष्टाचार, असल्या चालू विषयांवर बोलत नाहात तर हळवी होऊन शाळेच्या त्यावेळच्या मित्रांच्या आठवणी काढतात. सरांना आपण कसं त्रास द्यायचो याचं पुन:स्मरण करण्यात रमतात. आता काळाच्या पटलावरून पुसले गेलेले कित्येक वर्षापूर्वीचे संदर्भ निर्हेतूकपणे पुन्हा उगाळून त्यांची गोडी चाखत रहातात.

विवेक मळेकर आणि दिलीप शहा या आमच्या वर्गातल्या दोन मुलांची मैत्री अशीचं. पाचवीपासून दोघं एकमेकांचे घट्ट मित्र. सुदैवाने दोघांनाही पोटासाठी गाव सोडून जाण्याची वेळ आली नाही. त्यामुळे पाचव्या इयत्तेत जमलेली त्यांची मैत्री वयाच्या पन्नाशीतही तशीच टिकून राहिली आहे. त्यांच्या घरच्या माणसांच्याही ती अंगवळणी पडून गेलीय. दिलीपच्या सहवासात राहून विवेक आता अस्खलितपणे गुजराथी बोलतो आणि दिलीपही त्याच्या घरी जाऊन चिंचगुळाची आमटी मन:पूर्वक भुरकतो.

खरं पहाता आमच्या वर्गातली आणखीही काही मुलं मुली अजून गावातच राहात आहेत. पण वर्षानुवर्षे त्यांच्यात साधा संवादही घडत नाही. विवेक आणि दिलीप मात्र नोकरीतल्या अडचणी आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून लहानपणाच्याचं ओढीने एकमेकांना भेटत असतात. त्याच ओढीने एकमेकांशी भांडतात, एकमेकांवर रूसतात, अबोला धरतात आणि मग त्यांच्या अस्वस्थतेचा त्रास झाला की दोघांच्या बायका पुढाकार घेऊन त्यांच्यात समेट घडवून आणतात.

या दोघांचा आणखी एक मित्र सुहास. नोकरी, शिक्षणासाठी त्याला मात्र गाव सोडून जावं लागलं. रोजचा संपर्क उरला नाही. पण अगदी परदेशी गेला तरी त्याच्या मनातल्या मैत्रीच्या रेशीमघडीची इस्त्री जराही विस्कटली नाही.

गेल्या वर्षी विवेक आणि दिलीपने वर्गातल्या सगळ्यांना जमवून एक छोटंसं स्नेहसंमेलन करायचं ठरवलं. सगळ्यांबरोबर सुहासलाही आमंत्रण गेलं. सगळे आले. पण सुहास मात्र आला नाही.

दोन दिवस छान गप्पा खाणंपिणं,आठवणी जागवणं झालं. स्नेहसंमेलन मस्त पार पडलं. दुपारी सगळे निघणार एवढ्यात सुहास उगवला.

"काय रे तुझ्या पत्रावर पुढच्या वर्षीची तारीख पडली होती की काय?" विवेकने थोडं रागाने थोडं चेष्टेने विचारलं.

"नाही रे. काय सांगायचं तुला? गेल्या आठवड्यात एक आंतरराष्ट्रीय परिषद होती. आयोजनाची सगळी जबाबदारी माझ्यावरच होती." त्याच्या प्रश्नातला राग सुहासपर्यंत पोचलाच नाही त्याने आधी दिलीपच्या गळ्यात हात टाकले.

"मग?" दिलीपनेही त्याला गळामिठी घातली.

"मग काय? माझं थोडंच लक्ष लागतंय त्यातनं एवढे वर्षांनी आपण भेटणार

होतो. काल रात्री अकरा वाजता शेवटचा निमंत्रित हलल्याबरोबर मी लगेचची फ्लाईट पकडली आणि डायरेक्ट आलो. आज रात्रीच्या फ्लाईटने परत फिरावं लागणार आहे.''

''अरे पण इतक्या थोड्या वेळासाठी इतकी दगदग आणि खर्च करून...''

''जाऊ दे रे. एवढ्या वर्षांनी तुम्ही भेटणार होतात. त्यापुढे पैशाचं आणि दगदगीचं काय एवढं?''

त्यांचा संवाद ऐकता ऐकता माझ्या मनात प्लॅटफॉर्मवरचं ते गाणं उजळून गेलं.

मूठभर पोह्यांसाठी दिली का सुवर्णनगरी कुणी!


आणि वाटलं. बालपणीच्या मैत्रीचं मोजमाप करायला किती चुकतो आपण! बालमैत्रीच्या पोह्यांचं मोल सुवर्णनगरीशी करता येणारच नाही कधी. त्या मैत्रीच्या झळाळीपुढे सुवर्णनगरी किती फिकी.. केवढी क्षुल्लक..


***प्रमोदिनी वडके-कवळे***

प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८



**आगामी**




# झोपाळा

**वपु काळे**

**किंमत : १००रु.**
**पोस्टेज : २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**







**श्री. अनिल मेहता / सुनील मेहता,**

राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट प्रकाशक म्हणून नवी दिल्ली येथे आपला सन्मान झाल्याचे वृत्त वाचले. मनापासून आनंद झाला. गेल्या तीन दशकापासून आपल्याबरोबर व्यवहार करताना जाणीव होत गेली ती आपल्या सचोटीची.. या सचोटीच्या बळावरच आपल्या प्रकाशनाचे नाव सातासमुद्रापार गेले आहे.

प्रकाशित केलेल्या प्रत्येक पुस्तकाबाबत आपण दक्ष असता. व्यवसायाशी असलेली ही बांधिलकी स्पृहणीय आहे. यशस्वी प्रकाशक वा उद्योजक होण्यासाठी कष्ट आवश्यकच आहेत, मात्र अंगी विशेष गुणही असावे लागतात आणि आपल्या या गुणांची प्रचीती वारंवार आलेली आहे.

प्रकाशन व्यवसायातील आपल्या कर्तृत्वाचा चढता आलेख अनेकांना प्रेरणादायी आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन.

**दिनकर शिलेदार**
**राहुल शिलेदार**
**(मोना ॲडव्हर्टायझिंग)**

मा. संपादक

सस्नेह नमस्कार,

'सप्टेंबर' महिन्याचा अंक खूप आवडला. आपल्या तीन पुस्तकांना एफ. आई. पी. संघटनेची पारितोषिके मिळाली याबद्दल अभिनंदन! सुप्रसिद्ध समीक्षक श्री. शंकर सारडा यांचा ग. ना. जोगळेकरांवरील लेख मर्मग्राही वाटला. आपण मराठी साहित्य संस्थांचा आलोचनात्मक एखादा ग्रंथ जरूर सिद्ध करावा, तो पुढील पिढीला उपयुक्त दस्तऐवज म्हंणून जरुरीचा वाटतो. सुधाकर प्रभूंवरचाही लेख उत्तम. वृंदा लिमये आणि सरोजिनी वैद्य यांच्या निधनाने महाराष्ट्र सारस्वताचे न भरुन येणारे नुकसान झाले आहे. एकूणच मासिक वाचनीय मजकूरांनी भरगच्च वाटले म्हणून हा पत्रप्रपंच.

पुनश्च अभिनंदन!

**बी. एस्. कुलकर्णी, सोलापूर.**

डॉ. सुनीलकुमार लवटे लिखित 'भारतीय साहित्यिक' हे पुस्तक 'मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे' नुकतेच प्रकाशित झाले. त्यासंदर्भात सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. चंद्रकांत बादिवडेकर यांनी डॉ. लवटे यांना लिहीलेले हे पत्र.

**प्रिय डॉ. सुनीलकुमार लवटे,**

सस्नेह नमस्कार,

आत्ताच तुमचं 'भारतीय साहित्यिक' पुस्तक हाती आलं. पुस्तकाची छपाई, मुखपृष्ठ आवडलं. चाळून पाहिलं.

तुम्हाला गंमत वाटेल. मीही सध्या माझ्या १९५९ पासून लिहिलेल्या हिंदी साहित्यिकांसंबंधीच्या लेखांची पांडुलिपी (हस्तलिखित) तयार करीत आहे. जवळजवळ पूर्ण झाली आहे. 'हिंदी साहित्य : अंतरंग' असं शीर्षक आहे. त्यात हिंदीतील शीर्षस्थ लेखकांविषयी जे लेख मागेच प्रकाशित झाले आहेत, त्यातील निवडक लेख पुस्तकात घेतले आहेत.

आता मराठीमध्ये मोठ्या लेखकांची, दर्जेदार पुस्तकांची, साहित्यिक प्रवाहांची दमदार ओळख करून द्यायला हवी त्यादृष्टीने तुमचं 'भारतीय साहित्यिक' पुस्तक पाहिल्यावर आनंद झाला. मराठीमध्ये यातील संदर्भ लोकांपर्यंत जायला हवा– मराठीची ताकद वाढेल, अंतर्मुखता येईल, आत्मपरीक्षण होईल.

तुमचं मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढच्या वाटचालीस वयाच्या मोठेपणाचा लाभ घेऊन मन:पूर्वक आशीर्वादही!

**चंद्रकांत बांदिवडेकर**


***देहविक्रय करणाऱ्या एका केरळीय महिलेची आत्मकथा***




# सेक्स वर्कर

**नलिनी जमीला**

**अनु. सुप्रिया वकील**

**किंमत : १२० रु.**


पोस्टेज : २५ रु.







*** लक्ष्मण गोपाळ परांजपे**



ज्योत्स्ना प्रकाशनाचे संस्थापक श्री. लक्ष्मण गोपाळ परांजपे यांचे ११सप्टेंबर २००७ रोजी पुणे येथे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते.

त्यांच्या मागे पत्नी,दोन मुले (प्रकाशक श्री. मिलिंद आणि श्री. विकास परांजपे) एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

श्री. परांजपे यांनी १९९६/९७ पासून व्यवसायातून पूर्ण निवृत्ती स्वीकारली होती. ज्योत्स्ना प्रकाशनातर्फे बाळगोपाळांसाठी 'शिक रे अआई', 'जोडाक्षर वाचन, शिशुवाचन, रंगीत अक्षरओळख आणि छान छान चित्रे ही सचित्र आणि रंजक पुस्तके त्यांनी प्रकाशित केली. पूर्व प्राथमिक शाळेच्या मुलांना वाचता यावे यासाठी त्यांनी मराठीत जोडाक्षरविरहित अशी सहा पुस्तकांची मालिका काढली. लहान मुलांचे परिकथांनी आणि साहसांनी झपाटलेले विश्व परांजपे यांनी नेमकेपणाने हेरले होते. रामायण-महाभारतातील चारित्र्यसंपन्न व्यक्तिचित्रांपासून इसापनीतिपर्यंत जवळपास २०० पुस्तके त्यांनी प्रसिद्ध केली. मुलांच्या वयोमानानुसार चार सुटसुटीत गट पाडून त्या प्रकारात आकर्षक बहुरंगी मुखपृष्ठ, कथाचित्रांचा भरपूर वापर, मुलांना सहज वाचता येईल असा टाईपसेट, सोपी ओघवती भाषा आणि बालमनाला रुचेल असे वाङ्मय निर्माण करण्यावर श्री. परांजपे यांचा भर होता.

प्रारंभी 'पॉप्युलर' आणि 'केशव भिकाजी ढवळे' या प्रकाशनसंस्थात काम केल्यावर परांजपे यांनी ज्योत्स्ना प्रकाशनाची स्थापना केली. शून्यातून त्यांनी हा व्यवसाय मोठ्या कष्टाने उभारला. आपल्या प्रत्येक पुस्तकाचे मुखपृष्ठ उत्कृष्टच असायला हवे, असा त्यांचा आग्रह असे. त्या काळात त्यांच्या विचारांना मूर्त चित्राचा आकार देणारे दीनानाथ दलाल, द.ग.गोडसे आणि रघुवीर मुळगावकर असे नामवंत चित्रकार होते.

त्यांचे दोन्ही पुत्र मिलिंद आणि विकास ज्योत्स्ना प्रकाशनाची धुरा समर्थपणे वाहत आहेत.

मेहता पब्लिशिंग हाऊस परिवारातर्फे श्री. लक्ष्मण परांजपे यांना विनम्र आदरांजली.

### * शांताबाई किर्लोस्कर

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, 'किस्त्रीम'च्या संपादक आणि राज्य पालक शिक्षक संघांच्या संस्थापिका शांताबाई किर्लोस्कर यांचे १५ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८४ वर्षांच्या होत्या. गेल्या काही वर्षापासून त्यांना अल्झायमरने ग्रासले होते. ज्येष्ठ संपादक मुकुंदराव किर्लोस्कर यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या मागे पती आणि तीन मुली आहेत.

शांताबाईचा जन्म १९२३ साली बारामती येथे झाला. पुणे आणि सातारा येथे शिक्षण पूर्ण केल्यावर अनेक वर्षे त्यांनी किर्लोस्कर हायस्कूलमध्ये अध्यापन केले. विद्यार्थी चळवळीचे नेतृत्व केलेल्या शांताबाईंनी १९४३ नंतर अखिल भारतीय महिला परिषदेचे काम सुरू केले. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी बालविकास मंदिराची स्थापना केली. १९६० साली त्यांनी पालक-शिक्षक संघांची स्थापना केली. 'पालक-शिक्षक' वार्षिकाचे संपादकपदही त्यांनी भूषविले. 'युनिव्हर्सिटी वुमेन्स असोसिएशन' या संस्थेच्या कार्यकारिणीवर त्यांची निवड झाली होती.

'स्त्री' या मासिकाच्या संपादकपदाची धुरा त्यांनी समर्थपणे सांभाळली. शांताबाईंनी विविध विषयावर लेखन केले. डाक्क्याची साडी, शोध, देणगी, स्त्री जीवन आणि बायकांचा जन्म, लालन पालन, प्रकाशाचा वेध, ही पुस्तके त्यांनी लिहिली. किस्त्रीमचा आढावा घेणारे 'गोष्ट पासष्ठीची' हे पुस्तकही त्यांनी लिहिले. फ्रान्समधील स्त्री चळवळीच्या उद्गात्या 'सिमोन दि बुव्हिए' यांच्या 'द सेकंड सेक्स'या पुस्तकाचे शांताबाईंनी केलेले 'बायकांचा जन्म' हे रूपांतर विशेष गाजले. ❐


**www.mehtapublishinghouse.com**

**प्रत्येक पुस्तकाची सविस्तर माहिती असलेली संपूर्णपणे मराठी असलेली वैशिष्ट्यपूर्ण वेबसाईट.**

**आत्तापर्यंत १,५०००० वाचकांनी साईटला भेट दिली आहे!**

कॅलिफोर्निया, व्हर्जिनी, न्यूजर्सी, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, व्हिस्कोसिन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंग्डम, हाँगकाँग, सिंगापूर, तैवान, युनायटेड अरब अमिराती, जर्मनी , चीन, कोरिया, स्वीडन, फ्रान्स, कुवेत,नेदरलॅण्ड, जपान, इस्त्रायल, आयरलॅण्ड इत्यादी जगातील विविध भागांबरोबरच भारतात व महाराष्ट्रात ही साईट सर्वाधिक लोकप्रिय ठरली आहे.

**आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.**





# सुवर्णसंधी

**इयत्ता अकरावीत** प्रवेश घेतलेल्या उमद्या युवा वर्गासाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**तर्फे एक अभिनव योजना.....

## 'यंग रीडर्स बुक क्लब'

**काय आहे ही योजना...?**

* नाममात्र रु.१००/- भरुन केवळ **अकरावीचे** विद्यार्थी **तीन वर्षांसाठी** या योजनेचे सभासद होऊ शकतात.

* सभासद झाल्यास तीन वर्षासाठी **५०% सवलतीत** मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झालेली सर्व पुस्तके उपलब्ध असतील.


* शिवाय 'मेहता मराठी ग्रंथजगत' हे महाराष्ट्राच्या साहित्यिक-सांस्कृतिक घडामोडींबाबत अद्ययावत माहिती देणारे मासिक तीन वर्षासाठी मोफत घरपोच दिले जाईल.

**योजनेच्या अटी-**

* कॉलेजचे ओळखपत्र दाखवणे आवश्यक.
* पासपोर्ट साईज स्वतंत्र फोटो आवश्यक.

- संपर्क -
**मेहता पब्लिशिंग हाऊस,**
१९४१, सदाशिव पेठ, माडिवाले कॉलनी, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर, पुणे - ४११ ०३०.
दूरध्वनी - २४४६३०४८ / २४४७६९२४.
**Website: www.mehtapublishinghouse.com**
**Email: info@mehtapublishinghouse.com**

# बालनगरी




## अनुक्रमणिका

अंबरीष १०५




## अंबरीष


भगवान विष्णूंची साधना मधुवनात अंबरीष करत होता. त्याने आपला तीन दिवसांचा उपवास द्वादशीला साडायचे ठरविले.



सर्वांना दान धर्म करून झाला.......





.......अनाथांना प्रसाद वाटून झाला.





तो उपवास सोडणार इतक्यात दुर्वास ऋषी तिथे झाले.
राजा, उठ!
कृपा करून माझ्या आतिथ्याचा स्वीकार करावा.
जरुर, पण आधी पवित्र गंगेमध्ये स्नान करून येतो.
दुर्वास ऋषी नदीवर गेले. खूप वेळ झाला.तिथे जमलेल्या सर्व पंडितांना काळजी वाटू लागली.
राजा, दुपार टळण्यापूर्वी उपवास सोडला पाहिजे...
मी जर तसं केलं तर,मला दुर्वास ऋषींचा क्रोध पत्करावा लागेल.
राजा, उपवास सोडण्यासाठी घोटभर पाणी पी. ऋषी रागावणार नाहीत.
ठीक आहे.
अंबरीष पाण्याचा घोट घेणार इतक्यात....
अंबरीष





तू एक घरंदाज राजा आहेस.
पण तू तुझ्या अतिथीसाठी थांबू शकला नाहीस.
महाराज फक्त घोटभर पाणीच–
अतिथीला जेवू घातल्याशिवाय तू पाण्याचा एक थेंबही घेता कामा नये.
दुर्वास ऋषी संतप्त झाले –
माझा तुला शाप आहे


क्रोधित झालेल्या ऋषींनी आपल्या जटेतली एक बट उपटली.
तिचे एका चक्रात रूपांतर झाले.
दुर्वासांनी ते चक्र अंबरीषच्या दिशेने सोडले.
आता भगवान विष्णूंशिवाय कोणीच राजाला वाचवू शकणार नाही.
स्वर्गातून भगवान विष्णू हे सर्व पाहतात
सुदर्शन चक्रा जा, माझ्या भक्ताला वाचव.
हे दुसरे चक्र!
हे भगवान विष्णूचे सुदर्शन चक्र आहे.





भगवान विष्णूंच्या सुदर्शन चक्राने दुर्वासांचे चक्र मोडून टाकले. सुदर्शनचक्र दुर्वासांच्या मागे लागले.
हे माझ्याकडेच येत आहेत.
दुर्वास ऋषी पळू लागले; परंतु सुदर्शन चक्र त्यांचा पाठलाग करीत राहिले.



दुर्वास ऋषी एका गुहेत शिरले.
गुहेतून पलीकडे जाऊन त्यांनी नदीत उडी घेतली.
आता काय करावे?
अखेर –
फक्त ब्रह्मदेवच आपल्याला वाचवू शकतील.




ते ब्रम्हदेवांसमोर गेले.
देवा, माझे रक्षण करा!
मुनिवर्य, तुम्ही विष्णूच्या भक्ताला असा त्रास नको होता द्यायला.
मी तुला वाचवू शकत नाही.
भगवान शंकराकडे मला जायला हवे.
ते कैलास पर्वतावर पोहोचले
फक्त विष्णूच तुम्हाला वाचवू शकतील. त्यांनाच भेटा.


दुर्वास भगवान विष्णूकडे गेले.
हे देवा! मला क्षमा करा.मी पुन्हा तुमच्या भक्ताला कधीही दुखावणार नाही. माझे रक्षण करा.
मी ते सुदर्शन चक्र परत घेऊ शकत नाही.तुम्ही राजा अंबरीषकडेच परत जा..
फक्त अंबरीषच तुम्हाला वाचवू शकेल.
दुर्वास धावत मधुवनात आले.
अंबरीष! मला माफ कर. हे सुदर्शनचक्र परत घे.




अंबरीष दयाळू होता.
त्याने सुदर्शन चक्राला विनंती केली.
हे दिव्य अस्त्रा, दुर्वास ऋषींवर कृपा कर.
एवढ्या मोठ्या ऋषीची ही केविलवाणी अवस्था बघ.
दुर्वास ऋषी अंबरीषकडे येतात.
तू खरोखरच गुणवान राजा आहेस.मी तुझा आभारी आहे.
हे, राजा ब्रम्हदेव, भगवान शंकर हे सुदर्शन चक्र थांबवू शकले नाहीत परंतु तुझ्या केवळ विनंतीने ते नाहीसे झाले. तुझ्या या शक्तीचे रहस्य काय?
काही नाही. हे भगवान विष्णूचं प्रेम आहे.
भगवान विष्णू आपल्या भक्तांचे संरक्षण नेहमी करतात.